
# गौड ब्राह्मण

● वर्ष ८०, मुंबई ● अंक ०४ ● एप्रिल–मे–जून २०१९ ● पाने ८० ● किंमत २० रुपये





"सार्थ उपनिषद भाग १,२,३,४";"समग्र श्री शंकराचार्य भाग १,२,३,४"
"ब्रह्मसूत्र (शंकर भाष्य)" ; "सार्थ श्री ज्ञानेश्वरी रहस्य"
४० वर्षाच्या यशस्वी इंजिनिअरिंग करिअर नंतर,केवळ जिज्ञासेपोटी,पुण्यातील प्रसिद्ध
Bhandarakar Oriental Research Institute
मधील वरिष्ठ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली, मूळ संस्कृत ग्रंथांचे भाषांतर/भाष्य-स्वरूपी केलेले लेखन. प्रथम प्रकाशने छापील-पुस्तक स्वरुपात (1995).आता फक्त इ-बुक्स स्वरुपात.विक्रेते- www.BookGanga.com(Jagat Guru Acharya Shri Shankara is the first authentic exponent of Advait Vedant,as recognized by the Great Philosophers from the world))



Author- Shrikant Gangaram Desai







॥ उत्तिष्ठ यशो लभस्व ॥

गौड ब्राह्मण

**स्थापना : १९३९**

**: संपादक :**
उमाकांत गणपत महाजन

**: संपादन साहाय्यक मंडळ :**
पंढरीनाथ विठ्ठल सरनाईक
जगजीवन श्रीकांत प्रभु
योगेश खानोलकर
वीणा विश्वनाथ दाभोलकर

**: मुखपृष्ठ संकल्पना :**
मनीष दाभोलकर

**चित्रकार- सचिन सामंत**

**: संपादकीय पत्रव्यवहार :**
**गौड ब्राह्मण सभा**
३०, कुडाळदेशकर ब्राह्मण निवास,
१४७ ब, जगन्नाथ शंकरशेट मार्ग,
गिरगाव, मुंबई-४०० ००४.
दूरध्वनी: ०२२-२३८५ ००१५
मो.: ९६८९७८१७५०
Email : gbs.girgaon@gmail.com
ugmahajan@rediffmail.com

या त्रैमासिकात प्रकाशित झालेल्या लेखातील मतांशी संपादक तसेच संस्था सहमत असतीलच असे नाही.
- संपादक

# ❋ गौड ब्राह्मण ❋

वर्ष ८० वे ❖ एप्रिल-मे-जून-२०१९ ❖ अंक ४

## अंतरंग

- **संपादकीय** : उमाकांत गणपत महाजन
- **नटवर्य माधवराव वालावलकर** : सौ. गीता परूळेकर
- **पुरुषोत्तम वालावलकर** : सौ. गीता परूळेकर
- **पू. श्री मुणगेकर महाराज** : अशोक केसरकर
- **श्रीसूक्त - (अर्थासहीत)** : श्रीमती नीलिमा श. प्रभू
- **धैर्य नावाचा सद्‌गुण** : माधव गवाणकर
- **बिटके आंबे** : शुभदा पाटकर
- **दडपे पोहे** : पल्लवी वागळे-सामंत
- **तुलनेचे घरटे...** : पल्लवी वागळे-सामंत
- **उन्हाळ्याची सुट्टी-कालची आणि आजची** : शुभदा पाटकर
- **शब्दांचा खेळिया-'पुलं'** : निरुता भाटवडेकर
- **''योगी पावन मनाचा/ साहे अपराध जनाचा''** : जगजीवन श्रीकांत प्रभु
- **न मळलेल्या वाटेवर चाललेला .... कर्मयोगी!** : मनीष दाभोलकर
- **SUCCESS STORIES झुंजार कमलताई परुळेकर** : मनीष दाभोलकर
- **जपानी भाषा जगणाऱ्या छाया ताई** : तुषार नाईक
- **ज्ञातिवृत्तांत, साद-प्रतिसाद श्रद्धांजली व वधू-वर सूची**

**गौड ब्राह्मण सभा यांच्या मालकीचे हे त्रैमासिक संपादक, मुद्रक व प्रकाशक उमाकांत गणपत महाजन यांनी प्रतिक ऑफसेट, १८०-सी गायवाडी, गिरगाव, मुंबई-४०० ००४ येथे छापून ३०, कुडाळदेशकर ब्राह्मण निवास, १४७ ब, जगन्नाथ शंकरशेट मार्ग, मुंबई ४०० ००४ येथे प्रसिद्ध केले.**

# गौड ब्राह्मण सभा

ज्ञातीतील दानशूर व्यक्तींनी संस्थेला दिलेल्या भरघोस देणग्यांमधून, त्यांनी व्यक्त केलेल्या इच्छेनुसार गौड ब्राह्मण सभेने विविध कायमनिधी फंड गठीत केले असून या कायमनिधी फंडांच्या व्याजातून ज्ञातीतील निराधार, निराश्रित, गरीब, गरजू स्त्री/पुरुष, यांना आर्थिक मदत, विद्यार्थी/विद्यार्थिनींना शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती तसेच ज्ञातीतील कर्करोग, हृदयविकार, किडणीविकार, मतिमंद आदी व्याधीग्रस्त रुग्णांना औषधोपचार/शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत दिली जाते.

सभेच्या कायम निधी फंडाकरिता रु. २५,०००/- किंवा त्याहून अधिक देणगी देणाऱ्या ज्ञातीतील दानशूरांची नावे गौड ब्राह्मण सभेच्या त्रैमासिकात कायम स्वरुपात छापली जातील.

गौड ब्राह्मण सभेच्या कायम निधी फंडाकरिता ज्ञातीतील दानशूरांनी दिलेल्या देणग्यांचा तपशील खालीप्रमाणे आहे.

## आश्रयदाते

**स्व. लक्ष्मीबाई बा. पाटील, विले पार्ले**
**स्व. विष्णु मंगेश पाटील,** विले पार्ले ₹ ८०,४८,०००/-

**सौ. स्वाती सुरेश परूळेकर यांजकडून**
(पिताश्री स्व. गणपत स. आजगावकर
मातोश्री स्व. प्रभावती ग. आजगावकर
भगिनी स्व. मालती अरविंद नाईक ह्यांच्या स्मरणार्थ) ₹ ५,००,०००/-

**स्व. विष्णू मंगेश पाटील, विले पार्ले** ₹ २,५०,०००/-
(स्व. गौरी व स्व. मंगेश पाटील यांच्या स्मरणार्थ)

**स्व. विष्णू मंगेश पाटील, विले पार्ले** ₹ २,५०,०००/-
(स्व. लीला व स्व. दामोदर सामंत ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्री. दीपक दिगंबर सामंत** (अंधेरी पूर्व) ₹ २,००,०००/-
(मावशी स्व. कु. चित्ररेखा (चित्रा) चिंतामण प्रभुदेसाई हिच्या स्मरणार्थ)

**स्व. एकनाथ केशव ठाकूर** ₹ १,००,०००/-

**स्व. गजानन विष्णू देसाई** ₹ १,००,०००/-

**श्री आत्माराम शांताराम ठाकूर (बोरिवली)** ₹ १,००,०००/-
(पत्नी- स्व.सौ. विणा आत्माराम ठाकूर स्मरणार्थ)

**स्व. छाया पद्माकर परुळेकर** ₹ ५०,०००/-

**स्व. लक्ष्मी दिनकर खानोलकर** ₹ ३५,०००/-

**स्व. वंदना आनंद खानोलकर** ₹ २५,०००/-

**स्व. नलिनी शां. पंतवालावलकर** ₹ २५,०००/-

**स्व. मुकुंद गजानन देसाई** ₹ २५,०००/-

**स्व. अनंत लक्ष्मण प्रभु** ₹ २५,०००/-

**स्व. नीला भालचंद्र नाईक** ₹ २५,०००/-

**स्व. बापू नीळकंठ देसाई** ₹ २५,०००/-

**स्व. भालचंद्र अनंत नाईक** ₹ २५,०००/-

**स्व. जगन्नाथ भगवत महाजन** ₹ २५,०००/-

## आधारस्तंभ

**श्री. अरविंद लक्ष्मण पाटील पाटकर** ₹ ५,७५,०००/-
(स्व. लक्ष्मण अनंत पाटील पाटकर व स्व. अन्नपूर्णा लक्ष्मण पाटील पाटकर ह्यांच्या स्मरणार्थ)

**डॉ. सुरेश विठ्ठल परूळेकर यांजकडून**
आजोबा स्व. रामचंद्र विठ्ठल परुळेकर
आजोबा स्व. मधुसुदन पुरुषोत्तम वाघ ₹ ५,००,०००/-
पिताश्री स्व. विठ्ठल रामचंद्र परुळेकर
मातोश्री स्व. सुदा विठ्ठल परुळेकर
स्व. काका डॉ. काशिनाथ रामचंद्र परुळेकर
ह्यांच्या स्मरणार्थ.

**श्री. सूर्यकांत ज्ञानदेव आजगांवकर** (पालघर) ₹ १,५०,०००/-
(स्व. आई/स्व. वडील व स्व. काका पुरुषोत्तम तुकाराम आजगांवकर यांच्या स्मरणार्थ)

**सौ. शुभलक्ष्मी सूर्यकांत आजगांवकर**(पालघर) ₹ १,५०,०००/-
(स्व. आई/स्व.वडील व भाऊ स्व. मोहनदास पुरुषोत्तम प्रभु खानोलकर यांच्या स्मरणार्थ)

**डॉ. रवींद्र बाबूराव तिरोडकर** ₹ १,५०,०००/-

**डॉ. विलास रामकृष्ण देसाई** ₹ १,२५,०००/-

**श्री. श्रीपाद बाळकृष्ण पाटील** ₹ १,२५,०००/-

**श्रीमती प्रेमलता गजानन प्रभु** ₹ १,१८,०००/-
(स्व. गजानन शंकर प्रभु व स्व. शंकर गणेश प्रभु ह्यांच्या स्मरणार्थ)

**सौ. मृणालिनी वसंत नाईक आणि कुटुंबीय** ₹ १,११,०००/-

**श्रीमती निलू (निरंजन) गव्हाणकर** ₹ १,१०,००२/-
(स्व. गणेश विष्णू गव्हाणकर, स्व. सुशीलाबाई गणेश गव्हाणकर ह्यांच्या स्मरणार्थ)

**सौ. स्नेहलता सुरेंद्र सामंत कोपराडकर व** ₹ १,०२,०००/-
**श्री. सुरेंद्र दत्तात्रय सामंत कोपराडकर (वसई)**
यांजकडून (पिताश्री स्व. श्री. नारायण सखाराम देशपांडे व स्व. श्रीमती कुमुसदीनी नारायण देशपांडे सोलापूर ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्री. हृषीकेश काशीनाथ प्रभु** ₹ १,००,०००/-
(स्व. देवराम दा. सामंत ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्रीमती आरती दिनेश नायक** ₹ ७५,०००/-

**श्रीमती सुशीला दत्तात्रय सामंत** ₹ ७०,०००/-

**श्री. देवदत्त आत्माराम खानोलकर** ₹ ५०,००१/-

**श्री. महेंद्र पांडुरंग तेंडुलकर** ₹ ५०,००१/-

## संपादकीय

# विनम्र अभिवादन!

जगातील सर्वात मोठी लोकसंख्या असलेल्या आपल्या लोकशाहीप्रधान देशात लोकसभेच्या सर्वात्रिक निवडणूका शांततेने पण यशस्वीरित्या पार पडल्या असून क्षणाक्षणाला उत्कंठा वाढविणारे निकाल जाहीर होऊन देशातील भारतीय जनता पक्षाला पुन्हा एकदा निर्विवाद बहुमत प्राप्त झाले आहे. त्यामुळे पुढील पाच वर्षात देशात खऱ्या अर्थांने प्रगति व शांतता नांदेल असा विश्वास बाळगायला काही हरकत नाही. देश महासत्ता बनण्याच्या दृष्टीने देशातल्या प्रत्येक नागरिकाचे देखील कर्तव्य आहे हे कसे बरे विसरून चालेल! त्यासाठीच नव निर्वाचित खासदारांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी आम्ही त्यांना शुभेच्छा देत आहोत.

ऐन परीक्षांच्या कालावधीमध्ये सार्वत्रिक निवडणूका जाहीर झाल्यामुळे पूर्वनियोजित परीक्षांच्या वेळापत्रकामध्ये बदल करावा लागला असला तरी त्याचा मुलांच्या अभ्यासावर विशेष परिणाम न होता परीक्षादेखील सुरळीत पार पाडल्या हीदेखील जमेचीच बाजू म्हणावी लागेल. यंदाही माध्यमिक व उच्च माध्यमिक शालान्त परीक्षांमध्ये कोकण विभागाने बाजी मारली असून यामध्ये आपल्या ज्ञातीतील मुलांमुलींनी आपली उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे यासाठी आम्ही त्यांचे संस्थेच्यावतीने विशेष अभिनंदन करीत आहोत.

अलीकडेच रायगडावर ३०५वा शिवराज्यभिषेक दिन सोहळा लाखो शिवभक्तांच्या उपस्थितीत साजरा झाला. हा अभूतपूर्व सोहळ याची देही याची डोळा पाहण्यासाठी हजारो शिवभक्तांनी गडावर गर्दी केली होती. छत्रपती शिवरायांचे राज्य विश्ववंदनीय होते पराक्रमी राजे जगाच्या इतिहासात पुष्कळ झाले असतील, पण शून्यातून विश्व उभे करणारा शिवाजी सारखा राजा विरलाच! महाराजांचे आदर्श, महाराजांची राजनीती आजच्या राज्यकर्त्यांमध्ये अभावानेच पाहायला मिळते. आज राज्यात पडलेला दुष्काळ, शेतीमालाला मिळत नसलेला भाव व कर्जबाजारीपणामुळे शेतकरी आत्महत्या करायला प्रवृत्त होतो आहे यामागची कारणे सरकारने खोलात जाऊन शोधली पाहिजेत. छत्रपतींचे नाव केवळ राजकीय फायद्यासाठी न घेता त्याची नीतीही आचरणात आणायची नितांत गरज आहे. यासाठि सरकारने सतत प्रयत्नशील असायला हवे हे आम्ही याठिकाणी सूचित करू इच्छितो. शेतकरी सुखी तर देश सुखी ही नीती सरकारने अवलंबायला हवी. असो.

कुडाळदेशकर गौड ब्राह्मण ज्ञातीच्या इतिहासावर संशोधन करून 'कुडाळदेशकर समग्र इतिहास'यानावाने तीन खंडामध्ये प्रसिद्ध करणारे इतिहास संशोधक, कोकणातील आपल्या आजगाव गावाचा इतिहास लिहिणारे, एवढ्यावरच न थांबता कुडाळदेशकर गौड ब्राह्मण ज्ञातीच्या प्रातिनिधिक संस्थेच्या पडत्या काळात स्व. दत्तात्रय पांडुरंग नाईक ह्या ज्ञाती कार्यकर्त्याच्या खांद्याला खांदा लावून संस्थेच्या पुनरुज्जीवनात मोलाचे योगदान देणारे तसेच सभेचे काही काळ बंद पडलेले ''गौड ब्राह्मण'' हे त्रैमासिक पुन्हा नव्याने सुरु करुन आपल्या लेखणीच्या सामर्थ्याने कुडाळदेशकर गौड ब्राह्मण ज्ञातीविषयी समस्त महाराष्ट्राला ओळख करून देणारे ज्ञातीतील एक अभ्यासू, द्रष्टा इतिहास संशोधक, चिंतनशील लेखक, कवी, साक्षेपी संपादक, निर्भिड पत्रकार, प्रयोगशील प्रकाशक, उमदा शिक्षक, यशस्वी उद्योजक आदि क्षेत्रांमध्ये कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या स्व. ''गुं.फ. आजगावकर'' यांचा जन्म दि. १२ सप्टेंबर १९१९ चा म्हणजेच २०१९ हे स्व. गुं.फ. आजगावकर यांचे हे जन्म शताब्दी वर्ष होय! याचे औचित्य साधून गौड ब्राह्मण त्रैमासिकाचा 'गुं.फ. आजगावकर विशेषांक' प्रकाशित करण्याचा सभेचा मानस आहे. त्यादृष्टीने साहित्याची जमवाजमव देखील सुरु आहे. या विशेषकांत मान्यवरांचे लेख प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. तसेच गुं.फ. आजगावकर यांच्या जन्मशताब्दी वर्षात त्यांच्या साहित्यिक कारकीर्दीला तसेच त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी एका खास कार्यक्रमाचे देखील आयोजन करून त्यांच्या कार्याला मानवंदना देण्यात येणार आहे. यासाठी ज्ञातीतील थोरामोठ्यांचे, सर्वांचेच साहाय्य आम्हाला लागणार आहे. त्यासाठी योग्यवेळी आम्ही आपणांसी संपर्क साधणार आहोत. तूर्तास स्व. गुं. फ. आजगावकर यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वास गौड ब्राह्मण सभेच्यावतीने आम्ही त्यांना मन:पूर्वक अभिवादन करीत आहोत.

संपादक
**उमाकांत गणपत महाजन**
९६८९७८१७५०

## आधारस्तंभ

| | |
|---|---|
| **श्री. जगजीवन श्रीकांत प्रभू केळुसकर** | ₹ ५०,०००/- |
| **श्री. महादेव भास्कर सामंत** | ₹ ५०,०००/- |
| **श्री. विजय विठ्ठल परुळेकर** | ₹ ५०,०००/- |
| **श्रीमती वंदना केदार पाटील** | ₹ ५०,०००/- |
| **श्रीमती विभावरी अरविंद पाटील-पाटकर** | ₹ ५०,०००/- |
| **श्रीमती विजयालक्ष्मी द्वारकानाथ दाभोलकर** (स्व. द्वारकानाथ साबाजी दाभोलकर ह्यांच्या स्मरणार्थ) | ₹ ५०,०००/- |
| **टोपीवाला चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई** | ₹ ५०,०००/- |
| **सौ. बीना विष्णु प्रभु व श्री. विष्णू विनायक प्रभु** (स्व. पर्शराम आत्माराम वायंगणकर ह्यांच्या स्मरणार्थ) | ₹ ५०,०००/- |
| **श्री. शामराव शांताराम पाटील** **श्रीमती उषा शामराव पाटील** | ₹ ५०,०००/- |
| **श्रीमती मीरा रघुनाथ सामंत** | ₹ ५०,०००/- |
| **श्री. रामदास बी. प्रभु-कोचरेकर** (स्व. काका कोचरेकर पारितोषिक फंडात भर) | ₹ ३५,०००/- |
| **श्रीमती स्नेहलता ग. तिरोडकर** (स्व.गजानन (दादा) रघुनाथ तिरोडकर यांच्या स्मरणार्थ) | ₹ २५,२२२/- |
| **श्री. उदयराज स. सामंत नेवाळकर** | ₹ २५,०००/- |
| **श्री. सुधाकर वासुदेव वालावलकर** | ₹ २५,०००/- |
| **श्री. राजीव आनंदराव गव्हाणकर** | ₹ २५,०००/- |
| **श्री. शशीकांत पीतांबर देसाई** | ₹ २५,०००/- |
| **श्री. अच्युत वामन तेंडुलकर** | ₹ २५,०००/- |
| **श्री. अरुण रघुनाथ सामंत** (स्व. रघुनाथ विष्णू सामंत ह्यांच्या स्मरणार्थ) | ₹ २५,०००/- |
| **श्रीमती पुष्पा रामचंद्र सामंत** (स्व. रामचंद्र का. सामंत व स्व. कमल रामचंद्र सामंत ह्यांच्या स्मरणार्थ) | ₹ २५,०००/- |
| **श्रीमती सुहासिनी दत्ताराम गाळवणकर** (स्व. सुमती मधुसूदन तेंडुलकर ह्यांच्या स्मरणार्थ) | ₹ २५,०००/- |
| **श्री. शिवराम वासुदेव तेंडोलकर, सौ. विजया शिवराम तेंडोलकर** | ₹ २५,०००/- |
| **श्री. अरविंद आत्माराम खानोलकर** | ₹ २५,०००/- |
| **श्री. प्रभु-पाटकर कुटुंबीय मुलुंड** (स्व. सतिशचंद्र सहदेव प्रभु-पाटकर यांचे स्मरणार्थ) | ₹ २५,०००/- |
| **श्री. भूषण रोहीत झारापकर** | ₹ २५,०००/- |
| **श्री. काशीनाथ नारायण कोचरेकर,** वसई (स्व. नारायण विनायक कोचरेकर व स्व. मनोरमा नारायण कोचरेकर यांच्या स्मरणार्थ) | ₹ २५,०००/- |
| **श्री. सुधाकर भास्कर गवाणकर,** (कणकवली) (स्व. सौ. सुधा सुधाकर गवाणकर हिच्या स्मरणार्थ) | ₹ २५,०००/- |
| **सौ. नीला राजाराम गाळवणकर** | ₹ २५,०००/- |
| **श्री. राधाकृष्ण शांताराम पाटील** (स्व. शांताराम बाळाजी पाटील व स्व. राधाबाई शांताराम पाटील ह्यांच्या स्मरणार्थ) | ₹ २५,०००/- |
| **सौ. भारती सुधाकर नाईक (अर्नाळा)** (स्व. विश्वनाथ राजाराम सामंत व स्व. सुमती विश्वनाथ सामंत ह्यांच्या स्मरणार्थ) | ₹ २५,०००/- |
| **श्रीमती शरयु तेंडोलकर** (स्व. प्रा. पंढरीनाथ गोपाळ तेंडोलकर ह्यांच्या स्मरणार्थ) | ₹ २५,०००/- |
| **श्रीमती जयंती भालचंद्र पाटकर** (डोंबिवली) (स्व. भालचंद्र नारायण पाटकर ह्यांच्या स्मरणार्थ) | ₹ २५,०००/- |
| **श्रीमती सुनीता शांताराम तेंडोलकर** (स्व. शांताराम दत्तात्रय तेंडोलकर यांचे स्मरणार्थ) | ₹ २५,०००/- |
| **श्री. रोहित रजनीकांत नाईक** (डोंबीवली) | ₹ २५,०००/- |
| **श्री. सुनील दिगंबर सामंत** (स्व. सॉलिसीटर वासुदेव भिकाजी सामंत स्मरणार्थ) | ₹ २५,०००/- |
| **सौ. स्वाती अमोल तेंडोलकर** (स्व. रमाकांत धोंडोपंत देसाई व स्व सुहासिनी रमाकांत देसाई यांच्या स्मरणार्थ) | ₹ २५,०००/- |
| **श्रीमती सावित्री जगन्नाथदेसाई (वालावल)** (स्व. जगन्नाथ दामोदर देसाई उर्फ काका बांबुळकर यांचे स्मरणार्थ) | ₹ २५,०००/- |

## ओंजळ

बकुळीचा गजरा माळून
वळून अशी पाहू नको
ओंजळीमध्ये चेहरा लपवून
लाजून अशी पाहू नका
**-सौ. शुभदा पाटकर**

प्रति,

संपादक गौड ब्राह्मण, त्रैमासिक, मुंबई

सौ. गीताताई परुळेकर यांनी ज्ञातिशिरोमणी श्री टोपीवाले तसेच श्री. स.का. पाटील यांची उपयुक्त व दूर्मिळ माहिती सर्वांना वाचायला दिली त्याबद्दल आभार.

सगळी माहिती मिळवून अभ्यासपूर्ण ओघवत्या चालीत मांडणी करणे अप्रतिम.

मला तुमचे फारच कौतुक वाटते.

**शरयू ठाकूर** बोरिवली (पूर्व)

# नटवर्य माधवराव वालावलकर

जन्मः १८९० मृत्यू : १४.१२.१९७४

**पूज्य नटांच्या लेखनाकृती जनमनासी रिझविती ।।**
**तेथ माझी ही उदबत्ती सुवासिक होवो ।।**



**माधवराव वालावलकर**

या शब्दांत आपल्या गतायुष्याच्या आठवणींचं टिपण ज्यांनी केलं तेच हे नटवर्य माधवराव वालावलकर. ''नटसम्राट माधवराव म्हणजे माझ्या गंधर्व कंपनीचा खांब आहेत'' अशा शब्दांत खुद्द बालगंधर्वांकडून मिळालेली शाब्बासकी, 'अभिनयपटू' म्हणून शृंगेरी धर्मपीठाचे कुलगुरू तत्कालीन शंकराचार्य जगद्गुरू विद्याशंकर भारती यांच्याकडून मिळालेला सन्मान, लो. टिळकांनी स्वतः विंगेत येऊन दिलेली जबरदस्त दाद, 'गंधर्व नाटक मंडळाचा कणा' अशी एकापेक्षा एक बिरूदावली ज्यांच्या नावामागे लागली गेली होती आणि ज्यांनी एका रात्रीत दुष्यंताच्या भूमिकेत एकशे दहा नाट्य गीते गाऊन नाट्यसंगीतात विक्रम केला होता ते कु. दे. ज्ञातीचे रंगमंचावरील मुकुटमणी म्हणजेच माधवराव वालावलकर. या थोर कलाकाराच्या मधूर स्मृतींमध्ये आपली पिढी आता रंगून जाणार आहे याची मला खात्री आहे.

माधवरावांसारख्या भव्य देहयष्टीच्या, खणखणीत आवाजाच्या आणि अव्वल दर्जाच्या कलाकाराबद्दल लिहिण्याएवढी माझी पात्रता नक्कीच नाही. पण माझ्या शालेय जीवनात माझ्या मावशीचे सासरे म्हणून माहेरी मोठ्या अदबीने ज्यांचं नाव घेतलं जाई आणि जे संवाद माझ्या कानावर पडत त्यावरून त्यांच्या विषयी मनात नेहमीच आदराची भावना निर्माण झाली होती. मी माधवरावांना प्रत्यक्ष पाहिलेलं नाही पण त्यांचे सुपुत्र प्रसिद्ध संवादिनीपटू पुरूषोत्तम वालावलकर (मावशीचे दीर) यांना घरात रियाज करताना पाहण्याचं भाग्य मला दोन तीन वेळा लाभलं. तसंच माधवरावांची कन्या सौ. नीला गाळवणकर यांना आधी मावशीची नणंद व उत्तम गायिका म्हणून मी ओळखत होते. पण नंतर मी एका शाळेची मुख्याध्यापिका असल्याने मला दरवर्षी एप्रिल ते जुलै या काळात निला विकास प्रकाशनची व्यवसाय पुस्तके घेऊन येणाऱ्या या सहृदयी मैत्रिणीला भेटण्याची संधी मिळत असे. असं जरी असलं तरी वालावलकर कलाकार मंडळीं बद्दल लिहिण्यास मी पेन हातात घेतलंय हे निश्चितच धाडस आहे याची मला जाणीव आहे. तरी वाचकांनी काही चूक आढळल्यास मला समजून घ्यावे ही नम्र विनंती.

सांगायचं म्हणजे वर सांगितलेली मानांकने प्राप्त झालेल्या माधवरावांचा जन्म कोकणातील सावंतवाडी संस्थानच्या सांगेली खेड्यात १८९० साली झाला. आईच्या अकाली निधनामुळे मातृप्रेमाला दुरावलेल्या माधवरावांचं मामाच्या घरी झारापीस प्राथमिक शिक्षण पार पडलं आणि वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी ते पोटापाण्यासाठी मुंबईस आले. लोहार चाळीतील बोधजी चाळ येथील परिचित झारापकर कुटुंबाने त्यांच्या गॅलरीत रात्रीची पथारी पसरण्यास जागा दिली आणि कामाच्या शोधात असताना एका पेढीवर कारकून म्हणून माधवराव रूजू झाले. सुवाच्च वळणदार अक्षर आणि आकडेमोडीचं ज्ञान अवगत असल्यामुळे १९०४ ते १९१४ अशी चक्क दहा वर्षे माधवरावांनी कारकुनी केली.

माधवरावांना गाण्याची भारी हौस असल्यामुळे त्यांनी १९१३ साली अनंत मनोहर जोशी यांच्या गायन क्लासमध्ये नाव नोंदवलं आणि त्यांना आश्चर्याचा धक्काच दिला. क्लास सुरू होऊन तीन दिवस उलटत नाहीत तोच जोशी गुरूजींनी उत्तम आवाज आणि सडसडीत बांधा असलेल्या माधवरावांना ''कारकुनी करण्यात आयुष्य वाया घालवण्यापेक्षा नाटक कंपनीत जा. पैसा व नावलौकिक दोन्ही मिळेल '' असं सूचवलं. आणि एवढ्यावरच न थांबता 'ललित कलादर्शन' या नाटक कंपनीतील केशवराव भोसले यांचेकडे शब्द टाकला. माधवरावांना जावं न जावं हा विचार करायला उसंत मिळालीच नाही. माधवराव नोकरी सांभाळून 'राक्षसी महत्वाकांक्षा' नाटकातील नारदाच्या भूमिकेच्या तालमीस आठवडाभर हजर राहिले. तोंडाला रंग फासला म्हणजे पोरगा वाया गेला, नाटक म्हणजे 'खुळा नाद' असं समजणारा तो काळ होता. माधवरावांच्या कानीं आसपासच्या लोकांची कुजबूज आली आणि लोक दूषणं देतील या धसक्याने त्यांनी तालीम सोडून दिली.

इकडे केशवराव भोसले यांना नवीन कलाकारांची गरज भासली आणि त्यांनी हस्ते परहस्ते माधवरावांचं मन वळवून त्यांना नाटक कंपनीत जवळ जवळ ओढून घेतलं. मध्यस्थी करणारे होते माधवरावांचे मालवणचे मित्र डॉ. आर. व्ही.



## स्वर्गीय एकनाथ केशव ठाकूर कर्करोगग्रस्त वैद्यकीय उपचार फंड :

गौड ब्राह्मण सभेतर्फे प्रकाशित केल्या जाणाऱ्या "**गौड ब्राह्मण**" या त्रैमासिकाच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे (२०१४) औचित्य साधून, ४४ वर्षे कर्करोगाशी एकाकी झुंज देत ज्यांनी आपल्या समाजबांधवांना बरेच काही दिले. स्व. श्री. एकनाथ केशव ठाकूर ह्यांच्या स्मृतिप्रत्यर्थ सभेने "**स्व. श्री. एकनाथ केशव ठाकूर स्म. कर्करोग वैद्यकीयउपचार फंडा**" ची स्थापना केली आहे. या मागची मूळ. संकल्पना सभेचे खजिनदार श्री. मनीष गुरुदास दाभोलकर यांची आहे. त्यांनी १०० लाख रुपये निधी संकलन करण्याची घोषणा केली व त्यांनी स्वत: या फंडाकरिता रु. १ लाख (एक लाख) रु. देणगी देऊन शुभारंभ केला होता. ह्या योजनेला दानशूरांकडून उत्तम प्रतिसाद लाभला आहे. **रु. २५,०००/- किंवा त्याहू अधिक देणगी देणाऱ्या दानशूरांची नावे कायम स्वरूपात त्रैमासिकात छापली जातात.** या फंडाच्या रकमेच्या व्याजातून ज्ञातीतील कर्करोग्रस्तांना औषधोपचारासाठी सभेतर्फे आर्थिक मदत दिली जाते. ज्ञातीतील दानशूरांनी ह्या उपक्रमासाठी सढळ हस्ते देणग्या द्याव्यात ही विनंती.

**श्री. गोविंद महादेवराव सामंत (वाद्रे)** ₹ ३,००,०००/-
(वडील स्व. महादेवराव विठ्ठल सामंत व आई स्व. सौ.सीताबाई महादेव सामंत आणि बंधू स्व. भास्कर महादेवराव सामंत ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्री. दीपक दिगंबर सामंत (अंधेरी पूर्व)** ₹ २,००,०००/-
(मामा स्व.श्री. रवींद्र चिंतामण प्रभु देसाई ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्री. रवींद्र बाबुराव तिरोडकर (अंधेरी)** ₹ १,००,००१/-

**डॉ. जगदीश देवराव सामंत** ₹ १,००,०००/-

**श्री. शशी प्रभू** ₹ १,००,०००/-

**श्री. मनीष गुरुदास दाभोलकर** ₹ १,००,०००/-

**श्री. जयंत रामचंद्र पाटील** ₹ १,००,०००/-

**श्री. विकास (राजाभाऊ) पाटकर आणि कुटुंबीय** ₹ १,००,०००/-

**श्री. यशवंत मोरेश्वदेवस्थळी** ₹ १,००,०००/-

**श्री. मोरेश्वराजाराम आजगावकर** ₹ १,००,०००/-

**श्रीमती सुषमा सुरेश महाजन** ₹ १,००,०००/-
ह्यांच्या पति स्व. सुरेश राजाराम महाजन मातोश्री स्व. लीला अनंत खानोलकर, पिताश्री स्व. अनंत परशुराम खानोलकर स्मरणार्थ

**श्रीमती जयश्री तुकाराम वालावलकर** ₹ १,००,०००/-
(स्व. तुकाराम कान्होबा वालावलकर यांचे स्मरणार्थ)

**श्रीमती सुचेता एस. देसाई** (डोंबीवली) ₹ १,००,०००/-
(आई स्व. स्नेहलता बाबाजी सरनाईक वडिल कै. बाबाजी राजाराम सरनाईक यांच्या स्मरणार्थ)

**डॉ. चंद्रकांत वसंतराव नाईक** ₹ ७५,०००/-
**(स्व. श्यामला चंद्रकांत नाईक स्मरणार्थ वैद्यकिय उपचार)**

**श्री. शिवराम वासुदेव तेंडोलकर व सौ. विजया शिवराम तेंडोलकर** ₹ ७५,०००/

**श्रीमती पल्लवी कृष्णाजी प्रभू** ₹ ७५,०००/
(वडील स्व. आत्माराम वासुदेव परुळेकर, आई स्व. निर्मला आत्माराम परुळेकर व भाऊ स्व. मधुसूदन आत्माराम परुळेकर ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्रीनिवास श्रीकृष्ण प्रभू केळूसकर** ₹ ५१,०००/-

**श्री. सुरेंद्र दत्तात्रय सामंत कोपराडकर**
(ज्येष्ठ बंधू स्व. श्री. जयंत दत्तात्रय सामंत कोपराडकर रा. वसई यांच्या स्मरणार्थ) ₹ ५१,०००/-

**M.V. Samant Charitable Trust** ₹ ५०,००१/-

**श्री. मोहन बी. सामंत** ₹ ५०,०००/-

**श्री. विजय सदानंद वालावलकर** ₹ ५०,०००/-

**सौ .प्रिती महेश ठाकूर दादर** ₹ ५०,०००/-
(आई स्व.सौ. सुधा सुधाकर धोंड हिच्या स्मरणार्थ)

**डॉ. रवींद्र बाबुराव तिरोडकर** ₹ ५०,०००/-
(आजोबा (मातामह) स्व. श्री. राजाराम रघुनाथ कोंडकर सामंत, मालवण ह्यांचे स्मरणार्थ)

**श्री. अशोक सुधाकर दाभोलकर** (मातोश्री स्व. प्रेमा सुधाकर दाभोलकर ह्यांचे स्मरणार्थ) ₹ ५०,०००/-

**श्री. दीपक पद्माकर परूळेकर** (सांताक्रुझ) ₹ ५०,०००/-
**(आई स्व. छाया पद्माकर परुळेकर हिचे स्मरणार्थ)**

**श्रीमती उषा शामराव पाटील** ₹ ५०,०००/-
**(स्व. शामराव शांताराम पाटील स्मरणार्थ)**

**श्रीमती स्नैहलता गजानन तिरोडकर** ₹ ५०,०००/-
(स्व. गजानन (दादा) तिरोडकर यांचे स्मरणार्थ)

**श्रीमती कुमुद जनार्दन तेंडूलकर (नेरूळ)** ₹ ४०,०००/-
(स्व. जनार्दन भास्कर तेंडूलकर यांच्या स्मरणार्थ),

**श्री. रोहित रजनीकांत नाईक** ₹ ४०,०००/-

**श्री. मधुसुदन शंकर तिरोडकर ठाणे** ₹३०,०००/-
(स्व.शंकर आपाजी खानोलकर व स्व. उमाबाई (मावशी), वडील स्व. शंकर वामन तिरोडकर ह्यांच्या स्मरणार्थ)



''स्वयंवर नाटकात माधवराव वालावलकर कृष्णाच्या भूमिकेत'' आणि बालगंधर्व रूक्मिणीच्या भूमिकेत.

आजगावकर. अशाप्रकारे कारकुनी कामाला राम राम ठोकून महिना दहा रूपये पगारावर नाटक कंपनीत माधवरावांचा प्रवेश झाला. पेढीच्या मालकाने मात्र कोणतीही अडवणूक न करता ''काम जमलं नाही तर परत या'' असं सांगत माधवरावांना माणुसकीचं पहिलं दर्शन घडवलं.

नारदाच्या कामाचा सराव केलेला असल्याने जवळ जवळ वर्षभर रामराज्य वसिष्ठ, सौभद्र नारद, मृच्छकटिक शर्विलक अशी सूत्रधारांची कामे ते करीत होते. १९१६ साली स्त्री भूमिका निभावणाऱ्या बापूराव पेंढारकरांचं या कंपनीत आगमन झालं आणि माधवरावांना एक सुशिक्षित, निर्व्यसनी, मितभाषी, वाचनाची प्रचंड आवड असलेल्या एका सद्गुणी कलाकाराचा जवळून सहवास लाभला.

केशवराव भोसल्यांच्या 'ललित कला दर्शन' कंपनीत सहा सात वर्षे राहिल्यामुळे त्यांच्या स्वभावगुणांचे अवलोकन माधवरावांनी जे केलं त्यातील एक दोन विशेष आपणही पाहूया. केशवराव भोसले पट्टीचे गायक होते. गायन हे त्यांचं वेड होतं त्यामुळे कोणत्याही गावी गेले की, गावातील गायकाच्या घरी जात. त्याला गाण्याचा आग्रह करीत व नंतर आपणही गाणे गाऊन दाखवीत. त्यामुळे केशवराव उत्तम गायक व एका कंपनीचे मालक असल्याचे लोकांपर्यंत सहजच पोहचत असे. दोन तीन तास गायन झाल्यानंतर आपल्या कंपनीचा कार्यक्रम कुठे व कधी आहे याची माहिती देत व सर्वांना येण्यासाठी नम्र विनंती करीत असत. त्यामुळे अनेक स्थानिक रसिक केशवरावांच्या कंपनीचा मुक्काम असेल तिथे गाणी ऐकायला जमत असत. केशवराव एकाच नाटकात तीन भूमिका करीत. त्यावरून कलाकाराने मानपान न मानता जे काम मिळेल ते तितक्याच ताकदीने रंगवायचं असतं ही फार मोठी शिकवण नवीन येणाऱ्या कलाकारांना दिली जात होती. (१९१६ ते १९२०) अशी पाच वर्षे केशवरावांनी महिना दहा रूपये पगार देऊन माधवरावांकडून हिशोबाची मांडणी व त्यातील बारकावे शिकून घेतले होते. अतिशय चोख आणि वेळच्यावेळी हिशोब करण्याच्या पद्धतीमुळे केशवराव भोसले यांची कंपनी नेहमीच सुखसमाधानात राहिली. नाट्यशिक्षण व गायन यात केशवराव माधवरावांचे गुरू होते तर हिशोबाच्या कामात माधवराव त्यांचे गुरू होते.

१९०८ सालची गोष्ट, माधवराव कारकुनी करीत असताना माधवरावांनी बॉम्बे थिएटरमध्ये जाऊन सुभद्रेच्या भूमिकेत बालगंधर्व, अर्जुन झालेले नानासाहेब जोगळेकर आणि कृष्णाच्या भूमिकेतील गणपतराव बोडस या महान हस्तींचं पहिलं दर्शन घेतलं होतं. 'अरसिक किती हा शेला' व 'किती सांगू तुला' ही बालगंधर्वांनी गायलेली गाणी अगदी समोरून ऐकली होती. पण भविष्यात आपण या नटसम्राटांबरोबर काम करू अशी पुसटशीही कल्पना त्यांना आली नव्हती.

केशवराव भोसले यांच्या प्रमाणेच निर्माता मामा वरेरकर यांना कॉलेज विद्यार्थी दिसणारा स्मार्ट तरूण कलाकार हवा होता. म्हणून 'संन्याशाचा संसार' आणि 'हाच मुलाचा बाप' या दोन्ही नाटकात माधवरावांना काम कारण्याची संधी मिळाली. 'हाच मुलाचा बाप' नाटकातील कॉलेजकुमार वसंताच्या भूमिकेमुळे माधवराव तरूण वर्गाच्या गळ्यातले ताईत बनले. अद्ययावत पोषाखातील गुलाब आणि वसंत ही केशवराव आणि माधवराव यांची जोडी फारच लोकप्रिय झाली. या वसंतानेच माधवरावांच्या नावाला प्रतिष्ठा मिळवून दिली.

मामा वरेरकर लिखित 'संन्याशाचा संसार' या नाटकात मामांना विवेकानंदांसारखा दिसणारा नट सापडला तो माधवरावांमध्ये. शंकराचार्यांची (त्यागराज) म्हणजे हुबेहूब दिसणाऱ्या विवेकानंदांच्या भूमिकेमुळे प्रेक्षकांनी नाटक डोक्यावर घेतलं. सुदैवाने याच प्रयोगाला प्रत्यक्ष लो. टिळक

## कर्करोगग्रस्त वैद्यकीय उपचार फंड

**स्व. सत्यभामा आत्माराम सामंत** ₹ २८.०००/-
आणि स्व. आत्माराम रावजी सामंत
उर्फ भाऊ नमस्कार ह्यांचे स्मरणार्थ

**श्री. बाबाजी राजाराम सरनाईक**
**(स्व. सौ. स्नेहलता बाबाजी सरनाईक**
ह्यांच्या स्मरणार्थ) ₹ २५,००१/-

**सरिता गवाणकर** ₹ २५,०००/-

**श्री. संजीव ए. दाभोलकर** ₹ २५,०००/-
(स्व.सौ.कुमुद व स्व.एकनाथ दाभोलकर स्मरणार्थ)

**श्री. दिगंबर पुजारी,** नरसोबावाडी ₹ २५,०००/-

**श्री. अरुण सुधाकर गोसावी** ₹ २५,०००.-
(स्व. कमलताई सुधाकर गोसावी स्मरणार्थ)

**सौ. अनिता नीतीन गायतोंडे** ₹ २५,०००/-
(पीताश्री कै. श्री. अरविंद रामकृष्ण सामंत नेवाळकर स्मरणार्थ)

**श्रीमती सुनीता शांताराम तेंडोलकर** ₹ २५,०००/-
(स्व. शांताराम दत्तात्रय तेंडोलकर यांच्या स्मरणार्थ)

**श्री. नरेंद्रश्री. श्रीमल (चैनई)** ₹ २५,०००/-

**नोबेल फार्मा** ₹ २५,०००/-

**लूपीन फार्मा-पी. ए. पाटील** ₹ २५,०००/-

**सौ. संध्या सुरेश प्रभू** ₹ २५,०००/-
(स्व. वत्सला भि. प्रभू हिच्या स्मरणार्थ)

**सौ. लता परमानंद देसाई**
**व श्री. परमानंद देसाई** ₹ २५,०००/-

**श्री. देवदत्त आत्माराम खानोलकर** ₹ २५,०००/-

**श्री. व्ही. जी. सामंत** ₹ २५,०००/-

**श्री. राधाकृष्ण शांताराम पाटील** ₹ २५,०००/-
(स्व. सौ. वसुंधरा राधाकृष्ण पाटील
ह्यांच्या स्मरणार्थ)

**डॉ. सरिता श्रीपाद झारापकर** ₹ २५,०००/-
(स्व.प्राचार्य श्रीपाद रामचंद्र झारापकर
ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्रीमती मोहना मोहन वालावलकर** ₹ २५,०००/-
**श्री. मोहन रमाकांत वालावलकर**

**Ms. SANKET LOGTESYS PVT. LTD.** ₹ २५,०००/-

**सौ. सुषमा सुभाष सामंत (अंधेरी)** ₹ २५,०००/-

**श्री. आप्पाजी गजानन सामंत-** ₹ २५,०००/-
(चुलते स्व. बाळकृष्ण आप्पाजी सामंत स्मरणार्थ)

**डॉ. सुरेश भास्कर आजगांवकर** ₹ २५,०००/-

**सौ. अनिता नीतीन गायतोंडे** ₹ २५,०००/-

**श्री. सुधाकर लक्ष्मण धोंड, (सायन)** ₹ २५,०००/-
(पत्नी कै.सौ. सुधा सुधाकर धोंड हिच्या स्मरणार्थ)

**श्री. निहार खानोलकर** ₹ २५,०००/

**सौ. श्रद्धा राहुल सामंत व**
**सौ. वीणा विष्णू प्रभू** ₹ २५,०००/-

**डॉ. जयश्री नाईक नातू** ₹ २५,०००/-

**सौ. शिल्पा जयंत रामदास व**
**श्री. विष्णू व्ही प्रभु** ₹ २५,०००/-

**श्रीमती सरोज खानोलकर (यंग)** ₹ २५,०००/-

**श्री. विद्याधर प्रभाकर वैद्य** ₹ २५,०००/-

**श्रीमती शुभांगी तुकाराम सामंत** ₹ २५,०००/-
(स्व. तुकाराम वामन सामंत ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्री. अविनाश रघुनाथ सामंत (माहिम)** ₹ २५,०००/-
(स्व. सुनंदा रघुनाथ सामंत व
स्व. रघुनाथ राजाराम सामंत यांच्या स्मरणार्थ)

**श्रीमती सरिता रमाकांत गवाणकर (गोरेगाव)** ₹ २५,०००/-

**श्रीमती पुष्पा दत्तात्रय दाभोळकर (गिरगाव)** ₹ २५,०००/-

**श्री. विठ्ठल आत्माराम सामंत** ₹ २५,०००/-
**(स्व.सौ. शुभा विठ्ठल सामंत हिसे स्मरणार्थ)**

**श्रीमती नीला भालचंद्र नाईक** ₹ २५,०००/-

**श्री. अरविंद आत्माराम खानोलकर** ₹ २५,०००/-

**श्री. राजेंद्र भिकाजी सामंत व सौ. वर्षा राजेंद्र सामंत** ₹ २५,०००/-
(स्व. विजया बा. सामंत, स्व. भिकाजी ल. सामंत, स्व. हरिभाई व. सामंत, स्व. सुधा द. ठाकूर व स्व. दत्तात्रय व. ठाकूर ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्री. सदानंद राजाराम सामंत** ₹ २५,०००/-

With Best Compliments From

TLD.
ESTD : 1916

**P. S. Samant**
Cell : 99250 83201

**M/s. Tukaram Laxman Desai**

**Wholesellers & Retailers-Metal Wares**

93-95, Kansara Chawl,
Kalbadevi Road, Mumbai - 400 002.
Tel. : (Shop) : 2242 8634
(Resi.) : 2388 5217.

हजर होते. मध्यंतरामध्ये टिळकांना सन्मानपूर्वक विंगेत नेण्यात आलं तेव्हां सर्व कलाकारांनी वाकून नमस्कार केला. इतरांप्रमाणेच माधवरावही वाकले पण त्यांना टिळकांनी वाकू दिलं नाही. टिळक माधवरावांना म्हणाले होते, ''यावेळी तुम्ही विवेकानंदांच्या वेषात आहात. त्या थोर माणसाचा नमस्कार मी स्वीकार करू शकत नाही.'' टिळकांना विवेकानंदांबद्दल असलेला आदर आणि टिळकांच्या मनाचा मोठेपणा अशा दोन गोष्टींचे आदर्श पाठ आम्ही कलाकारांनी टिळकांच्या कृतीतून उचलले असे उद्‌गार माधवरावांनी काढले होते. माधवरावांना 'ललित कलेचा हत्ती' अशी पदवी देऊन जनमानसात आण्णा या मामा वरेरकरांचे ऋण माधवराव नेहमी मानीत असत.

माधवरावांची शंकराचार्यांची (त्यागराज) प्रभावी भूमिका बालगंधर्व यांच्या कानीं गेली आणि बालगंधर्वांनी माधवरावांना पगारवाढ देऊन गंधर्व नाटक मंडळीत येण्याचं निमंत्रण दिलं. त्याच दरम्याने केशवरावांशी मतभेद झाल्यामुळे माधवराव 'ललित कला दर्शन' ही कंपनी सोडून १९२० साली 'गंधर्व नाटक मंडळी'त रूजू झाले. दहा रूपयांवरून माधवरावांचा पगार चाळीस रूपयांवर गेला. या नाटक कंपनीत पहिली भूमिका केली ती 'विद्याहरण' नाटकातील शुक्राचार्यांची.त्याच दरम्याने गंधर्व नाटक मंडळीतील नायक पंढरपूरकर बुवा आजारी पडले आणि माधवरावांकडे मानापमान, संगीत सौभद्र, विद्याहरण, मृच्छकटीक, शाकुंतल अशी सर्वच नाटके चालून आली.

गणपतराव बोडस यांचं 'शाकुंतल' नाटक गंधर्व नाटक मंडळाने बसवलं. त्यात माधवरावांना दुष्यंताची भूमिका देण्यात आली होती. कारण नाटकातील एकशे दहा गाणी गाण्याची ताकद असलेला दुसरा नट नव्हता. माधवराव सर्व गाणी ठणकावून गात असत. 'गाणी गाणारा दुष्यंत' ही त्यांची ओळख झाली होती. त्या काळात नाटके रात्री नऊ ते सकाळी सहा पर्यंत चालत असत. एका रात्रीत गाण्याचा विक्रम माधवरावांनी केला होता. आता अशी वन्स मोअर घेत घेत रात्रभर चालणारी नाटकं नाहीत आणि गाण्याचा विक्रम मोडणारे गायकही नाहीत.

स्वयंवर नाटकातील 'रूक्मिणी' बालगंधर्व सादर करीत असत. वय वाढल्यावर बालगंधर्व रूक्मिणीच्या भूमिकेसाठी थोराड दिसू लागले तेव्हां तिला शोभेसा उंच धिप्पाड देहयष्टीचा श्रीकृष्ण म्हणून खाडिलकरांनी माधवरावांची निवड केली. या भूमिकेला माधवरावांनी योग्य न्याय दिला आणि कृष्ण म्हणजे माधवरावच असं समीकरण तयार झालं. म्हणूनच माधवरावांच्या नाट्य जीवनात कृष्णाच्या भूमिकेला विशेष महत्त्व होतं. ही भूमिका माधवरावांनी १९२१ पासून १९३१ पर्यंत दहा बारा वर्षे केली होती.

१९२३ साली गिरगावातील गुरूदास फोटो स्टुडिओत लावलेला माधवरावांचा श्रीकृष्णाच्या भूमिकेतील भव्य फोटो कित्येक वर्षे प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत होता. (१९८४ साली माधवरावांच्या गौरव समारंभ प्रसंगी हा फोटो वालावलकर कुटुंबियांनी स्नेहभावाने आपल्या ताब्यात घेतला.)

'विद्याहरण' नाटकातील शेवटच्या अंकातील दारूमुळे होणाऱ्या विनाशाचे वर्णन आपल्या खणखणीत आवाजात माधवराव इतक्या आवेशाने करीत की प्रेक्षकांच्या काळजाचा ठाव चुकत असे. एकदा तर हे नाटक चालू असताना माधवरावांना १०३ डिग्री ताप भरला होता. विंगेत डॉक्टर इंजक्शन घेऊन उभे होते. पण जराही चलबिचल न होता त्यांनी नाटक उत्तमरित्या पार पाडलं होतं. त्यामुळे बालगंधर्वांपासून सर्वांनीच त्यांच्या कामावरील निष्ठेचं फार फार कौतुक केलं होतं. द्रौपदी वस्त्रहरण या नाटकात माधवराव भीमाची भूमिका करीत. भीमाची वजनदार गदा फक्त तेच उचलू शकत असत. एकदा हुबळी मुक्कामी गंधर्व कंपनीचे हे नाटक लागले असता आंतरराष्ट्रीय ख्यातीचे गामा पेहलवान यांना कोणीतरी आयत्यावेळी आणलं पण हाऊसफुल असल्याने खास सोय करून त्यांना विंगेत बसवण्यात आलं. त्यांची सोय करताना तिथल्या गदा बाजूस करण्यात आल्या पण भीमाची गदा मात्र दोन माणसांनी उचलून बाजूस ठेवली हे गामा पेहलवान यांनी पाहिलं होतं. प्रत्यक्षात दुर्योधन व भीम यांचा रंगमंचावर प्रवेश झाला असता माधवरावांनी ती गदा लिलया उचलून खांद्यावर घेतली हे पाहून गामा आश्चर्यचकित झाले होते. त्यांनी शेजाऱ्याला सांगितलं,'' आजतक हमने कई पेहलवानोंके साथ कुस्ती खेली है मगर ये पेहलवान कभी हमारे सामने कैसे नही आया? ''शेजाऱ्याने उत्तर दिलं होतं की'', गामासाहब, आप मैदानपे कुस्ती खेलते हो लेकिन ये कलाकार है और सिर्फ ड्रामामें ही कुस्ती खेलता है'' आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या गामा पेहलवानाने दाद द्यावी अशी दणकट शरीरयष्टी माधवरावांना लाभली होती.

१९४४ साली चित्रपट निर्माते व्ही. शांताराम यांच्या गाजलेल्या 'रामजोशी' चित्रपटात हंसा वाडकर यांनी नायिका, जयराम शिलेदार यांनी शाहीर रामजोशी आणि माधवरावांनी कवीवर्य मोरोपंत अशा भूमिका साकारल्या होत्या.

सिंधुदूर्ग जिल्हयातील सावंतवाडी हे माधवरावांचे जन्मस्थान. सावंतवाडी संस्थानचे पुण्यश्लोक बापूसाहेब खेमराज भोसले यांच्या दरबारी राजगायक म्हणून माधवरावांची ऊठबस होती. बापूसाहेबांनी दिलेली राजवस्त्रे आजही वालावलकर कुटुंबियांच्या संग्रही आहेत. १९४६ साली सावंतवाडीचे शिवरामराजे भोसले यांच्या राज्यरोहण

## स्व. लक्ष्मीबाई दि. खानोलकर व स्व. दिनकर खानोलकर सभागृह कोष :



**लक्ष्मीबाई खानोलकर**

आपल्या ज्ञातीतील एक दानशूर महिला स्व. लक्ष्मीबाई दिनकर खानोलकर (गोरेगाव) यांनी आपल्या मृत्यूपत्राद्वारे गोरेगाव (पूर्व) येथील नीलाश्री सोसायटीतील आपली सदनिका गौड ब्राह्मण सभेला दान केली आहे. त्यांनी आपल्या मृत्यूपत्रात व्यक्त केलेल्या इच्छेनुसार गौड ब्राह्मण सभेने त्यांच्या व त्यांच्या पतीच्या स्मृतिप्रीत्यर्थ ''**स्व. लक्ष्मीबाईदिनकर खानोलकर व स्व. दिनकर खानोलकर सभागृह कोष**'' फंडाची स्थापना केली असून भविष्यात या फंडाच्या रकमेतून भव्य सभागृह उभारण्यात येणार आहे. जागा, जमीनजुमला, निवासी घर दान करणारे किंवा **रु. ५,००,०००/-(रुपये पाच लाख)** व त्याहून अधिक रक्कम देणाऱ्या दात्यांचे फोटो त्यांची नावे सभागृहात लावण्यात येतील तसेच **रु. १,००,०००/- (रुपये एक लाख)** व त्याहून अधिक रक्कम देणाऱ्या दात्यांची नावे देखील सभागृहात लावण्यात येतील. या सर्व दानशूरांची नावे कायम स्वरूपात संस्थेच्या गौड ब्राह्मण त्रैमासिकात छापण्यात येतील. ज्ञातीतील दानशूरांनी संस्थेच्या ह्या प्रकल्पाला सढळ हस्ते देणग्या द्याव्यात ही विनंती.

---

## आतापर्यंत संस्थेला प्राप्त झालेल्या देणग्या यांचा तपशील

- **स्व. लक्ष्मीबाईदिनकर खानोलकर व स्व. दिनकर खानोलकर यांनी सभेला दान स्वरूपात दिलेल्या सदनिकेचे बाजारमूल्य** — रु. ९२,००,०००.००
- **स्व. लक्ष्मीबाई दिनकर खानोलकर व स्व. दिनकर खानोलकर ह्यांजकडून** — रु. ५,४३,७९८.५९
- **सौ. वंदना गुरुदास दाभोलकर, गोरेगाव (पूर्व) (वडील स्व. सदाशिव नारायण प्रभुपाटकर (मूळगाव-हुंबरट, ता. कणकवली) ह्यांच्या स्मृतिप्रत्यर्थ** — रु. १,०५,००१.००
- **श्री. सुरेंद्र दत्तात्रय सामंत कोपराडकर व सौ. स्नेहलता सुरेंद्र सामंत कोपराडकर, वसई (वडील स्व. दत्तात्रय त्रिंबक सामंत कोपराडकर आणि आई स्व. वत्सला दत्तात्रय सामंत कोपराडकर ह्यांच्या स्मरणार्थ.** — रु. १,०२,०००.००
- **शरयू पंढरीनाथ तेंडोलकर (कांदिवली)** — रु. ५०,०००.००

---

### अधिक माहितीसाठी संपर्क :

| **उमाकांत महाजन** | **मनीष दाभोलकर** | **रत्नाकर तेंडोलकर** | **सुभाष वाघ** |
|---|---|---|---|
| (कार्याध्यक्ष) | (खजिनदार) | (सरचिटणीस) | चिटणीस |
| ९६८९७८१७५० | ९८२१२५८०४७ | ९८१९१५९१४६ | ९९२०७५२४७९ |

---

**आपली देणगी ''गौड ब्राह्मण सभा'' या नावाने आपण पुढील खात्यात जमा करू शकता**

| Bank Name | Branch | Account No. | IFSC Code No. |
|---|---|---|---|
| SARASWAT CO-OP. BANK LTD. | GIRGAON | 002200100027556 | SRCB0000002 |

NEFT **किंवा खात्यात पैसे जमा केल्यास कृपया संस्थेस**
e-mail- gbs.girgaon@gmail.com **अथवा दू ध्वसी (०२२) २३८५००१५ अथवा पत्राद्वारे कळवावे.**

सोहळ्याचे प्रसंगी नयनरम्य रोषणाई करण्यात आली होती. त्या सोहळ्यात मंडपात उभारलेल्या मेघडंबरीच्या छताखाली माधवरावांनी दोन तास गायन केले होतं. स्वर्गीय असा तो सोहळा होता.

बडोदा येथे मैफील असताना आपल्या आधी कुणीतरी गावं अशी विनंती उस्ताद फैय्याजखान यांनी संयोजकांना केली. माधवरावांना गायला बसवण्यात आलं. त्यांचा आवाज ऐकून खुद्द फैय्याजखान म्हणाले होते, ''सुभान अल्लाह ! ऐसी आवाज मुझे मिलती तो मैं खुदाको स्वर्गसे पृथ्वीपर ले आता.''

१९८३ साली सौभद्र नाटकाचे दोनशे प्रयोग पूर्ण झाले म्हणून माधवरावांचा गुणगान गाणारा 'गौरव ग्रंथ' कवीवर्य वसंत बापट यांच्या अध्यक्षतेखाली प्रकाशित करण्यात आला. या समारंभाला पं. जितेंद्र अभिषेकी, संगीत दिग्दर्शक श्रीनिवास खळे, प्रभाकर कारेकर, अजीत कडकडे, निर्मला गोगटे, मिरा पणशीकर, शोभा गुर्टू, दाजी भाटवडेकर, भालजी पेंढारकर असे मान्यवर उपस्थित होते.

माधवरावांचा बालपणापासूनच भक्तिरसाकडे कल असल्यामुळे 'कान्होपात्रा' नाटकातील चोखोबाची भूमिका त्यांनी अजरामर केली होती. या भूमिकेमुळे नाटक इतकं तेजीत आलं की, माधवरावांना अमाप पैसा व प्रसिद्धी तर मिळालीच पण याहीपेक्षा आपण बालगंधर्व नाटक कंपनीचं कर्जफेड करण्यास मोलाची मदत करू शकलो या गोष्टीचा माधवरावांना मनस्वी आनंद झाला होता. हेच नाटक पाहून गोव्याच्या पोर्तुगीज मठाधिशांनी माधवरावांना 'भजनप्रेमी' ही पदवी देऊन गौरविलं होतं.

२२ ऑक्टोबर १९९० रोजी माधवरावांच्या जन्मशताब्दी निमित्त राजाराम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली कु.दे. गौड ब्राह्मण सभेने आयोजीत केलेल्या कार्यक्रमास नटवर्य कृष्णराव चोणकर, अनंत दामले, कान्होपात्रा यांचाही समकालीन कलाकार म्हणून सत्कार करण्यात आला होता.

असाच जन्मशताब्दी सोहळा एप्रिल १९९० मध्ये पुण्याच्या बालगंधर्व मंदिर नाट्यगृहात साजरा करण्यात आला त्यावेळी माधवरावांचा कृष्णाच्या भूमिकेतील फोटो पं. भीमसेन जोशी यांच्या हस्ते पुणे मनपा मार्फत बालगंधर्वांच्या शेजारी लावण्यात आला होता. हा बहुमान अद्याप तरी इतर कोणत्याही नटाला लाभलेला नाही.

महात्मा गांधीजी, लो. टिळक यांचेबद्दल माधवरावांना नितांत आदर होता. गंधर्व नाटक मंडळ ही कंपनी बडोद्याचे सयाजीराव महाराज यांची आश्रित कंपनी होती. त्यामुळे दरवर्षी



संत चोखामेळाच्या भूमिकेत माधवराव वालावलकर

त्यांच्या वाढदिवसाला बडोद्यास जाऊन कंपनी नाटक सादर करीत असे. १९२५-२६ च्या दरम्याने कंपनी बडोद्यास जात असता आयत्यावेळी विनायकराव पटवर्धन यांना जाणं शक्य नसल्याचं बालगंधर्वांना कळलं आणि त्यांच्या जागी माधवरावांना पाठविण्यात आलं. साबरमती आश्रमात दोन दिवस राहून सेवा करण्याचं भाग्य मिळालं याचा माधवरावांना मनस्वी आनंद झाला होता. आश्रमातील समानता त्यांना भावली होती. महात्माजींची सेवा आपल्या हातून घडली हेच त्यांच्यासाठी परमसुख होतं.

महात्माजींच्या निधनानंतर विसाव्या दिवशी त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी स. का. पाटील यांनी माधवरावांचा गायनाचा कार्यक्रम ठेवला होता.

माधवरावांनी गतकाळाच्या नोंदी केलेल्या नोंदींमध्ये बालगंधर्व माणूस म्हणून किती थोर होते हे सांगणारे अनेक प्रसंग वर्णिले आहेत. त्यातील काही विसावं शतक उजाडताना सामान्य माणसाच्या हाडीमासी नाटक रूजलं होतं. बालगंधर्वांच्या स्त्री भूमिकांमध्ये कुलीन स्त्रियांचं नटणं मुरडणं फारच सुंदर रितीने सादर केलं जात होतं. बालगंधर्व स्वतः तर

With Best Compliments From

# NSB PROPERTIES

B-8 Bageshri, Shankar Ghanekar Marg, Prabhadevi, Mumbai - 400 025.
Phones : 24463599, 24441360 Fax : 24448192
E-mail : nsbproperties@yahoo.com



NSB Properties is a constituent of the 40 years old NSB Group having interest in the fields of Training, Finance and Real Estate Development. NSB Properties is committed to develop landmark projects on a firm bedrock of Construction Quality and Customer Delight.

NSB Properties has completed several residential projects (including redevelopment) in Mumbai (Vile Parle, Goregaon, Dadar), Pune and Goa.

Do get in touch with us if you wish to re-develop your property.

भूमिका उत्तम वठवीत पण सह कलाकारालाही प्रोत्साहन देत असत. ते अतिशय निराभिमानी होते. बालगंधर्वांचा सहवास माधवरावांना १९२० ते १९५२ सालापर्यंत लाभला. बालगंधर्व म्हणजे 'लाख मोलाचा माणूस' असं माधवराव म्हणत. बालगंधर्वांमुळे माधवरावांनीही सर्वसामान्य स्त्री, आदर्श स्त्री, आधुनिक स्त्री, अस्सल घरंदाज ब्राह्मणी स्त्री अशा प्रतिमा वठवण्यात मोलाची भर घातली.

बालगंधर्व कंपनीमुळे माधवराव उदयास आले हे जरी खरं असलं तरी अण्णासाहेब किर्लोस्करांमुळे त्यांच्या किर्लोस्कर कंपनीत आपण घडलो, प्रसिद्धीस आलो याची जाणीव ठेवून बालगंधर्वांनी कंपनी सुरू केल्यापासून ती बंद करून सिनेमात जाईपर्यंत म्हणजे १९१३ ते १९३१ याकाळात दरवर्षी किर्लोस्करांचं वर्षश्राद्ध घातलं होतं. गुरूला कसा मान द्यावा हे कृतीतून बालगंधर्वानी शिकवलं. गंधर्व कंपनीत कलाकारांना कधीच अन्नाची कमतरता भासली नाही. उलट बालगंधर्व स्वतः येऊन आग्रहाने खायला लावीत असत. कंपनीमध्ये कौटुंबिक वातावरण असावं यादृष्टीने बालगंधर्व नेहमी दक्षता घेत असत. गंधर्व कंपनी ही बादशाही कंपनी होती. १९३१ साला नंतर मात्र कंपनीचं भवितव्य काही वेगळंच घडलं. सत्याग्रह, चळवळी वगैरे अनेक चळवळींचा परिणाम होऊन कंपनीचं उत्पादन घटलं आणि १९३१ साली बालगंधर्व यांना कंपनी बंद करणं भाग पडलं. बालगंधर्वांनी सिनेमाचा रस्ता धरला.

तर कान्होपात्रा नाटकात चोखोबाची भूमिका करणाऱ्या माधवरावांनी भजनाची वाट चोखाळली. आयुष्याच्या उत्तरार्धात गावोगावी किर्तने करून शेवटपर्यंत स्वतःच्या पायावर माधवराव उभे राहिले. पाच मुली व तीन मुलगे असा मोठा प्रपंच पत्नी पार्वतीबाईच्या साथीमुळे नाटक व्यवसायात जाऊनही अगदी दृष्ट लागण्यासारखा संसार त्यांनी निभावला. ते आयुष्यभर स्वावलंबी जीवन जगले.

माधवरावांची राहणी फारच साधी होती. लो. टिळक, म. गांधीजी यांच्या प्रभावामुळे त्यांनी कायम खादी वापरली. खादीचा सदरा, खादीचे पंचेवजा धोतर आणि खादीची टोपी या वेषात कधीच बदल केला नाही. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर कित्येक मंत्र्यांचा पेहराव बदलला पण माधवराव खादीशी एकनिष्ठ राहिले. गांधीजींच्या खूनानंतर त्यांच्या तत्वांची पायमल्ली करणारेच गांधीजींचे खरे खूनी आहेत ही त्यांची भावना होती.

ते अतिशय काटकसरी होते. नाटक कंपनी बंद झाल्यानंतरच्या काळातला हा किस्सा. गिरगावच्या कुडाळ देशकर निवासातून निघालेले माधवराव पु. ल. देशपांडे यांच्या घरी वरळी सीफेसवर चालत गेले होते. त्यांनी कधीच वाहन केलं नाही. ''पहिलं पाऊल टाकलं की दुसरं पडतं. मग दुसरं पाऊल हे पहिलं होतं. एकंदरीत काय तर फक्त दोनच पावलं तर मी चालतो'' असं साधं सरळ उत्तर त्यांनी पु. ल. यांना दिलं होतं. पु. ल. नी लगेचच वाया जाणाऱ्या वेळेबाबत विचारलं असता, ''आयुष्यभर नाटकाची वेळ पाळली. आता मी माझा राजा आहे. माझ्या इच्छेप्रमाणे मी माझा वेळ खर्च करतो'' असं सरळ तत्वज्ञान माधवरावांनी मांडलं आणि पु. लं. ची बोलतीच बंद केली. माधवरावांनी कधीही हॉटेलचा चहा आपण कोणाकडून फुकटात मिळतो म्हणून घेतला नाही की दुसऱ्यालाही पाजला नाही. जरी ते काटकसरी होते तरी त्यांच्या जवळ दानत होती. अखेरच्या काळात सावंतवाडीला रहायला गेले असता वाडीस येणाऱ्या कलाकार मंडळीस ते आग्रहाने घरी जेवू घालित असत. त्यावेळी बाजारहाट करताना भाव बघत नसत. बालगंधर्वांच्या सान्निध्यात राहिल्यामुळे माधवरावांच्या अंगी गायना बरोबरच नेहमीच शांत, मनमिळावू रहाणं, कोणालाही न दुखवणं आणि कामाशी प्रामाणिक व शिस्तशीर रहाणं हे गुण मुरत गेले. माधवरावांना आयुष्यात दोन मोठ्या कठीण प्रसंगांना सामोरं जावं लागलं.

मालवण मुक्कामी स्वयंवर नाटकाचा प्रयोग लागलेला होता. थंडीचे दिवस. खेड्यापाड्यातले लोक बैलगाड्या करून राहुट्या ठोकून मुक्कामाला होते. रात्री नाटक होणार होतं आणि त्याच दिवशी सकाळी त्यांची पहिली पत्नी वारल्याची दुःखद बातमी आली. मोठा बाका प्रसंग होता तो. आयुष्याच्या मध्यावर बसलेला हा पहिला धक्का. बालगंधर्वांनी प्रयोग रद्द करण्याचा निर्णय घेतला. परंतु माधवरावांनी तसं होऊ दिलं नाही. माधवरावांचा स्वभाव मेणाहून मऊ पण प्रसंगी वज्राहूनही कठोर असा होता. रसिक लोक आपल्या प्रेमाखातर दूरवरून मोठ्या कष्टाने इथवर आले आहेत. प्रेक्षक हेच आपले मायबाप. तेव्हां लोकांना नाराज करायचं नाही 'शो मस्ट गो ऑन' या तत्वानुसार माधवराव वागले आणि काळजावर दगड ठेवून त्यांनी तेवढ्याच ताकदीने भूमिका निभावली. स्वतःच्या डोक्यावर डोंगर कोसळलेला असतानाही लोकांची मने जपणारा व कर्तव्याशी एकनिष्ठ राहणारा, स्वामीनिष्ठा जपणारा असा कलाकार होते ते. आपण हाती घेतलेल्या कामात आपल्यामुळे अडसर येऊ नये ही त्यांची भावना असे. पैसे मोजून येणाऱ्या रसिकाला त्याचा मोबदला दिला पाहिजे व नोकरचाकरापासून सर्वांचा हिरमोड होऊ नये ही त्यांची विचारसरणी होती. जणूं संत वृत्तीच त्यांच्या शरीरात भिनली होती.

माधवरावांना दुसरा जबरदस्त धक्का दिला तो एका पतपेढीने. वास्तविक पाहता मुगभाट लेनमधील स्वतःच्या मालकीची तीन

*With Best Compliments From*

# M/s Gromotech Agrochem Pvt Ltd

E-40, MIDC, Islampur



# Shri Anang Babaji Mainkar

Vrindavan, Nakshatra Park,
Kolhapur.

मजली चाळ विकून आलेले पैसे त्यांनी ज्ञातीच्या पतपेढीत ठेवले होते. कारण नाटक व्यवसायामुळे त्यांना भाडेवसुली करणं, इमारतीची डागडुजी करणं या गोष्टी जमत नव्हत्या. पतपेढी कडून वर्षानुवर्षे त्यांना व्याज मिळत होतं. पुढे पतपेढी बुडाली. माधवरावांसाठी हा फार मोठा धक्का होता. पण त्याचा बाऊ न करता उलट माधवराव म्हणत, ''जे माझं नव्हतंच ते मला कसं मिळणार? मला कोणीही फसवलेलं नाही.''

उतार वयात बसलेला हा धक्का ते पेलवू शकले ते केवळ धीरगंभीर वृत्तीमुळेच. माधवरावांची व्यवसायावर निष्ठा होती. १९३१ च्या दरम्याने 'कान्होपात्रा' नाटक रंगभूनीवर आलं. या नाटकाची तालिम दोन वर्षे चालू होती. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे एकही दिवस माधवराव उशीरा पोहचले नाहीत की, गैरहजर राहिले नाहीत. वेळ पाळण्याची शिस्त त्यांच्या अंगी होती. कामात चुकारपणा करणं हे त्यांच्या स्वभावातच नव्हतं. या नाटकातील चोखोबाच्या भूमिकेचा त्यांना उर्वरित आयुष्यात फार फायदा झाला .

कान्होपात्रा नाटकामुळे त्यांच्या अतःकरणातील भक्तिरसाला जाग आली. त्यातूनच माधवरावांना हरी किर्तनाची गोडी लागली. वाचन, मनन आणि पाठांतर यात ते गुंग असत. त्यांना सुपारीच्या खांडाचंही व्यसन नव्हतं. कोणत्याही प्रसंगी न घाबरता समयसुचकतेने त्याला तोंड देण्याचा गुण माधवरावांपाशी होता. मृच्छकटिक नाटकात काहीवेळा चारूदत्त आणि काहीवेळा शर्विलक अशा दोन्ही भूमिका ते करीत असत. यावरून कोणत्याही भूमिकेसाठी माधवराव तयार असत व जवळ जवळ पूर्ण नाटक त्यांचं पाठ असे हे दिसून येतं. स्वतःच्याच भूमिकेवर अडून न राहणं हा त्यांचा विशेष गुण. 'जिथे कमी तिथे मी' म्हणत वेळ निभावण्याचं कसब त्यांच्या अंगी होतं.

एकदा 'विद्याहरण' नाटक चालू असताना त्यांना तीन डिग्री ताप होता. बालगंधर्वांनी प्रयोग रद्द करण्याचा विचार सुरू केला पण माधवरावांनी तसं होऊ दिलं नाही. कोणतंही औषध न घेता ते रंगभूमीवर उभे राहिले आणि शुक्राचार्यांची मोठमोठाली वाक्ये जराही न चुकता बोलून प्रचंड टाळ्याही घेतल्या होत्या. यापेक्षा मोठं बक्षीस ते कोणतं? याचाच अर्थ असा की, माधवरावांनी हुबेहूब विवेकानंद उभे केले होते. सुंदर आवाज, स्वच्छ वाणी आणि राजबिंड रूप हीच त्यांची संपदा होती. आशानिराशा नाटकात दरबारी, द्रौपदी नाटकात भीम, कान्होपात्रामध्ये चोखामेळा, अमृतसिद्धीमध्ये विद्याशंकर आणि मेनका नाटकात ज्वालामुखी या भूमिका माधवराव फारच सुंदर वठवत असत. त्यांच्या मुलांपैकी पुरूषोत्तम यांना पेटीची व कन्या निला यांना उत्तम गाण्याची देणगी वारसा हक्काने लाभली याचं त्यांना फार कौतुक होतं.

१९४४ साली चर्नी रोडला शतसांवत्सरिक नाट्य महोत्सव होणार होता. बालगंधर्व अध्यक्षस्थानी होते तर आचार्य अत्रे स्वागताध्यक्ष होते. अचानक गणपतराव बोडस यांनी कांचनभटाची भूमिका करण्यास नकार दिला. व्यवस्थापन मंडळाची पाचावर धारण बसली. बालगंधर्वांनी माधवरावांना कांचनभटाची भूमिका करण्यास सांगितलं. एक तर गुरूंची आज्ञा आणि दुसरं म्हणजे तालिम मास्तर गणपतराव यांची भूमिका वठवायची. माधवरावांची जणूं परीक्षाच होती ती. पण न कचरता माधवरावांनी काळवेळ पाहून चटकन निर्णय घेतला आणि ते उभे राहिले. पहाटे पर्यंत चाललेलं हे नाटक अप्रतिम रंगलं होतं. नाटक संपल्यावर बालगंधर्वानी विंगेत येऊन माधवरावांचे लाज राखल्याबद्दल आभार मानले होते. गुरूचा तो शब्द ऐकून माधवरावांना खूप धन्यता वाटली होती.

माधवराव माणूस म्हणून फार मोठे होते. नटवर्य बापूराव मानेंच्या पडत्या काळात स्वतःच्या बोटातील सल्ले व पन्नास रूपये काढून देणारे माधवराव म्हणजे माणुसकीचा कळस होता. लोकांचं जे प्रेम लाभतंय ते खरं गंधर्व नाटक मंडळीवर नसून नटसम्राट बालगंधर्वांवर आहे हे माधवराव ओळखून होते. कितीही झालं तरी आपण बांडगूळ आहोत. मोठ्या वृक्षाच्या छायेत लहान झाडं वाढत नाहीत याची त्यांना जाणीव होती. आपले अन्नदाते, आपले गुरू वंदनीय बालगंधर्व यांना त्यांच्या पडत्या काळात माधवरावांनी साथ दिली.

नाट्याचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर, देवल, गडकरी, खाडिलकर, यशवंतराव टिपणीस, मामा वरेरकर अशा मातब्बर नाटककारांच्या कलाकृती सादर करण्याचं आणि नटश्रेष्ठ केशवराव भोसले, नटसम्राट बालगंधर्व, नटवर्य गणपतराव बोडस, विनायकबोवा पटवर्धन , मास्तर कृष्णराव आणि लोंढे अशा प्रथम श्रेणीच्या नटरत्नांबरोबर रंगभूमीवर प्रकट होण्याचे भाग्य माधवराव यांना लाभलं होतं.

माधवरावांनी 'रामजोशी' या एकाच चित्रपटात मोरोपंत यांची अजरामर भूमिका साकारली होती. त्यांचं खूप कौतुकही झालं होतं पण पुढे कौटुंबिक व सामाजिक विरोधामुळे त्यांनी चित्रपटातील भूमिका नाकारल्या होत्या.

त्याकाळी आपल्याकडे ध्वनीमुद्रण करण्याची सुविधा हवी तशी उपलब्ध नसल्याने जर्मनीतून तयार केलेल्या ध्वनीमुद्रिका आजही त्यांच्या नातवंडांकडे उपलब्ध आहेत. वाईट वाटतं ते या गोष्टीचं की, आजच्या सारखी प्रसिद्धीची माध्यमे नसल्याने या अफाट ताकदीच्या कलाकाराला लोकप्रियता असूनही प्रसिद्धी

*With Best Compliments From*

**Tel. : 022 4255 1414**
**Telefax : 2624 8589/65**

# MAHARASHTRA SOCIETIES WELFARE ASSOCIATION

(Regd. No. : Mumbai/1054/2002/GBBSD)

**-: H. O. :-**

A-2/302, Laram Centre, Opp. Railway Station,
Near Bus Depot, Andheri (W), Mumbai - 400 058

E-mail : mswa.hsg@gmail.com
Website : www.mswahousing.org
www.deemedconveyance.com

लाभली नाही हे आमच्या ज्ञातीचं दुर्दैव. असो. कालाय तस्मै नमः !

अशा या महान कलाकाराच्या आठवणी सांगाव्या तितक्या कमीच. पण त्यांच्या महत्वाच्या भूमिकांवर एक नजर टाकल्याशिवाय आपण पुढे जाऊच शकत नाही.

१. राक्षसी महत्वाकांक्षा - विक्रांत

२. हाच मुलाचा बाप - वसंत

३. मृच्छकटिक - चारूदत्त

४. संन्याशाचा संसार - त्यागराज

५. मानापमान - धैर्यधर

६. सौभद्र - कृष्ण, बलराम व अर्जून

७. संगीत मेनका - ज्वालामुखी

८. शाकुंतल- दुष्यंत

९. एकच प्याला - रामलाल

१०. विद्याहरण - शुक्राचार्य

११. द्रौपदी वस्त्रहरण - भीम

१२. स्वयंवर- कृष्ण (सलग १२ वर्षे)

१३. अमृत सिद्धी - विद्याधर

१४. आशा निराशा - दरबारी

१५. विधी लिखीत - (नोंद नाही)

१६. कान्होपात्रा - चोखोबा

नवशक्ती, नवाकाळ, आलमगीर, वैनतेय सावंतवाडी, मोहिनी, मराठा, पुणे स्वराज्य, गोमंतक गोवा, इंडियन एक्सप्रेस, म.टा., लोकसत्ता अशा अनेक वर्तमानपत्रांनी त्यांच्या कार्याची दखल घेतली होती.

सिंधुदुर्ग जिल्ह्याने अनेक कलावंत, उद्योगपती, राजकारणी यांना जन्म दिला. या जिल्ह्याचे पहिले नाव रत्नागिरी होते. अनेक रत्नांची खाण म्हणून कोकणकिनारा कृतार्थ झाला आहे. त्याच रत्नांपैकी माधवराव वालावलकर हे रत्न असल्याचा ज्ञातीबांधवांना निश्चतच अभिमान आहे. माधवरावांना आमचा मानाचा मुजरा.

**गीता परूळेकर**

मोबा.: ९१७२३२५०३१

❑ ❑ ❑

*With Best Compliments From*

PHONDA GHAT PHARMACY

Honey ✦ Gulkand ✦ Bel-Amla Muramba
✦ Rose water ✦ Ayurvedic Medicines



PHONDAGHAT HONEY





1-2, Shanti Building, Mogul Lane,
Mahim (West), Mumbai 400 016.
Ph.: 2432 8542 Mob.: 9820070545
E-mail : phondaghat_pharmacy@hotmail.com

With Best Compliments From



**Founder - Late Shri Dattatreya Ramchandra Samant**


# M/s. SHRIRAM WAREHOUSING AGENCY



14/16, Arches, Below Mahalaxmi Bridge,
Race Course Side, Dr. E. Moses Road,
Mahalaxmi, Mumbai - 400 034.
**Phone : 23549584**

# पुरूषोत्तम वालावलकर

जन्मः ११.०६.१९२३



पुरूषोत्तम वालावलकर

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पेटीवादक, संगीत क्षेत्रातील 'मास्टर'तर इतरांचे 'दादा' म्हणजेच पुरूषोत्तम माधवराव वालावलकर, यांचं जीवनचरित्र आज आपण पाहणार आहोत. बालगंधर्व कंपनीचा उजवा हात म्हणून नावाजले गेलेले नंबर वनचे गायक कलाकार माधवराव वालावलकर यांचे हे चिरंजीव.

दादांच्या मनमोकळ्या खिलाडू वृत्तीकडून मी लेखनास सुरूवात करते.

व्हिजिटींग कार्डवरची 'एफ. आर. एन. एम'. ही अक्षरे पाहून भारताच्या माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी आणि ब्रिटनची राणी व्हिक्टोरिया यांना ज्यांनी बुचकळ्यात टाकलं होतं व या बिरूदावलीचा अर्थ स्पष्ट करून त्यांची करमणूक केली होती तेच हे पेटीवादक 'मास्टर' वालावलकर. 'एफ. आर. एन. एम.' हे गौडबंगाल होतं तरी काय? ही कोणती पदवी?

ही पदवी आहे वालावलकर विद्यापिठाची. दादांनीच स्वतःला दिलेली. हाच तर मजेदार किस्सा प्रथम पाहू. 'एफ.आर.एन.एम'. म्हणजेच 'फॉरेन रीटर्न नॉन मॅट्रीक'. १९८२ च्या काळात आजच्यासारखं घरट्या गणिक परदेशी जाणारं कुणी नव्हतं आणि ते सुद्धा पदवी नसेल तर नाहीच नाही. अशा काळात शालांत परीक्षा पास न झालेल्या मुलाने तारूण्यात परदेश दौरा करणं ही खरोखरच एक आश्चर्यजनक बाब होती. विशेष म्हणजे परदेशातून आल्यावर जनलज्जेची जराही तमा न बाळगता दरवाज्याची पाटी आणि स्वतःचं व्हिजिटींग कार्ड या दोन्हींवर एफ.आर.एन.एम. असा अभिमानाने उल्लेख करणारे पुरूषोत्तम वालावलकर हे नक्कीच जगावेगळे होते असं म्हटलं तर चूक ठरणार नाही. पुरूषोत्तम वालावलकर हे खरोखरच पेटी वादनाचं एक विद्यापिठच होते. डॉ. कित्तूर, डॉ. हेरवाडकर, डॉ. परांजपे, सुधीर देशपांडे अशा कित्येकांनी दादांचं शिष्यत्व पत्करून त्यांचा गंडा बांधून घेतला होता. बेळगावचे उद्योगपती गोगटे यांच्या पत्नी व नंतर त्यांची कन्या दादांच्या शिष्या होत्या. एकंदरीत काय तर डॉक्टर, इंजिनीयर, उद्योगपती अशा विविध क्षेत्रातील लोकांसाठी दादांच्या पेटीवादनाचं दालन सदैव उघडं असे.

दादांविषयी लिहायला घेतलं आणि डोळ्यांसमोर उभ्या राहिल्या त्या गानकोकिळा लतादीदी. दोघांच्याही कलेची सुरूवात अगदी बालवयात आणि ती देखील दोघांच्याही वडिलांच्या नकळत झालेली. लतादीदींनी वडिलांकडून शिक्षण न घेताच पहिला सूर लावला तेव्हां मास्टर दीनानाथ यांच्या ज्या भावना होत्या त्याच भावना दादांनी पहिल्यांदा पेटीवादन केलं तेव्हां नटसम्राट माधवराव वालावलकर यांच्याही होत्या. तो प्रसंग असा होता.

बेळगावला गंधर्व नाटक मंडळीचा संगीत सौभद्र नाटकाचा प्रयोग चालू होता. पहिला अंक सुंदररित्या पार पडला आणि दुसऱ्या अंकात पेटीवर बसलेले अनंतराव लिमये घेरी येऊन पडले. बालगंधर्वांच्या लक्षात येताच त्यांनी हाफ चड्डीत विंगेत असलेल्या पुरूषोत्तमला डोळ्यांनीच पेटीवर बसण्याचा इशारा केला. वडिलांना काही विचारण्याएवढी उसंतच नव्हती. छोटा पुरूषोत्तम पेटीवर बसला आणि लगेचच 'धर्ममम ही काया' हे पद सुरू झालं. टच देऊन पद सुरू केलं आणि उत्तमप्रकारे पद सादर झालं. टाळ्यांचा कडकडाट झाला. त्याच्या नंतर 'जगला कशासी चेला' या पदाने तर वन्स मोअर घेतला. वादक कोण हे बाहेर कोणालाच कळलं नव्हतं.

यापेक्षा महत्वाची गोष्ट म्हणजे दुर्योधनाची भूमिका करणारे जयराम शिलेदार यांनी नाटक संपता संपता विंगेतला छोटा पेटीवाला पाहिला आणि ते पुन्हा पुन्हा मागे वळून पाहतच राहिले. एक लहान मुलगा एवढा वेळ पेटीवर साथ देतोय यावर त्यांचा विश्वासच बसत नव्हता. नाटक संपल्यावर जयराम शिलेदार, बालगंधर्व यांनी पुरूषोत्तमला पाठीवर थोपटून शाब्बासकी तर दिलीच शिवाय बालगंधर्व यांनी माधवरावांना ''आज तुमच्या मुलाने लाज राखली. नाहीतर प्रयोग बंद करण्याचा बाका प्रसंग आला होता'' या शब्दात पुरूषोत्तमाचं कौतुक केलं. तेव्हां आनंदाश्रूंनी माधवरावांचे डोळे भरून आले होते. मास्टर दिनानाथ आणि

*With Best Compliments From*



**CUSTOM HOUSE AGENT NO. 11-221**

# S. N. Mainkar & Sons

Founded by :

**Late Shri S. N. Mainkar**
**in 1947**

**Office :**
D-901, Raikar Chamber,
Near Nilkanth Garden
& Jain Temple,
Govandi Station Road,
Govandi (E), Mumbai-88.

**Regd. Office :**
2nd Floor, "VTDEOCON"
Calicut Street, Mumbai 400 001.

Tel. : 65093227 / 65094408
Email : datsan@vsnl.com / prashant@snmainkar.com
Mobile : D. R. Mainkar - 9820078791

नटसम्राट माधवराव या दोघांनाही त्यांच्या मुलांनी दिलेले हे सुखद धक्के. साम्य लक्षात आलं म्हणून नोंद केली.

दादांचा जन्म मळगाव येथे झाला. मळगावच्या गोपाळबोध स्वामींची दादा म्हणजे दहावी पिढी. किर्तनकार पंढरीनाथ गोसावी यांच्याबरोबर दादा नेहमी किर्तनास बसत. त्यामुळे गायन, वादनाची गोडी वाढत गेली आणि दादा कलेकडे झुकत गेले. वडील माधवराव वालावलकर बालगंधर्व कंपनीचे नामवंत गायक कलाकार असल्याने दादांचं बालपण बालगंधर्व नाटक कंपनीत गेलं. पेटी वादनाचे त्यांचे गुरू होते पं. विठ्ठलराव कोरगावकर, पं. हणमंतराव वाळवेकर आणि पं. गोविंदराव टेंबे. त्यांनी विठ्ठलरावांकडे किराणा घराण्याच्या, हणमंतरावांकडे आग्रा घराण्याच्या आणि गोविंदरावांकडे जयपूर घराण्याच्या गायकी अंगाचं पेटीवादन शिकून घेतलं होतं. याशिवाय बालगंधर्व, शिवरामबुवा वझे, कागलकरबुवा अशा संगीत क्षेत्रात हिमालयाची उंची गाठलेल्या कलाकारांचा सहवास त्यांना लाभला. त्यामुळे वयाच्या सातव्या वर्षापासूनच दादांवर पेटीवादन आणि गायनाचे संस्कार झाले आणि कलेच्या रूचीमुळे दादांना अभ्यासाचा तिटकारा वाटू लागला. त्याकाळी गुरूंनी हातचं राखून शिकवण्याची एक पद्धत होती. पण तिन्ही गुरूंकडून दादांनी मोठ्या शिताफीने पेटीचे बारकावे आत्मसात केले होते. पेटी व ऑर्गन या दोघांतही दादा निपुण होते.

१९४० ते १९५७ अशी सतरा वर्षे बेळगावला बालगंधर्व मंडळीतील विठ्ठलराव कोरगावकर यांच्या घरी राहून पडेल ते काम करून त्यांनी पेटीची साधना केली. गायकाला साथ देणाऱ्या पध्दतीचं शिक्षण घेतलं. पण त्याच बरोबर जिद्दीने प्रचंड रियाज करून त्यांनी सोलो वादनातही उत्तम गती मिळवली होती. म्हणूनच तर परदेशात सोलो वादन करून दादांनी स्वतःचा ठसा उमटवला होता.

असे हे दादा स्वभावाने जितके मोकळे ढाकळे होते तितकेच अतिशय नम्र व शांत होते. पुढे ते आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पेटीवादक बनले पण घरात हाफ पंचा व बंडी आणि बाहेर सदरा, पायजमा हा वेष काही त्यांनी बदलला नाही. परदेशाची वारी ऐन तारूण्यात होऊनही त्यांच्या साध्या मराठमोळ्या पेहरावात काडीचाही बदल झाला नाही. विशेष म्हणजे स्वतः नेहमी प्रसन्न राहून इतरांना



२००७ साली बालगंधर्व पुरस्कार स्विकारताना

हसवायचं हा त्यांचा खास गुण होता. वाणीवर सरस्वती खेळत असल्याने ते जिथे जात तिथे आनंदी वातावरण असे. घरात एकदा का मांडी घालून पेटीवर बसले की त्यांचं ताठ शरीर, कोकणी पेहराव, प्रसन्न मुखकमल पाहून कोणी महान संत साधना करीत आहे असंच मला वाटे. माझ्या मावशीचे दीर असल्याने त्यांचं हे रूप मी स्वतः ग्रँटरोडच्या घरी पाहिलेलं आहे. दादा मोठमोठ्या गायकांच्या गाण्याच्या लकबींची हुबेहूब नक्कल करीत असत. अगदी बालगंधर्वांची सुध्दा. त्यावेळी सहकलाकारांची हसून हसून मुरकुंडी वळत असे.

ग्रँटरोडला मोठा भाऊ राम वालावलकर (मावशीचे मिस्टर) आणि दादा हे दोन्ही बंधू एकत्र नांदत होते. त्यावेळी त्यांच्या घरासमोर राहणाऱ्या शोभा गुर्टू, मागच्या खेतवाडीतील अभिषेकबुवा यांचा सहवास दादांना फार जवळून लाभला. शोभा गुर्टू यांनी तर दादांना भाऊ मानलं होतं. दादांच्या पत्नी शुभलक्ष्मी या गृहिणी होत्या. घरात कितीही थोर मंडळी आली तरी त्याकाळच्या रिवाजानुसार वहिनी कधीही बैठकीच्या खोलीत डोकावल्या नाहीत. दादा सतत रियाज व कार्यक्रमात गुंतलेले असल्याने एक उत्तम गृहिणी म्हणून त्या कर्तव्यदक्ष राहिल्या. दादांसाठी वहिनीचं स्थान 'गृहलक्ष्मी'चं होतं. जेवणातील दादांचा अत्यंत प्रिय पदार्थ म्हणजे तळलेले मासे. सुरूवातीच्या काळात परिस्थिती बिकट असतानाही तळलेल्या तुकडीशिवाय दादांच्या घशाखाली घास कधी उतरला नाही. कायम मांडी घालून ताठ बसणं आणि पुढ्यात पाटावर ताट ठेवून जेवणं ही त्यांची जेवणाची पद्धत होती.

With Best Compliments From

# ANATEK SERVICES PVT. LTD.

8, Valmiki Apartment, C.S.T. Road,
Kalina, Mumbai 400 098.
Tel.: 2610 9608 / 4285, 2615 5475 / 76
Fax : 2610 4121
E-mail : anasales@rediffmail.com / anatek@vsnl.com

घरी असताना तासनतास बसून रियाज करणं व रात्रीच्या जेवणानंतर न चुकता बाहेरच्या त्या लांबलचक गॅलरीत अर्धा तास शतपावली घालणं हा त्यांचा नेम होता. स्वभावाने नम्र, शांत, सुस्वभावी, गोड वाणीचे दादा घरात उपस्थित असले की, घरात उत्साहाचं वतावरण दिसे. पैसा जपून वापरण्यावर त्यांचा कटाक्ष असे.

ग्रँटरोडचं घर तीन खोल्यांचं व प्रचंड मोठं होतं. बाहेरचा दिवाणखाना खूप ऐसपैस असल्याने गायकांसाठी ती जागा म्हणजे मोठी पर्वणी होती. शोभाताई, अभिषेकबुवा, सुरेश हळदणकर असे पूर्वीचे नामवंत गायक दादांच्या घरी येऊन तासन्तास गाण्याचा सराव करीत. त्यांच्या मैफिली तर रात्र रात्र चालत. दादांवर सगळेच खूष असत. दादांनी सूर धरला की कोणाला बोलवावे लागत नसे. दर्दी लोकांचे पाय आपोआपच त्यांच्या घरी वळत असत. 'कट्यार काळजात घुसली' सारख्या कित्येक नामवंत नाटकातील गीतांना दादांच्या घरी चाली लावण्यात आल्या होत्या. दादांच्या या घराला खुद्द बालगंधर्वांचेही अनेकवेळा पाय लागले होते. अशा या दादांची गुणवैशिष्ट्ये सांगणारे अनेक किस्से आहेत. त्यातील काही १९४५ साली बेळगाव आर्ट सर्कलमध्ये खाँ साहेब बडे गुलाम अली यांचं गाणं होतं. त्यांचे तीन पेटीवाले साथीला होतेच. पण साहेबांनी त्यांना उठवून छोट्या पुरूषोत्तमला बसण्यास सांगितलं. त्यांच्या समोर बसणं म्हणजे मोठं धाडसच होतं. परमेश्वर कृपेने साथ उत्तम झाली. खुद्द खाँ साहेबांनीच शाब्बासकी देऊन कौतुक केलं होतं. त्यावेळी सुद्धा माधवरावांचे डोळे लेकाचं कौतुक पाहून भरून आले होते.

इंग्लंडच्या राजमाता आणि युवराज चार्ल्स यांना भारतीय संगीताची आवड होती. त्यांच्या निमंत्रणावरून शुभा मुद्गल दादांना पेटीची साथ देण्यासाठी लंडनला घेऊन गेल्या असता बकिंगहॅम पॅलेसमध्ये झालेल्या कार्यक्रमात दादांनी पेटीची उत्तम साथ देऊन स्वतःचा ठसा उमटवला होता. राणीने केलेला पाहुणचार पाहून सर्व मंडळी चकित झाली होती. डोळे दिपवून टाकणारं वैभव याचि डोळा याचि देही बघून दादा धन्य झाले होते.

१९१७ साली पं. भीमसेन जोशींबरोबर एका महोत्सवासाठी दादा व नाना मुळे हे साथीदार अमेरिकेस गेले होते. पण जोशीबुवांच्या आधी मायकेल जॅक्सनचा कार्यक्रम होता. थोड्या नाखुषीनेच त्यांनी मायकेलचा कार्यक्रम पाहिला. मात्र त्याचे नृत्य पाहून सर्वांनी 'याच्या देहात हाडे आहेत की नाहीत?' असं म्हणत तोंडात बोटे घातली होती. थोड्यावेळाने भीमसेनजींचं गाणं सुरू झालं. मायकेलना दादांच्या पेटीवादनाने भारावून टाकलं. कार्यक्रम संपल्यावर मायकेल यांनी 'मार्व्हलस! मिरॅक्युलस!' असं म्हणत स्वतःच्या गळ्यातील माळ या संगीत मास्टरच्या गळ्यात घातली होती. भीमसेन जोशी सुध्दा दादांसारखेच विनोदी होते.ते स्वभावानुसार बोलून गेले, ''आम्ही तासभर बोंबललो आणि माळ पडली तुमच्या गळ्यात.'' त्यावेळी उपस्थितांमध्ये हश्शा पिकला होता. सुमारे पंचवीस हजार लोकांच्या पुढ्यात घडलेल्या या घटनेने दादांचं पेटी वादनातील श्रेष्ठत्व सिद्ध केलं होतं. भीमसेन जोशींनी दादांचे अनेक 'सोलो' कार्यक्रम हाती आयोजून स्वतः त्यांना दादा दिली. जोशींच्या एकंदर वीस बावीस कार्यक्रमात दादांचं नाव खूप गाजलं होतं. त्यानंतर परदेशस्थित काही भारतीय मुलांनी पुरूषोत्तमरावांचं शिष्यत्व पत्करलं होतं. शालेय शिक्षण अपूर्ण असतानाही परदेशात जाऊन आपल्या कलेने वालावलकर घराण्याचं नाव उंचावणारे पुरूषोत्तमराव हे आपल्या ज्ञातीतील कलेचे मानबिंदू आहेत.



''भारत रत्न पं. भीमसेन जोशी यांची टोकियोत साथ करतांना''
पुरुषोत्तम वालावलकर

दादांनी कार्यक्रमाच्या निमित्ताने सतत तीस वर्षे सेंट जेम्स पॅलेस, लंडन, शिकागो, पॅरीस, स्टुटगार्ट, व्हिएन्ना, दुबई, अबुधाबी, बहरीन, स्टॅाकहोम व टोकियो असे अनेक परदेश दौरे केले होते. त्यापैकी वीस दौरे एकट्या अमेरिकेचे होते. अमेरिकनांना त्यांचा देश माहिती नसेल इतका तो दादांना

*With Best Compliments From*



**Founder - Late R. H. Samant**

# M/s. R. H. Samant & Sons Pvt. Ltd.

***Dealers of :***
*Industrial & Blasting Sand Glass & Foundry Grade*
*Silica Sand, Cement, Minerals, Construction Chemicals.*

**Authorised Distributors of :**

**M/s. AMBUJA CEMENT LTD.**
**M/s. KRISHNA CONCHEM PRODUCTS PVT. LTD.**

D/4, Brick Bunder, Hay Bunder Road, Mumbai - 400 033.
Tel.: 2372 3778 , 2371 5196 ● Fax : 91-022-2375 6334
E-mail : rhsamant@rediffmail.com

परिचित झाला होता.

अमृतसर येथील सुवर्ण मंदिरात तीन दिवसांची ठरलेली कान्फरन्स मुसळधार पावसामुळे दोन दिवसात आवरण्याचा निर्णय आयोजकांना घ्यावा लागला. त्यामुळे एकाच गायकाला तीन वेळा गावे लागले. गायक बदलत्या क्रमाने येत होते पण पेटीवर साथ देणाऱ्या दादांना बिलकूल विश्रांती नव्हती. त्यांनी सतत सतरा तास पेटी वाजवण्याचा विक्रम केला होता. यावरून दादांच्या संगीताबद्दलची निष्ठा, पेटीवरचं प्रेम आणि गायकाचा मान राखणं या गुणांचं दर्शन होतं. आजही दादांचा हा विक्रम मोडणारा पेटीवादक ऐकिवात तरी नाही.

कोलकत्याचे जयंत चॅटर्जींनी सांगितलेला प्रसंग वाचताना दादांच्या नम्र स्वभावाची व महानतेची ओळख होते. चॅटर्जींच्या घरी पं. उस्ताद विलायखाँ आणि दादांची गाठ पडली. दादांनी त्यांना १९४४ साली त्यांच्या तोंडून ऐकलेल्या बागेश्रीकानडाची बंदिश गाण्याची विनंती केली. उस्ताद साहेबांनी दादांचं समाधान होईपर्यंत ती गायली होती. आणि सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे दादांनी त्यांच्या पायाशी बसून आपले कान तृप्त केले होते. आपल्या बरोबरीने वर बसण्याची साहेबांची विनंती दादांनी प्रत्येकवेळी नाकारली आणि शेवटी त्यांना दादा म्हणाले होते की, ''मी आता तुमचा शिष्य आहे. तुम्ही माझे गुरू आहात. माझं स्थान हेच आहे.'' किती ही नम्रता! किती हा मनाचा मोठेपणा !

चॅटर्जींनी दादांच्या सहवासात अनुभवलेला हा आणखीन एक किस्सा. एकदा प्रजासत्ताक दिनी पद्म पुरस्कार मास्टरांनाच मिळणार असा संगीत क्षेत्रातील सर्वांचा होरा होता. म्हणजे सर्वांना खात्रीच होती. पण तो जाहीर झाला तो एका तिसऱ्याच व्यक्तिला. मास्टर, तुळशीदासजी वालावलकर, अप्पा जळगावकर अशी मान्यवर कलावंत मंडळी सोडून भलत्यालाच पुरस्कार गेला याचं दादांना वाटलं नसेल इतकं इतरांना वाईट वाटलं होतं. चॅटर्जींनी आपल्या मास्टरना विचारलं, आमच्यासारख्या संगीताच्या सच्चा श्रोत्यांसाठी तुम्ही प्रयत्न का केले नाहीत? (या पुरस्कारासाठी वेगळ्या प्रकारची बरीच मेहनत घ्यावी लागते. दादा त्या पठडीतले नव्हते.) आपले दादा, उत्तरले होते, ''मी जर असल्या प्रयत्नांच्या मागे लागलो असतो तर



(दिवंतगत) राजमात यांच्या हस्ते सेंट जेम्स पॅलेस येथे सत्कारस्विकारतांना



युवराज चार्ल्स पंडिजींचे स्वागत करतांना

माझी साधना वाया गेली असती. तुम्ही जे देता तेच खरं प्रेम व मान आहे जो माझ्या कलेला मिळतोय. अवॉर्डसाठी नाही.'' असे होते दादा निगर्वी, प्रामाणिक आणि पारदर्शी स्वभावाचे.

गोव्यातील पणजी येथे कला अकादमीने संगीताचार्य मास्टर वालावलकरांना खास आमंत्रित करून नवोदित कलाकारांसाठी पेटी वादनाची तीन दिवसांची कार्यशाळा ठेवली होती. तिथे दादांनी पेटीवादनाचे प्रात्यक्षिकाव्दारे वादनातले बारकावे स्पष्ट केले होते.

दादाचं शिक्षण नसल्याने त्यांना इंग्रजी तर बिलकूलच येत नसे पण बोलण्याची हौस दांडगी होती. या इंग्रजी भाषेवरूनही काही किस्से दादांच्या आयुष्यात घडलेत आणि दादांनी कोणताही आडपडदा न ठेवता ते तितकेच रसभरीत वर्णन करून इतरांना ऐकवले आहेत. उदा. अमेरिकेत 'भाकरी' विषयावर चर्चा चालू असताना कोणीतरी भाकरीचं स्पेलिंग विचारलं आणि दादा पटकन 'बेएचक्रीवाय' बोलून मोकळे झाले होते. लोकांच्या हशालाही तितक्याच मोकळेपणाने दाद देत असत. आपल्याला इंग्रजी येत नाही किंवा आपण शिक्षण घेतलं नाही याबाबतचा कोणताही न्यूनगंड त्यांच्या मनात कधीच नव्हता.

अमेरिकेत एकदा नाना मुळे आणि दादा फिरत असताना नानांना लघुशंकेला जायचं होतं. तिथल्या पोलिसापुढे नाना व दादा करंगळी वर करून दाखवत होते. तो बिचारा अनभिज्ञ. इंग्रजीतले त्याचे प्रश्न या दोघांनाही कळत नव्हते. शेवटी नानांनी त्याला 'लॅघ्वी, लॅघ्वी' सांगण्याचा प्रयत्न

# कुडाळदेशकर गौड ब्राह्मण को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.

२८, कुडाळदेशकर गौड ब्राह्मण निवास, जे. एस्. रोड, गिरगांव मुंबई ४०० ००४.

**स्थापना : १९२९ (नोंदणी क्र. ६५० ऑफ १९२९ दि. ३०-०७-१९२९)**

E-mail : kdgb.society@gmail.com

## सुलभ कर्ज योजना

### ❖ तारणावरील कर्ज ❖

मागणीच्या दिवशीच कर्ज वितरण
तारण वस्तू : सोने-दागिने, संस्थेच्या मुदत ठेव पावत्या इ. वर (७५%) पोस्टाची बचत पत्रे / किसान विकास पत्रे यावर (९०%)
तारणावर कर्ज फक्त सोमवार आणि बुधवार दिले जाईल.

### ❖ कर्ज व्याजाचा प्रचलित दर ❖

जामीनकीवरील कर्ज दरसाल १०%
तारणावरील कर्ज दरसाल ९.५०%

### ❖ बचत ठेव ❖

**व्याजाचा दर :** द.सा.द.शे. ४%

### ❖ कर्ज मर्यादा ❖

तारणावरील कर्ज रु. ३.०० लाख, शिवाय
जामीनकीवरील कर्ज : उद्योजकांसाठी रु. २.५० लाख,
इतर सभासदांसाठी रु. २.०० लाख

### ❖ मुदत ठेव योजना ❖

ठेव मुदत : ६ ते १२ महिने - ५.००%
१३ ते २४ महिने - ५.५०%
२५ ते ३७ महिने - ६.५०%

### ● कार्यकारी मंडळ सन २०१५-२० ●

| | | | |
|---|---|---|---|
| **श्री. रजनिकांत वासुदेव प्रभु** | अध्यक्ष | **श्री. पंढरीनाथ विठ्ठल सरनाईक** | सदस्य |
| **श्री. प्रफुल्ल जयवंत खानोलकर** | चिटणीस | **श्री. शैलेश शशीकांत सामंत** | सदस्य |
| **श्री. सुरेंद्रनाथ बाळकृष्ण ठाकूर** | सदस्य | **श्री. रत्नाकर प्रभाकर तेंडोलकर** | सदस्य |
| **सौ. अंजली अजित मातोंडकर** | सदस्या | **सौ. लता जयदीप सरनाईक** | सदस्या |
| **श्री. सतीश गजानन सामंत** | सहकार तज्ञ संचालक | **श्री. प्रभाकर बाळकृष्ण सामंत** | सहकार तज्ञ संचालक |

**साप्ताहिक सुट्टी : रविवार, सोम. ते शुक्र. स.८.३० ते ११.३० सायं. ४.०० ते ७.००**
**शनिवार अर्धा दिवस संध्याकाळी ४ ते ७ कार्यालय चालु राहिल.**

दूरध्वनी क्रमांक - मुख्य कार्यालय : २३८६ ०२९०
गोरेगाव कक्ष : २९२७ ५७७४ डोंबिवली कक्ष : ०२५१ २४५३८७६

**(ठेवी व कर्जासाठीच्या नियमांत वेळोवेळी आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील)**

**कृपया सभासदांनी आपले KYC अद्ययावत करावे.**

केला.पण ते तरी अमेरिकन पोलिसाला कसं कळणार होतं? अमेरिकेत भारतीय भरपूर असल्याने एका भारतीयाने ही अडचण लक्षात घेऊन या दोघांना मदत केली. खरं म्हणजे ते जिथे उभे होते तिथेच सार्वजनिक स्वच्छतालय (वॉशरूम) होतं. पण या दोघांना भाषेच्या प्रॉब्लेममुळे ते वाचता येणं तितकंच कठीण होतं. असो. वेळ तर निभावली.

एकदा तर भीमसेन जोशी कार्यक्रमासाठी कुटुंबासहित मेव्हण्याकडे डेट्रॉइटला गेले व दादा आणि नाना या दोघांना अमेरिकन बसने डेट्रॉइटला पाठवलं. वाटेत चेकींगसाठी एका अधिकाऱ्यानं नानांचा तबला आत नेला. तबला आहे तरी काय असं तो विचारत होता तर नाना तबला बडवल्याची नक्कल करून त्याला समजावत होते. पण त्या अधिकऱ्याला काहीच कळलं नाही. मग दादांनी भाता हलवून पेटीचे सूर दाबले. यावर तो भयंकर चिडला. तिघेही हमरीतुमरीवर आले तेव्हां बसमधील भारतीयांनी मध्यस्थी करून ड्रम व पियानो सारखी वाद्ये असल्याचं पटवून दिलं आणि दादा व नाना त्या अधिकाऱ्याच्या तावडीतून वाद्यांसह सुटले. आता मात्र या दोघांना कुठेही जायचं नाही अशी जोशींनी तंबी दिली होती.

अशा गमतीजमती जशा घडल्या तशाच्या तशा इथे आल्यावर दादा सांगत व ऐकणाऱ्यांचं हसून हसून पोट दुखे. कारण ते पेटी वादनात नं. एकचे असले तरी त्यांच्या स्वभावात अहंभाव नव्हता. असे होते दादा. प्रेमळ, शांत, दुसऱ्याला योग्य तो मान देणारे, बोलता बोलता विनोद करून हसविणारे, निःस्वार्थी आणि पेटीला देव मानणारे. पेटी वादनाबाबत दादांनी पुढील पाच तत्वे आयुष्यभर जपली होती. ते सांगत

१.पेटीचा हात काढा.२.पेटीला बोलतं करा. ३.सूरांच्या आत्म्याशी सूर संवाद साधा. ४.सूर धरणे व सूर सोडणे जाणा. ५.सूर व लय यांचा बरोबरीने मिलाप करा.

वडिलांचा वारसा परमेश्वर कृपेने आपल्याला लाभला आहे याची त्यांना पूर्ण जाणीव होती म्हणूनच तर कुठेही कार्यक्रमास जाताना ते आईबाबांचा फोटो सोबत नेत. प्रथम त्यांना वंदन करून नंतरच कार्यक्रम सुरू करीत असत. यावरून एक गोष्ट लक्षात येते की, कलाकार दादांनी आईवडिलांचा हात त्यांच्या जाण्यानंतरही फोटोच्या रूपाने मनात साठवून ठेवला, त्यांच्या आशीर्वादाची याचना केली म्हणूनच त्यांच्यावर दुसऱ्याचे पाय पकडण्याची वेळ कधी आलीच नाही. दादांचं व्यक्तिमत्व आणि वादन पाहून आपणहून देश परदेशची आमंत्रणे चालत आली आणि त्यांनी जातील तिथे स्वतःचा ठसा उमटवला.

पेटीची साथ देताना पेटीवादकाने गवय्याला पोषक अशीच साथ द्यायला हवी. पेटी अतिशय प्रामाणिक असते. तिचा प्रामाणिकपणा वादकाने जपलाच पाहिजे. अधूनमधून तंबोऱ्याचे सूर ऐकून त्या सुराबरोबर पेटीचे सूर जुळवून घ्यायचे असतात अशी ते पेटीच्या साथीची पथ्ये सांगत असत.

जसजसा काळ बदलला तसतसं दादांची साथ देण्याची गोडी कमी होत गेली. कारण परिश्रम करण्याची नव्या पिढीची तयारी नाही. नवनवीन सोयीसुविधांमुळे आवाज कमावण्यासाठी मेहनत घ्यायला कोणी तयार नाही. पेटी बोलली पाहिजे. अस्सल असली पाहिजे. स्वयंपूर्ण असली पाहिजे. पूर्वीसारखे गायक आता राहिले नाहीत असं स्पष्टपणे ते सांगत असत.


वालावलकर घराण्यातील हा कलेचा वारसा पुरूषोत्तमरावांप्रमाणेच त्यांच्या भगिनी वासंती आणि शशी या दोघींना लाभलेला आहे. दिल्ली आकाशवाणीवर काम केलेल्या वासंती या मेजर खानोलकर यांच्या पत्नी असून 'मिलिटरीची नाईटींग गेल' म्हणून त्या सर्वत्र परिचित आहेत. धाकटी बहीण शशी म्हणजेच सौ. नीला गाळवणकर या अर्नाळा येथे राहत असून त्याही गायनाचे अनेक कार्यक्रम संसार सांभाळून हौस म्हणून सादर करीत असत. विशेष म्हणजे दोघींनीही गायनाचं शिक्षण घेतलेलं नाही तरीही त्यांनी वर्क्तृत्व, गायन या कलांमध्ये अनेक बक्षिसे व ढाली मिळवलेल्या आहेत. अशा प्रकारे माधवरावांचा कलेचा वारसा त्यांच्या तीन मुलांना लाभला आणि या त्रिमूर्तीने घराण्याचं नाव उंचावलं.

पुरूषोत्तमरावांचे पुण्याचे पुत्र दामोदर हे पेटी वादनाचे कार्यक्रम करीत असत. आज माधवरावांची नात, रीमा या अमेरिकेत असून तिथे गायनाचे कार्यक्रम करीत असतात.

दादांना मिळालेल्या अनेक पुरस्कारांमधील आवर्जून उल्लेख करावा असे पुरस्कार :-

१.आय.टी.सी.चा एस.आर.ए. पुरस्कार कोलकत्ता

# हार्दिक शुभेच्छा !



लग्नाच्या रेशीम गाठी ह्या
स्वर्गातच बनवलेल्या असतात.
जोडीदाराची गरज दोन्ही व्यक्तींना
सम–समान असते,
आणि त्यासाठी मी मदत करते



संपर्क

## सौ. रोहीणी शशांक जोशी

लग न जुळवणी आणि लग न सबंधित सल्लागार

**(Match maker & Relationship Counselor)**

**मो. ०९३२००४६८६१**

E-mail : rohini_joshi777@yahoo.com

२.लीलाताई जळगावकर संवादिनी वादक पुरस्कार पुणे
३. संगीतकार पुरस्कार गांधर्व महाविद्यालय पुणे
४.बालगंधर्व पुरस्कार मुंबई

**– सौ . गीता परूळेकर**
बोरिवली
मोबाईल : ९१७२३ २५०३१

## केळुस श्री देवी भगवती माता वार्षिक लघुरूद्रोत्सव समारंभ २०१९

(सोमवार, दि. १२ व मंगळवार, दि. १३ ऑगस्ट २०१९)

## ''सस्नेह निमंत्रण''

भक्तजनहो,
सप्रेम नमस्कार वि.वि.

श्री देवी भगवती मातेचा वार्षिक लघुरूद्रौत्सव समारंभ श्रावण शु. १२ शके १९४१ सोमवार, दि. १२/८/२०१९ व श्रावण शु. १३ शके १९४१ मंगळवार, दि. १३/८/२०१९ रोजी केळुस येथे भक्तीमय, मंगलमय, उत्साह पूर्ण वातावरणांत श्री देवी भगवती मंदिरामध्ये संपन्न होणार असून सदरहू समारंभात अभिषेक, लघुरूद्र, हरिपाठ, आरती, महाप्रसाद, किर्तन आणि भजने आदि कार्यक्रम संपन्न होणार आहेत. आपण सर्व भक्जनांनी सहकुटुंब, सहपरिवार उपस्थित राहून श्री देवी भगवतीमातेचरणी आपली सेवा रूजू करावी व कृपाप्रसाद घ्यावा, ही विनंती.

आपले नम्र,

| | |
|---|---|
| **श्री. श्रीकृष्ण द. प्रभु** | **श्री. दिलीप मु. केळुसकर** |
| ९९६९००८३०२ | ९८२०४१८४१२ |
| अध्यक्ष | सरचिटणीस |

**श्री. चंद्रकांत अनंत राऊळ**
८२७५६७१५०९
सरचिटणीस (केळुस स्थानिक)
ता. वेगुर्ला, जि. सिधुदूर्ग.

॥ श्रीसाई नाथाय नम: ॥

# माझी प्रार्थना

काय मागितले? काय मिळाले?
मी शक्ती मागितली
तर देवाने मला संकटे दिली.
मी बलवान होण्यासाठी
मी शहाणपण मागितले
तर देवाने मला समस्या दिल्या,
सोडविण्यासाठी

मी ऐश्वर्य मागितले
तर देवाने मला बुद्धिमता
आणि ताकद दिली.
काम करण्यासाठी
मी धाडस मागितले
तर देवाने मला अडथळे दिले
पार करण्यासाठी
मी प्रेम मागितले
तर देवाने मला संकटग्रस्त
माणसे दिली, मदत करण्यासाठी
मी वर मागितला
तर देवाने मला संधी उपलब्ध केल्या.
मी जे मागितले
ते मला मिळाले नाही.
पण मला ज्याची गरज होती.
असे सर्व काही मला मिळाले

**डॉ. विलास रामकृष्ण देसाई**
अध्यक्ष- गौड ब्राह्मण संस्था, मुंबई.

# पू. श्री मुणगेकर महाराज



ह.भ.प. श्री. तुकाराम श्रीधर मुणगेकर (जॉबर) हे इचलकरंजी परिसरातील एक थोर संत म्हणून ओळखले जातात. 'आधी प्रपंच करावा नेटका', या उक्तीप्रमाणे, सहजपणे प्रपंच करून, योग्य वेळी परमार्था रत होऊन त्यांनी आपल्या जीवनाचे सार्थक करून घेतले. अध्यात्माच्या अभ्यासातून प्राप्त झालेल्या आनंदात सतत स्थित राहून हा आनंदाचा ठेवा सर्वांना सतत वाटत असतात. 'आत्मत्राने चोखडी । संत माझी रुपडी' । या संतोक्तीप्रमाणे त्यांच्या रुपाने जणू परमेश्वरच वावरत आहे, असे सर्वांना वाटते; अशा ह्या महात्म्याचे जीवन चरित्रावर टाकलेला हा एक प्रकाशझोत...

१९१९ साली इचलकरंजीसारख्या औद्योगिक शहरात जन्मलेल्या मुणगेकर महाराजांचे मूळ गाव देवगड तालुक्यातील मुणगे हे होय. बाबन प्रभू हा या कुडाळदेशकर ब्राह्मण घराण्याचा मूळ पुरुष. मालवण तालुक्यातील परुळ्याचा '**पुरुषोत्तम**' हे या घराण्याचे कुलदैवत. अशा तऱ्हेने कोकणची निसर्ग समृद्ध पार्श्वभूमी लाभलेल्या प्रभू घराण्यातील श्रीधरपंत मुणगेकर हे महाराजांचे वडील होत. श्रीधरपंत एक वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले त्यामुळे ते आपल्या मावशीकडे इचलकरंजीला आले आणि येथेच राहिले. श्रीधरपंत हे इचलकरंजी जहागिरीचे रजिस्ट्रार होते. ह.भ.प. तुकाराम महाराज हे श्रीधर पंतांचे तिसरे अपत्य. महाराजांच्या वयाच्या पाचव्या वर्षी, त्यांचे पितृछत्र हरपले. त्यामुळे त्यांच्या आईने म्हणजेच काशीबाईने डोळ्याचा दिवा आणि हाताचा पाळणा करून महाराजांना वाढविले. '**आजरेकर सांप्रदायाचे संस्थापक श्री बाबासो आजरेकर**' यांचे नातू नानासाहेब यांच्या कन्या म्हणजेच तुकाराम महाराजांच्या मातोश्री श्रीमती काशीबाई होत. मुणगेकर महाराजांची नाळ अशा तऱ्हेने आईच्या घराण्याकडून आजरेकर घराण्याशी जोडली गेली आहे. आळंदी ते पंढरपूर हा ज्ञानेश्वर माऊलीचा पालखी सोहळा जो आज जगातील एक आश्चर्य मानले जाते, तो चालू करण्यात श्री गुरू बाबासाहेब आजरेकरांचा मोठा पुढाकार होता. आजही आजरेकर फडास या दिंडीमध्ये स्थान आहे.

**'नव्हती ते संत करीता कवित्व । संताचे ते आप्त नव्हती संत'।।** असे संत तुकारामांनी म्हटले असले तरी मुणगेकरांच्या अध्यात्माची मुळी रुजण्यास, त्यांच्या आई वडिलांच्या संस्कारांचाच वाटा मोठा होता हे निश्चित, सांप्रदायाचे रिवाजानुसार माळ घेण्याची प्रथा मुणगेकर महाराजांच्या वडिलांनी चालू ठेवली होती. मुणगेकर महाराजांनीही सांप्रदायाचे तत्कालीन '**श्रीगुरू विठ्ठल वामन भुरे**' तथा विठोबा आण्णा आजरेकर उर्फ काकासाहेब यांचेकडून १९४७ साली माळ घेतली. मुणगेकर महाराजांचे शिक्षण मराठी सहावी पर्यंतच झाले. पण ज्ञानाच्या बाबतीत म्हणाल तर **त्यांच्या जीभेवर साक्षात सरस्वती नाचते. ज्ञानेश्वरी, एकनाथ भागवत, रामायण, पंचदशी, अमृतानुभव, चांगदेव पासष्ठी** यातील ओव्यांचा अर्थ समजावून देण्याची त्यांची हातोटी एखाद्या तत्वज्ञानाच्या प्राध्यापकालाही लाजवणारी आहे. सततचा अभ्यास, चिंतन आणि सांप्रदायाच्या निमित्ताने घडलेली श्रवणभक्ती यामुळे त्यांच्याकडे उदाहरणांची नेहमी रेलचेल. रोजच्या जीवनातील साधी सोपी उदाहरणे, गोष्टी, सुरस कथा यामुळे त्यांची प्रवचने अत्यंत रसाळ आणि भावपूर्ण वाटतात. अध्यात्माच्या क्षेत्रात

दुर्दैवाने वाढत चाललेली स्पर्धा, कर्मकांड, अंधानुकरण, सांप्रदायिकता यांच्या भानगडीत न पडता, '**आपण भले की आपले चिंतन भले,**' असा त्यांचा दंडक आहे. ग्रंथाभ्यास आचरणात उतरल्यामुळे निरपेक्ष वृत्तीने राहून त्यांनी जी अलिप्तता साधलेली आहे, ती आजकाल फार दुर्मिळ आहे.

वारकरी सांप्रदायाची कास धरून भक्तीमार्गाने ब्रह्मानंदाच्या डोही डुंबणाऱ्या मुणगेकर महाराजांनी आपल्या आयुष्याच्या पुर्वाधात यंत्रमागाचे एक निष्णात जॉबर म्हणून खूप लौकिक प्राप्त केला आहे. कधी काळी शिलाई व्यवसायाकडे आकर्षित होऊन त्यांनी टेलरींगचा डिप्लोमा ही केला होता. १९४२ साली विवाहानंतर उदरनिर्वाहासाठी ते मुंबईस गेले. 'माधवजी धर्मसी मिल' मध्ये जॉबर म्हणून ४-५ वर्षे तर पुणे येथे पेठेत '**बडवे अँड कुलकर्णी कंपनीकडे**' हातमाग तंत्रज्ञ म्हणून ही काम केले. **हातमाग व यंत्रमागावर निघणाऱ्या साड्यांवरील कोणतीही नक्षी व कलाकुसर कापडावर उठवून देण्यात त्यांची ख्याती होती.** पुढे अहमदनगर येथे सारडा यांचेकडेही पॉवरलूम जॉबर म्हणून त्यांनी काम केले. अनेक ठिकाणी कष्टाची भाकरी कमवत कमवत संसार करणाऱ्या महाराजांनी आपल्या आयुष्यात अनेक गोष्टींचे ज्ञान आत्मसात केले. इचलकरंजीत सायझिंगमध्ये १४-१५ वर्षे काम केले. गोविंद बाहेती यांच्या कारखान्यातील जॉबर म्हणून त्यांची कारकीर्द ही संस्मरणीय ठरली. त्यांच्या यंत्रमाग व्यवसायातील या कामामुळे ते आजही सर्वत्र '**जॉबर**' या नावानेच परिचित होते.

हातचलाखीची जादू शिकण्याची त्यांना लहानपणापासून जिद्द होती. पुढे तीही त्यांनी पूर्ण केली. हवेत माणूस अंतराळी करणे, स्टेजवर गाडी गायब करणे, कागदाचे कबुतर बनवणे, हवेतून नोटा काढणे, दोरीचा फास लावून घेणे व त्यातून सहीसलामत सुटणे, अंगावर रॉकेल ओतून पेटवून घेणे, डोळे बांधून मोटर सायकल चालविणे, असे अनेक प्रयोग ते सफाईने करीत असत. अहमदनगरच्या सारडा कॉलेजच्या मदतीसाठी त्यांचा पहिला सार्वजनिक प्रयोग झाला. याशिवाय पुणे, इचलकरंजी आणि मराठवाड्यातील अनेक गावातून गणेशोत्सवाच्या वेळी आणि विविध शाळातून ही जादू त्यांनी लोकांना दाखविली. सर्वात अद्‌भुत प्रयोग म्हणजे जिवंत साप तोंडाच्या बाजुने गिळून तो संपूर्णपणे पोटात घेणे व त्याची शेपटी तेवढी बाहेर ठेवणे. हा साप पुन्हा हळुहळू तोंडातून बाहेर काढणे. या त्यांच्या प्रयोगाची अनेक वर्तमान पत्रानी दखल घेऊन त्यांच्यावर स्तुती सुमनांचा वर्षाव केला. पण हे सर्व जरी खरे असले तरी हा सर्व खेळ ते केवळ एक छंद म्हणून करतात. त्यातून पैसे मिळवावेत आणि पोट भरावे हा क्षुद्र हेतू त्यांनी कधीही बाळगाला नाही. ज्योतिषशास्त्राचाही त्यांचा अभ्यास आहे. जन्मतारखेवरून कुंडली बनविणे व हस्तरेषा पाहून ज्योतिष वर्तविणे हेही ते जाणतात. त्यांच्याकडून हे ज्ञान घेतलेले त्यांचे चिरंजीव **ह.भ.प. सुभाष मुणगेकर हे इचलकरंजीतील एक प्रख्यात ज्योतिषी** म्हणून नवलौकिक मिळवून आहेत. गेल्या १२ ते १५ वर्षात चि. सुभाषने सुमारे ७००० कुंडल्या तयार केल्या असून, त्यांच्या स्थळप्रती स्वत:कडे अगदी जपून ठेवलेल्या आहेत.

पुण्यात असताना श्री. मुणगेकर महाराजांना, प्रत्येक रविवारी आळंदीला जाण्याचा छंद जडला. मिलमधील मित्रमंडळी घेऊन ते अभंग म्हणत; माऊलींच्या दर्शनाला चालत जात. हा परिपाठ त्यांनी कित्येक वर्षे ठेवला होता. त्यातूनच त्यांना वारकरी सांप्रदायाची गोडी लागली. वारकरी झाल्यानंतर १९४७ पासून त्यांनी पंढरपूरची कार्तिकी वारी सुरु केली. इचलकरंजीत आल्यानंतर भजन किर्तनाचा व्यासंग वाढला अर्थात हे करीत असताना प्रपंचाचा गाडा मात्र ते ओढतच होते. तीन मुले व चार मुलींचा संसार, गोंदकरांच्या वाड्यातील लहानशा जागेत त्यांनी कसा केला असे हे त्यांचे त्यांनाच माहित. **गोंदकरांच्या श्रीहरी मंदिरात** भजन किर्तनात, त्यांचा वेळ आनंदात जायचा. कोणतीही गोष्ट पाहिली की, ती करायचीच. आपल्याला एखादी गोष्ट जमत नाही, हे त्यांना मान्यच नाही आणि या स्वभावामुळेच ते मोठे झाले.

१९५५-५६ पासून ते किर्तनास उभे राहू लागले सांप्रदायिक परंपरेबरोबरच ग्रंथाभ्यास व पाठांतर तसेच

गाठीशी असलेल्या कथा, चुटके, विनोद आणि उत्कृष्ठ अभिनय यामुळे, त्यांच्या किर्तनाला गर्दी व्हायची. किर्तनात श्रोत्यांशी त्यांचा जो संवाद चाले त्यामुळे एक प्रकारे मनोरंजनात्मक किर्तन ते वठवीत असत. गोकुळ अष्टमींच्या कार्याक्रमातून नाथांची भारुडे, नकला ज्यांनी ऐकल्या ते आजही त्यांच्या आठवणी सांगतात. त्यांचा मुलगा श्री. सुभाष आज ही किर्तन प्रवचनांची परंपरा चालवीत आहे. अनेक गावातून त्यांनाही किर्तनाची निमंत्रणे येतात. नित्याच्या व्यवहारातील उदाहरणे देऊन श्रोत्यांना सतत हसवत ठेवण्याचा एक उपजत गुण या बापलेकात ठासून भरलेला आहे. दसऱ्याचे कीर्तन सतत १८ वर्षे पण वैविध्यपूर्ण रितीने ज्यांनी त्यांच्या तोंडून ऐकले ते भाविक करोखरच धन्य होत. **पण कोणत्याही गोष्टीत फार काळ रमायचे नाही ही संन्यास्त वृत्ती मात्र त्यांच्या घराण्यात पिढ्यान पिढ्या चालत आलेली आहे. त्यामुळेच कुठेही फार काळ टिकून न राहता नवनवीन करण्याची एक वैशिष्ट्यपूर्ण वृत्ती त्यांच्यात प्रकर्षाने दिसून येते.** दोन मुलींचा विवाह झाल्यांनतर १९९४ मध्ये तीन मुले व दोन मुलींच्या संगोपनाची जबाबदारी डोक्यावर असतानाच ते प्रपंचातून बाहेर पडले आणि सरळ **आळंदीची वाट धरली. आळंदीमध्ये श्री गुरू साखरे महाराजांकडे २० वर्षात त्यांना खूप शिकायला मिळाले.** साखरे महाराजांची ओघवती भाषा आणि विद्वता त्यांनी अंगिकारली. लौकिक शिक्षण हे त्यांच्या ज्ञान साधनेच्या आड कधी आले नाही. माधुकरी मागून वयाच्या ५५ व्या वर्षी त्यांनी स्वीकारलेली ही फकीरी त्यांच्या ज्ञानार्जनाचे जिज्ञासेचे द्योतक आहे. या काळात ते **प.प. आनंदाश्रम स्वामींच्या आश्रमात राहिले.** अनेक वर्षे त्यांना माऊलीच्या मंडपात किर्तनाचा मान मिळाला. थंड पाण्याच्या आंघोळीची सवय झाली. माधुकरीतून मिळेल ते सेवन करत त्यांनी जणू एक कठोर उपासनाच आचरली. फारसे शालेय शिक्षण नसताना **अमृतानुभव, पंचदशी, चांगदेव पासष्टी** यातील ओव्यांचा अर्थ या गृहस्थांना कसा सांगता येतो हे एक आश्चर्यच म्हणावे लागेल. तल्लख स्मरणशक्ती आणि ज्ञानाचा ध्यास, हे त्यांच्या ज्ञानसाधनेमागील रहस्य आहे. लौकिकाच्या ते कधीही मागे लागले नाहीत. स्वत:च्या मस्तीत राहणाऱ्या मुणगेकर महाराजांनी, स्वत:च्या बायका मुलांचे कार्य होईल याचा विचार कधी ही केला नाही. पण जो ईश्वराची सेवा करतो त्याच्यासाठी अहोरात्र झटत असतो. त्यांच्या योगक्षेमाची जबाबदारी भगवंत स्वत:च उचलतात हे आपणास अनेक साधुसंतांच्या उदाहरणावरून प्रत्ययाला येत नाही का?

सुदैवाने महाराजांची तिन्ही मुले कर्तबगार निघाली. त्यांनी स्वत:च्या बळावर शिक्षण घेऊन नोकऱ्या मिळविल्या. दोन बहिणींचे विवाह जमवून ते व्यवस्थित पार पाडले. पत्नी सौ. सुशिला तर साक्षात पतिव्रता आहेत. आयुष्याची परवड होऊनही कोणतीही **तक्रार न करता, त्यांनी पतीच्या जीवनात प्रकाश निर्माण केला. चुकूनही पतीच्या आराधनेच्या आड त्या आल्या नाहीत की त्यांना टाकून बोलल्या नाहीत. महाराजांच्या लौकिक आणि पारमार्थिक कार्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.**

मुणगेकर महाराजांनी घरातील पैसा अडका न घेता **नेपाळ, काश्मिर, अमरनाथ, बद्रीकेदार, जगन्नाथपुरी, गिरनार, मथुरा, कन्याकुमारी, कलकत्ता, अष्टविनायक, १२ जोतिर्लिंग इ.** यात्राही केल्या आहेत. '**केल्याने देशाटन । पंडीत मैत्री सभेत संचार**'। या न्यायाने त्यांनी नर्मदा परिक्रमेचे पुण्यही पदरात पाडून घेतले आहे. अमरकंटक ते भडोच त्यांनी जंगलातून केलेल्या प्रवासाची कहाणी ऐकण्यासारखी आहे. तरटाचा वेष अंगावर घेऊन, पैसा अडका कनवटीला न ठेवता मिळेल ते खाऊन त्यांनी केलेली ही यात्रा हा त्यांच्या आयुष्यातील एक रोमांचकारी अनुभव आहे. पुन्हा हे सर्व ईश्वर कृपेने झाले असे सांगून त्याचे श्रेयही ते कधी आपल्याकडे घेत नाहीत. कमीत कमी खर्चात ही सर्व यात्रा संपन्न करताना, त्यांच्या कडील एकमेव दौलत होती म्हणजे '**श्रीराम जयराम जय जय राम**' हा रामानामाचा जप, या यात्रेमध्ये लाभलेल्या एकांतवासात स्वत:ला रामनामात लीन रहाता येते हा अनुभव त्यांना आला. '**अजपा जपणे उलट प्राणाचा ।**

**तेथेही मनाचा निर्धारु असे**'। हे हरिपाठातील वचन हेच त्यांच्या एकांत साधनेतील रहस्य आहे. त्यामुळे त्यांना कदाचित कबीराच्या '**राम हमारा भजन करे, हम बैठे आराम**' या दोह्याची प्रचिती येत असावी. '**म्हणोनि माझे नित्य नवे । श्वासोच्छासही गीता प्रबंध व्हावे । श्री गुरुकृपा काय नोहे । ज्ञानदेव म्हणे**'। ही माऊलीची ओवी त्यांच्या साधनेमागील प्रेरणा आहे.

आपल्या आयुष्यात या सांप्रदायातील प्रचंड मित्र परिवार त्यांनी निर्माण केला. अनेक घरे त्यांनी जोडली. आजही वर्षातून दोन वेळा ते नगर भागातील आपल्या भाविकांना भेटी देतात. महाराजांनी घरी रहावे म्हणून त्यांच्या भक्तांमध्ये चढाओढ लागते. चार्टड अकौटंट, डॉक्टर, पोलिस अधिकारी, न्यायाधिश सरकारी अधिकारी त्यांचे भक्त आहेत. पण कोणाकडून कार्यभाग साधावा हा स्वार्थ त्यांना कधीही शिवला नाही. जेथे जातात तेथे केवळ भक्तांना प्रवचनाचा लाभ देतात. '**शिष्यांची नेघे सेवा, मानी देवा समान**'। ही वृत्ती, ८-१० दिवसात गीता, ज्ञानेश्वरी, रामायण, भागवत जे समोर येईल. त्यावर प्रवचने देऊन जणू ते वाग्यज्ञच करीत आहेत. कानडी भाषाही त्यांना येते. काही खेवाल ते हुबळी, विजापूर या सीमावर्ती भागात कानडीतून ही प्रवचन देतात. हिंदी भाषाही त्यांना बोलता येते आणि इंग्लिशचीही त्यांना तोंडओळख आहे. '**आत्मानंदात रमणारा हा किर्तनकार मोठा अवलीय आहे**'.

सकाळी ४ वा. उठणे, थंड पाण्याने स्नान, त्यानंतर नित्य वाचन व हरिपाठ म्हणत तीन किमी मोकळ्या हवेत चालण्याचा व्यायाम आणि निष्कामपणे चाललेली ही भक्तांची सेवा हीच त्यांची दिनचर्या. दोन वेळचे साधे जेवण आणि अंग टाकायला पथारी एवढीच गरज. आज मुलांच्या प्रपंचात राहूनही अलिप्तपणे पूर्णब्रह्म स्वरूपाचा अनुभव घेत आहेत. '**सहज स्वरूप स्थिती । तया नाव भक्ति । नवविधायभक्ति । भासतसे स्या**' ही नाथ महाराजांची ओवी त्यांच्या आनंदाचे निधान आहे. अंतकरणातील भावविश्वात ते लिन राहतात. चैतन्यामध्ये पूर्णब्रह्म पाहण्यात त्यांना समाधान वाटते. जगाच्या लौकिकापासून दूर राहून, स्वत:मध्ये रत होणारे महाराज हे खरोखर आधुनिक काळाततील संत होत. काही वर्षापूर्वी इचलकरंजीजवळ शहापूर मध्ये त्यांनी ज्ञानेश्वर आश्रम उभारला होता. पण मठा.पीठात रमणे हा त्यांचा स्थायीभाव नसल्यामुळे एक गाजराची पुंगी करून पाहिली इतकेच. द्रव्यसंचयात रुची नाही. ग्रंथसंपदा देखील भक्तांनी प्रेमाने दिलेली. ती देखील हळूहळू आपले चिरंजीव ह.भ.प. सुभाष यांच्याकडे स्वाधीन करीत आहेत. एक दोन ग्रंथ हाताशी ठेऊन त्या वाचनातून दररोज नवा अनुभव घेत असतात. चिंतनाने त्यांचे अनुभवविश्व अधिकाधिक समृद्ध होत आहे. आज वयाच्या ८३ व्या वर्षी ही त्यांच्या चेहऱ्यावर वेगळीच तेजप्रभा फाकलेली दिसते. अलाट या गावी त्यांनी अनेकांना भक्तीमार्गाला लावले. पण कुठेही 'महाराजपण' मिरवले नाही. ८-१० वर्षापूर्वी हृदयविकाराचाझटका येऊनही, मनाने सदैव प्रसन्न आनंदी राहणारे हे गृहस्थ आनंदी आयुष्य जगत आहेत. निदान करणारे डॉक्टर भक्त, केमिस्ट भक्त इतकेच काय परमेश्वर देखील अशा भक्तांच्याच रुपातून भेटतो हा त्यांचा विश्वास. या विश्वासाच्या जोरावरच ते या भवसागरात आनंदाचे डोही तरंगत आहेत, मधूनच एखादी तिथी साधून श्री. पाटील यांचे घरी १००-१५० भक्तांना भागवताची कथा ऐकवतात. इचलकरंजीतील सातपुते यांच्याकडील दसऱ्याच्या शारदोत्सवात गेली २४ वर्ष सातत्याने सूत्रसंचालन व मार्गदर्शन करीत आहेत. त्यांच्या ओळखीही खूप. **वि.स.पागे, बाळासाहेब भारदे, बाबा महाराज सातारकर, किसन महाराज साखरे,** आदींशी त्यांचा घनिष्ठ परिचय आहे. पण कोठेही दर्पोक्तीचा लवलेश नाही. घड्याळे, रेडिओ, सायकल, मोटार सायकल, स्वत: दुरुस्त करण्याची त्यांना खूप हौस आहे. अशा तऱ्हेने यंत्रे दुरुस्त करणारा हा महात्मा मनुष्य प्राण्यांनाही दुरुस्त करण्यासाठीच विधात्याने घडविला नसेल ना असा प्रश्न पडतो. पू. महाराजांना अभिष्ट चिंतन. त्यांचे चरणी साष्टांग दंडवत!

शंब्दांकन- **अशोक केसरकर**
सी-१०, श्री निकेतन अपार्टमेंट, श्रीपाद नगर,
इचलकरंजी - ४१६११५
दूरध्वनी - (०२३०) ४२२६६७

# श्रीसूक्त – (अर्थासहीत)

भारतीय संस्कृतीत ४ पुरुषार्थ सांगितले आहेत. ते म्हणजे धर्म/अर्थ/काम/मोक्ष हे मानवी जीवनाचे अविभाज्य घटक आहेत. मानवाच्या विकासासाठी अर्थ आणि काम यांची आवश्यकता आहेच पण तेही धर्मानेच प्राप्त व्हावेत असा नियम आहे. अधर्माने मिळवलेली अर्थप्राप्ती विनाश करते.

'अर्थ' म्हणजे संपत्ती, ऐश्वर्य प्राप्त करून देणारी देवता म्हणजे 'श्री' लक्ष्मीला केलेले आवाहन, तिचे स्तवन म्हणजे 'श्रीसूक्त' पुराणात अनेक अवतार व अनेक लीलांचे वर्णन आहे. अशा या देवीची उपासना म्हणजे शक्तीची उपासना. महाराष्ट्रात देवीची साडेतीन शक्तीपीठे आहेत. ती म्हणजे कोल्हापूर, तुळजापूर, माहूर ही ३ पूर्णपीठे व सप्तश्रुंगी (वणी) हे अर्धे शक्तीपीठ आहे.

आजच्या काळात लक्ष्मी म्हणजे पैसा एवढाच संकुचित अर्थ केला जातो कारण आजच्या माणसाचे पैसा हेच ध्येय आहे. कोणत्याही मार्गाने भरपूर पैसा मिळवणे. पण... लक्ष्मीला आपण देवता मानतो म्हणून संपत्ती प्रामाणिकपणे मिळवावी, चांगल्या कामासाठी ती खर्च करावी व योग्यप्रकारे राखूनही ठेवावी. अशा या श्रीसूक्ता मध्ये पंधरा ऋचा आहेत.

**ऋचा १ ली–**

**ॐ हिरण्यवर्णा हरिणीं सुवर्णरजतस्मजाम।**
**चंद्रम हिरणमयी लक्ष मीमजातवेदो म आवह।**

**अर्थ–** (जातवेद) हे अग्ने सोन्याप्रमाणे कांती असणारी, हरिणीप्रमाणे किंवा हरिणरुपी सोन्याचांदीचे हार धारण केलेली, चंद्राप्रमाणे आल्हाद देणारी अशा लक्ष्मीला (मे) माझ्यासाठी (आवह) आवाहन कर. बोलाव.

**ऋचा २ री –**

**ताम मे आवह जातवेदो लक्ष मीमनपगामिनीम।**
**यस्याम हिरण्य वि- देयंगामंश्व पुरुषानहम ।।**

**अर्थ–** हे अग्ने जिच्यामुळे मी सोने, गायी, अश्व, सेवकवर्ग (विन्देयं) यानी शोभून दिसेन. अशा त्या (आनपगामिनीम) कधीही नाश न पावणाऱ्या लक्ष्मीला माझ्यासाठी पाचारण कर.

**ऋचा ३ री –**

**अश्वूर्वा रथमध्यां हस्तिनाद प्रबोधिनीम।**
**श्रियं देवी उपहवये श्रीमाम देवीर्जुषताम ।।**

**अर्थ–** जिच्यासमोर घोडे आहेत मध्यभागी रथ आहे. हत्तीच्या गर्जनेने (प्रबोधिनीम) जागृत होणारी अशा (श्रीयं) लक्ष्मीला मी आवाहन करतो ती माझ्यावर (जुषताम) अनुग्रह करो.

**ऋचा ४ थी –**

**का सोस्मितां हिरण्यप्राकारामार्द्रां ज्वलन्ती तृप्तां तर्पयंन्तीम।**
**पदमे स्थितां पदमवर्णां तामिहोपवये श्रियम ।।**

**अर्थ–** वर्णन करू शकणार नाही अशी हसरी, सोन्याने मढलेली (ज्वलन्ती) ज्योतीप्रमाणे भक्तीने संतुष्ट होणारी, भक्ताच्या इच्छा पूर्ण करणारी, कमळात रहाणारी, कमलाच्याच रंगाची अशा लक्ष्मीला मी बोलावतो.

**ऋचा ५ वी –**

**चंद्राम प्रभासाम यशसा ज्वलन्तीं श्रियं लोके देव जुष्टामुदाराम।**
**ताम पद्मीनीम शरणहं प्रपद्ये अलक्ष्मींमे नश्यतां त्वां वृणे ।।**

**अर्थ–** चंद्राप्रमाणे उज्वल यशाने, ज्योतीप्रमाणे झळकणारी (देवजुष्टाम) देवानीही सेवा केलेली, उदार मनाची हातात कमल धारण केलेली (ईम) विष्णुपत्नी अशा लक्ष्मीला मी शरण आलो आहे. (अलक्ष्मी) माझे दारिद्रय नाश पावो अशी मी (वृणे) प्रार्थना करतो.

**ऋचा ६ वी –**

**आदित्यवर्णे तपसोऽधिजातो वनस्पतिस्तव वृक्षोऽथ बिल्वः। तस्य फलानि तपसा नुदन्तु मायान्तरायाश्च बाह्या अलक्ष्मीः ।।**

**अर्थ–** सूर्याप्रमाणे कांती असणाऱ्या तुझ्या तपापासून वनातील बिल्वदले व श्रेष्ठ असा हा (अधिजातः) वृक्ष उत्पन्न झाला आहे. अशा त्या वृक्षाची फळे माझे अज्ञान, दुःख, दारिद्र (अलक्ष्मी) नाहीसे करोत (नदन्तु)

**ऋचा ७ वी –**

**उपै तुमां देवसख : कीर्तिश्च मणिना सह।**
**प्रादु र्भूतोसुराष्ट्रेस्मिन कीर्तिमृद्धि ददातु मे ।।**

**अर्थ–** हे लक्ष्मी देवमित्र कुबेर कीर्तिरुपी चिंतामणीसह मला (उपैतु) प्राप्त होवो. या (राष्ट्रे) मर्त्यलोकात (प्रादुर्भूतो) मी जन्माला आलो. मला किर्ती, यश आणि ऐश्वर्य दे.

**ऋचा ८ वी –**

**क्षुत्पिपासामलांज्येष्ठम अलक्ष्मीमनाशयाम्यहम ।**

**अभूतिमसमृद्धिं च सर्वां निर्णुद मे गृहात ।।**

**अर्थ–** तहानभूकेने मलीन अशा अलक्ष्मीचा (लक्ष्मीचीच ज्येष्ठ बहीण अलक्ष्मी) मी नाश करतो. हे देवी माझ्या घरातून दुर्भाग्य व सर्व प्रकारची असमृद्धि (निर्णुद) घालव.

**ऋचा ९ वी –**

**गंधद्वारांदु राधर्षीत्यपुष्टांकरिषिणीम ।**

**ईश्वी सर्वभूतानाम तामिहोपवये श्रियम ।।**

**अर्थ–** सुगंध घेऊन येणारे दार घर्षणास अशक्य. नेहमी समृद्ध सुकलेले गोमय अशा सर्व प्राणिमात्रातील (ताम) त्या ईश्वरी नामक शक्तीला मी इथे बोलावतो.

**ऋचा १० वी –**

**मनस : काममाकूर्तिं वाच: सत्यमशीमही।**

**पशूनां रुपमन्नस्य मयि श्री: श्रयतां यश: ।।**

**अर्थ–** हे लक्ष्मी माझे मनोरथ (आकूतिम) पूर्ण होवोत. सत्यवाचा, अन्न, पशू, रुप, (मयि श्रयताम) हे सर्व मला प्राप्त होवो. माझ्या आश्रयाला येवोत.

**ऋचा ११ वी –**

**कर्दमेन प्रजाभूता मयि संभव कर्दम ।**

**श्रिय वासय मे कुले मातरं पद्ममालिनीम ।।**

**अर्थ–** हे लक्ष्मीपुत्रा, कर्दमा, माझ्यावर कृपा कर. कारण तुझ्यामुळे पुत्रवती झालेली, कमलमाला धारण करणारी तुझी माता लक्ष्मी माझ्या वंशात राहू दे.

**ऋचा १२ वी –**

**आप: स्मजन्तु स्निग्धानिचिकलीत वस मे गृहे ।**

**नि च देवी मातरम श्रियं वासय मे कुळे ।।**

**अर्थ–** हे लक्ष्मीपुत्रा चिकलीता (आप:) पाण्यात रहाणारी देवता माझ्या घरी मंगल कार्ये घडवो. तू माझ्या कुळात सतत रहा आणि त्या देवी लक्ष्मी मातेलाही माझ्या कुळात आण.

**ऋचा १३ वी –**

**आर्द्रां पुष्करिणीं पुष्टीं पिंगलां पद्मालिनीम ।**

**चंद्रम हिरणमयीं लक्ष्मींजातवेदा म आवह ।।**

**अर्थ–** हे अग्ने, कमळाच्या तळ्यात रहाणारी, (आर्द्रां) ओली, पिंगल वर्णांची, कमलमाला धारण केलेली, चंद्राप्रमाणे चमकदार व सोन्याने मढलेल्या अशा लक्ष्मीला माझ्यासाठी पाचारण कर.

**ऋचा १४ वी –**

**आर्द्रां य:करिणीं यष्टिं सुवर्णां हेममालिनीम ।**

**सूर्याम हिरणमयीं लक्ष्मींजातवेदों म आवह ।।**

**अर्थ**- हे अग्ने, हातात दंड धारण केलेली (यष्टि), सोनेरी वर्णाची, सोन्याचे हार घातलेली प्रत्यक्ष सूर्यच अशा त्या लक्ष्मीला माझ्याकरता पाचारण कर.

**ऋचा १५ वी –**

**तां मे आवह जातवेदो लक्ष्मीमनपगामिनीम ।**

**यस्या हिरण्यं प्रभूतं गावोऽश्विवन्देयं पुरुषानहम ।।**

**अर्थ–** हे अग्ने जी आली असता (अहम) मी भरपूर सोंने (गाव:) गायी, दासदासी, घोडे व इतर परिवार (विन्देयं) यांनी संपन्न होईल. अशा त्या (अनपगामिनीम) कधीही नाश न पावणाऱ्या, चिरनिवासी लक्ष्मीला माझ्यासाठी पाचारण कर.

**ऋचा १६ वी –**

**य: शुचि: प्रयतो भूत्वाजुहुयादाज्यमन्वहम**

**सूक्तं पंचदशर्चं च श्रीकाम: सततं जपेत ।।**

**अर्थ–** जो शुचिर्भूत होऊन (प्रयत:) विधीपूर्वक पंधरा ऋचांचे सूक्त नियमित म्हणतो किंवा रोज घृतद्रव्यादीने (जुहुयात) होम करतो तो श्रीची-लक्ष्मीची इच्छा करणारा होतो.

लक्ष्मी चंचल असते असा एक समज आहे पण तसे नसून ती मिळवण्याचे मार्ग वाईट असतात. संपत्ती आल्यावर माणसाचे विचार बदलतात. तो आळशी किंवा व्यसनाधीन बनतो आणि म्हणून ती लक्ष्मी निघून जाते. त्यादृष्टीने '**अलक्ष्मी**' (म्हणजे दारिद्र्य) व '**अनपगामिनीम**' हे दोन शब्द विचार करण्यासारखे आहेत. संपत्तीचा योग्य विनियोग केला तरच ती 'कधीही नाश न पावणारी' ठरते

१६ वी ऋचा म्हणजे फलश्रुति आहे.


**श्रीमती नीलिमा श. प्रभु**

बेळगांव

❑ ❑ ❑

# धैर्य नावाचा सद्‌गुण

माधव गवाणकर
मो. : ९७६५३३६४०८


प्रा. माधव गवाणकर

'ओव्हरस्मार्ट' म्हणजे 'हुशार' नव्हे. तर आगाऊ, उनाड किंवा शेफारलेला या अर्थाने हा 'स्मार्टनेस' घेतला पाहिजे. त्याचप्रमाणे धीट, निर्भय असणं वेगळं व वेडं, 'क्रेझी' धाडस करत जीव धोक्यात घालणं निराळं. साप हाताळण्याचं प्रशिक्षण समजा तुम्ही घेतलं असेल, आधी बिनविषारी व नंतर विषारी साप हाताळायला शिकला असाल, तरच वाडीत किंवा वाड्यात शिरलेला साप तुम्ही पकडावा. 'मी नाय सापाला घाबरत म्हणत भलतं साहस कराल, तर शेवटी ते जनावर आहे! बालकांना 'धीट व्हा' म्हणत असताना धीट, साहसी बनवणारा प्रशिक्षक गुरु किंवा मार्गदर्शक असणं अत्यंत महत्वाचं ठरतं.

वैचारिक बंडखोरीच्या बाबतीत ग्रंथ हेच अनेकदा गुरु ठरतात! कालबाह्य प्रथा किंवा चुकीच्या रुंढी पाळायच्या नसतील, तर स्पष्टपणे तसं समाजाला सांगण्याचं धैर्य तुमच्याकडे असायला हवं.

कमल देसाई नावाच्या एक शिक्षिका आम्हाला शाळेत शिकवायच्या नंतर त्या समाजवादी मंडळीच्या राजकारणात ही होत्या. तर त्या स्पष्टपणे तोंडावर सांगायच्या असलं मी काही मानत नाही. मला जे पटत नाही. ते मी करत नाही. आमची तत्वं आहेत.... फार कमी महिलांकडे असं बौद्धिक धैर्य दिसतं. आधीचे लोक जे शिकवत आले, ते प्रश्न न विचारता मान्य करून टाकायचं असं पारंपरिक जीवन जगणाऱ्या महिलांना वाटायचं. मी मात्र प्रस्थापित 'व्यवस्थेला' प्रश्न विचारायला सुरुवात केली अशा वेळी तुम्हाला गप्प बसवण्याचे, चेपून टाकण्याचे प्रयत्न होतात. त्याला खमकेपणाने व नेमकेपणाने पुरुन उरावं लागतं. खेड्यात तर चिकित्सक माणसाला विशेषत: बाईमाणसाला जवळ-जवळ वाळीतच टाकलं जातं. अशा वेळी तिची एकटीची लढाई तिला लढावी लागते. आम्हा पत्रकारांना मात्र अशा धैर्यवान लोकांबद्दल कुतूहल असते.

मानसशास्त्राचा अभ्यास असलेले डॉ. हमीद दाभोलकरांसारखे युवक कठीण प्रसंगातही जी ठाम तरीही शांत, समतोल, समंजस भूमिका घेत आले, ती पाहिल्यावर मला ते माझ्यापेक्षा वयाने लहान असूनही त्यांच्याबद्दल केवळ कौतुक नव्हे, तर आदर वाटतो. धैर्य म्हणजे आक्रस्ताळेपणा किंवा चिडखोर आक्रमकता नव्हे ! कर्मकांडाला नकार देण्यात नक्कीच धैर्य आहे.

जगप्रवास करणाऱ्या, मोठ्या हुद्यावर काम करणाऱ्या महिलांबद्दलही अशीच कौतुकाची भावना असते. जी संकट, अडचणी त्यांनी फेस केलेली असतात, ती सगळी फेसबुकवर येतील असं नाही. अनुभव हाच गुरु मानून निरंजना (निलू) गव्हाणकर यांनी केलेली व्यावसायिक वाटचाल व जपलेलं 'समाजभान' तुमच्या आमच्या समोर आहेत.

माझ्यावर तर असे प्रसंग येत गेले की, वैऱ्यावरही येऊ नयेत. आईच्या मृत्युनंतर पहाटेपर्यंत त्या मृतदेहापाशी एकट्याने बसून राहण्याचा प्रसंग असेल, वडिलांच्या मरणानंतर लगेच नोकरीचा इंटरव्ह्यू देण्याची आलेली वेळ असेल, दरवेळी मी एकवटलं ते असामान्य धैर्यच होतं. तुम्ही मुलांना फार लाडावून परावलंबी करून ठेवता. त्यामुळे खूपदा मुलं किंवा नातवंडं फाड फाड इंग्लिश बोलणारी पण मनातून एक नंबर स्वार्थी, भित्री व लढाईला नकार देणारी होऊ शकतात. कुणालाही आईवडील आयुष्याला पुरलेले नाहीत. तेव्हा गरीब माणसं कसं जगतात, रफटफ, वादळं पेलणारी माणसं कशी असतात ते तथाकाथेत इंटरनॅशनल स्पर्धेत उतरलेल्या तुमच्या नातवंडांना अधूनमधून दाखवत, शिकवत जा. काल्पनिक भीती तर छोट्या मुलांच्या मनात कधीच कोंबू नये. आयुष्यभर एकट्याने संघर्ष करताना धमक्या सोसताना मला भुताखेतांची भ्रामक भीती कधीही वाटली नाही.

उच्च शिक्षण घेताना प्राध्यापकांसमोर ज्या शंका-कुशंका मी धीटपणे उपस्थित करायचो त्यामुळे माझे कॉलेजशिक्षक हैराण व्हायचे. मी राजकारणात गेलो असतो, तर मला पद देताना खड्यासारखं वगळण्यात आलं असतं. कारण आजकालच्या राजकारणात फक्त वरून दिलेल्या आज्ञा पाळायच्या असतात.

प्रत्यक्ष युद्धाचा अगदी दुसऱ्या महायुद्धाचाही अनुभव असलेले कुडाळदेशकर होऊन गेले. त्यांच्या हवाईदलासारख्या ठिकाणी दिसलेल्या धैर्याला तर सलामच करावा लागेल! ज्यांना लहानपणी आम्ही 'विमानमामा' म्हणायचो, ते भाऊराव सामंत हे अशा वैमानिकांपैकी एक!

इंटरनेट आणि एकूण 'तंत्र व्यसनाला' नकार देण्यातही धैर्यच आहे! जे बाकीचे व बहुतेक सगळे करतात, ते मलाही करायलाच हवं नाहीतर लोक मला बावळट म्हणतील' या भावनेपासून भित्रेपणाची सुरुवात होते. व्यावसायिक कामासाठी नेट वापरणं ठीक. पण बाकीचं जीवन 'नैसर्गिक' पद्धतीने जगाल, तरच वातावरणात, प्रदूषणयुक्त वातावरणात निभाव लागेल. पटलं तर हो म्हणा!

प्रतिभावंत ज्ञातीबांधवाचे
कृतज्ञतापूर्वक 'स्मरण'



# बहुआयामी 'गुंफ'

जन्मशताब्दी वर्ष * १९१९-२०१९

वैशिष्ट्यपूर्ण साहित्यिक 'मानवंदना'

आयोजन : गौड ब्राह्मण सभा, मुंबई



# जन्मशताब्दी वर्ष (१९१९-२०१९)

# बहुआयामी 'गुंफ'

## प्रतिभावंत ज्ञातीबांधवाचे कृतज्ञतापूर्वक 'स्मरण'

उमदा शिक्षक, अभ्यासू व द्रष्टा इतिहास संशोधक, चिंतनशील लेखक, कवी, साक्षेपी संपादक, निर्भिड पत्रकार, प्रयोगशील प्रकाशक अन् यशस्वी उद्योजक अशा विविध क्षेत्रांमध्ये कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या कै. 'गुं. फ. आजगांवकर' यांचे सन २०१९ हे 'जन्मशताब्दी' वर्ष आहे.

कै. 'गुं. फ. आजगांवकर' या ज्ञानी, व्यासंगी अशा बहुआयामी 'कर्तृत्ववान' व्यक्तीमध्ये अनेक 'बहुपेडी' व्यक्तिमत्त्वे सामावली आहेत. निगर्वी, सहृदयी, सामाजिक भान राखणारा कर्तव्यदक्ष नागरीक, तसेच सांस्कृतिक कार्याच्या माध्यमातून 'जे जे उत्तम व उदात्त आहे' त्यावर, भरभरून प्रेम करणारा 'रसिकाग्रणी' अशी अनेक वैशिष्ट्ये त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये दिसून येतात.

कै. गुं. फ. आजगांवकर यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने त्यांचे 'व्यक्तिमत्त्व' तसेच त्यांच्या सामाजिक जीवनावर एक 'विशेषांक' प्रकाशित करण्याचे आम्ही आयोजिले आहे. त्यांच्या आठवणींना व कार्याला उजाळा देण्याकरीता लेख, साहित्य, कविता किंवा दुर्मिळ अग्रलेख, 'संपादक, गौड ब्राह्मण' या नावाने कार्यालयात पाठवावेत.

(लेख प्रकाशित करण्याबाबतचे सर्व अधिकार संपादक मंडळाकडे राहतील.)


त्या सोबत, 'गुंफ' यांच्या स्मृतीला 'मानवंदना' देणारा कार्यक्रम सोहळादेखील संपन्न होणार आहे याची सर्व ज्ञातीबांधवांनी नोंद घ्यावी ही नम्र विनंती.

संपर्क : श्री. उमाकांत महाजन, संपादक ❖ श्री. संतोष आजगांवकर

**आयोजक : गौड ब्राह्मण सभा, गिरगांव**

# न मळलेल्या वाटेवर चाललेला........... कर्मयोगी !

मनीष दाभोलकर



स्व. वसंत ग. सामत

कोकणातील छोट्याशा खेड्यातून प्रवास करत........ ॲनिमेशन क्षेत्रात जगात नावलौकिक मिळवलेले अत्यंत सृजनशील, प्रतीष्ठावंत व असामान्य व्यक्तिमत्व म्हणजेच आमचे वि. जी. सामंत. भारतात ॲनिमेशन खऱ्या अर्थाने रुजविणारे ॲनिमेशन गुरु आज आपल्यात नाहीत.

कोकणातून पोटापाण्यासाठी, उच्चशिक्षणासाठी, कामधंदा करून उदरनिर्वाह चालवितानाच गावच्या थोरामोठ्यांना कुटुंबाला मनीऑर्डर करण्याचा तो काळ..... नोकरी करताना मिल, खाजगी छोट्या मोठ्या कंपनीत का असेना पण नोकरी म्हणजेच सर्वस्व व दुसरा विचार म्हणजे केवळ मूर्खपणा....! अशा काळात चित्रांच्या रेखा कागदावर उमटविणारे...... पुढे चित्रांच्या माध्यमातून कार्टून, ॲनिमेशन करत त्या क्षेत्रात क्रांती घडविणारे हे अवलिया. अत्यंत नम्र, मृदू बोलणे, शांत स्वभाव, विषय मांडण्याची हातोटी, कला, साधे व त्यागी जीवन जगणारा संयमी, स्थितप्रज्ञ, विवेकी, विचारी, उत्तम शिक्षक, समाजसेवक, कार्यकर्ता, नेतृत्ववान अशी एक ना अनेक त्यांची रूपे आपण पाहिलीत व अनुभवली आहेत.

१९७२ च्या पूर्वीपासून एकता का वृक्ष, प्रकृती का नियम, सिंह आणि ससा, मृत्यूशी झुंज, मेरी परी मेरी शक्ती, सहवासी चिडिया राणी, चतुर बहादूर अशा अनेक गोष्टी त्यांनी ॲनिमेशन चित्रातून मांडल्या व त्यातून समाज प्रबोधन घडविले. बाल हनुमान, चेतक, जिंगल ट्यून्स, अशा चित्रपटांचे ते निर्माते व दिग्दर्शक. फिल्म डिव्हिजनची भेट हे शब्द आपल्या कानावर असतीलच.... त्या मागचे खरे प्रणेते होते वि.जी. सामंत व त्यांची टीम. त्यांनी ॲनिमेशन स्कूलच्या माध्यमातून अनेक तरुणांना घडविले..... आज देश परदेशात त्यांचे विद्यार्थी चमत्कार करीत आहेत. ॲनिमेशन कला क्षेत्रात काहींनी स्वतःचा उद्योग व्यवसाय सुरु केला तर काहीजण उच्चपदस्थ हुद्यावर नोकऱ्या करीत आहेत. १९८६ साली भारत सरकार तर्फे बांगलादेश मध्ये त्यांना ॲनिमेशनतज्ञ म्हणून कार्यशाळा घेण्यासाठी पाठविले होते.



स्टुडीयो मध्ये आर्टवर्क करताना प्रसन्न मुद्रेत वि.जी.सामंत

ॲनिमेशन या कलेवर भारतातील (नाथीबाई ठाकरसी महिला, सोफिया, सिम्बोयसीस (पुणे). मुंबई एज्यूकेशन ट्रस्ट, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी, मॅमझीमस ऑटोडेक्स (दिल्ली), ॲनिमास्टर ( बंगलोर, पुणे, नाशिक, इत्यादी), अनेक नामांकित महाविद्यालयात त्यांची व्याख्याने झाली. शैक्षणिक मार्गदर्शन, प्रदर्शने भरवून शिबिरातून तसेच शाळा व महाविद्यालयातून ते मार्गदर्शन करत होते. त्यांनी केलेल्या अतुलनीय कामगिरी बद्दल भारत सरकारने राष्ट्रपतींच्या हस्ते वेळोवेळी पदक देऊन एकदा, दोनदा नव्हे तर चार वेळा राष्ट्रपती भवन दिल्ली येथे त्यांचा सत्कार केला होता. त्यांना फिक्की, दुबई आयफा असे अनेक आंतरराष्ट्रीय सन्मान सुद्धा मिळाले.



"मास्टर ऑफ ॲनीमेशन" पुरस्कार स्विकारताना



१९७७ साली राष्ट्रपती निलम संजीव रेड्डी यांच्या हस्ते राष्ट्रपती पुरस्कार स्विकारताना सोबत लालकृष्ण अडवाणी




अंतरराष्ट्रीय पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह स्विकारताना वि. जी. सामंत

वि.जी. सामंत यांचे सामाजिक क्षेत्रातील कार्य सुद्धा फारच मोठे आणि वाखाणण्याजोगे आहे. गौड ब्राह्मण सभा गिरगाव, गौड ब्राह्मण समाज, गोरेगाव व इतर अनेक संस्थांचे अर्थपूर्ण, वैचारिक ऐतिहासिक (लोगो) हि त्यांचीच कलाकृती आहे. गोरेगावच्या संस्थेचे ते अध्यक्ष व सध्या विश्वस्त होते. वधूवर पालक मेळावा, किंवा स्नेहसंमेलन असूदेत, खुर्ची उचलण्यापासून ते कोणतेही काम करण्याची त्यांची तयारी असे. त्यांच्या ह्या प्रेरणेतूनच अनेक कार्यकर्ते घडले, त्यांचे संस्कार व भविष्यातील दृष्टीकोन हा पुरोगामी विचारांचा होता. गौड ब्राह्मण समाजाच्या रजत महोत्सवी वर्षी (२००८ साली) जीवन गौरव पुरस्काराने गौरविलेले, माननीय श्री. सुधाकर प्रभू (लंडन) यांच्या जीवनावर त्यांनी एक फार सुंदर लघु चित्रपट केला. २०१४ साली गौड ब्राह्मण सभेसाठी तयार केलेला ज्ञातिचाइतिहास व गौड ब्राम्हणत्रैमासिकाची ७५ वर्षाची यशस्वी वाटचालीवर तयार केलेल्या माहितीपटाचे मार्गदर्शन असो किवा डॉ. जगदीश सामंत यांच्या जीवनावर आधारित ''करुणासागर'' ह्या माहिती पटाची निर्मितीसुद्धा त्यांनी केली. त्या निमित्ताने आम्हाला अनेक ठिकाणचा प्रवास, चित्रीकरण, मुलाखती, रेकॉर्डिंग. या करिता फिरावे लागले. त्यामुळे त्यांचा सहवास, मार्गदर्शन, विषयाची मांडणी, काम करण्याची संधी मिळाली सामाजिक बांधिलकीची समज, गोडी, आवड निर्माण करणारे ते उत्तम समाजसेवक होते.त्यांनी कुठच्याच संस्थेकडून मानधन किंवा लघुपट बनविण्याचे कसलेच पैसे कधीच घेतले नाहीत. व्यावसायिक क्षेत्रात काम करत पैसे कमाविण्याची मोठी संधी असताना सुद्धा ज्ञातिबांधव व समाजाप्रती त्यांचे प्रेम अनमोल होते. छोट्या मुलांच्या चित्रकला स्पर्धांना तर ते केवळ परीक्षक म्हणून नव्हे तर मार्गदर्शकाची भूमिका पार पाडीत त्यांना लागणारे पेपर व इतर साहित्य ते स्वत: आणित असत.

कै. एकनाथ ठाकूर सर, कै.डॉ. जगदीश सामंत सर, व कै. वि.जी. सामंत सर हि कु.दे.गौ. ब्राह्मण समाजातील त्रिमूर्ती म्हणजे साक्षात दत्ताचाच अवतार होता.... ज्यांनी स्वत:चा देह जाळून समाज घडविला, गरजवंत, पिडीत, उपेक्षित, अशिक्षित, अज्ञानी, बेरोजगार, तरुण, होतकरू, विद्यार्थी, मॅनेजमेंट मग ते वैद्यकीय, आर्थिक, कला, सामाजिक अशा अनेक क्षेत्रात त्यांचा लीलया वावर झाला..... आज आपल्यात या तिन्ही त्रिगुणात्मक मुर्त्या नाहीत. परंतु आम्ही सर्व भाग्यवान आहोत त्यांचा सहवास, प्रेम, करुणा व मार्गदर्शन आपल्याला लाभले. त्यांनी केलेले कार्य व दाखवलेली मार्गदर्शक तत्वावरती आम्ही ठाम राहून त्यांचे कार्य पुढच्या पिढी पर्यंत पोहोचविणार आहोत..... व हीच खऱ्या अर्थाने कै. वि.जी. सामंत सर यांना श्रद्धांजली ठरेल.

आज कुडाळदेशकर समाज, भारत देशाचे व खऱ्या अर्थाने ॲनिमेशन विश्वाचेच कधीही भरून न निघणारे नुकसान झालेले आहे. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, मुलगा, सून, मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दुखा:त आम्ही सहभागी आहोत. गौड ब्राह्मण सभा, गिरगाव, श्रीमठ संस्थान, दाभोली, गौड ब्राह्मण समाज गोरेगाव, व समस्त कु.दे. गौड ब्राह्मण समाज व भारतातील सर्व ज्ञाती संस्थातर्फे भावपूर्ण आदरांजली. !

**मनीष दाभोलकर**
गौड ब्राह्मण समाज

# बिटके आंबे

**शुभदा पाटकर** (डोंबिवली)


शुभदा पाटकर

खूप वर्षांनी बाजारात बिटके आंबे मिळाले आणि आंब्याच्या वासाबरोबर आठवणीही दरवळू लागल्या. साल हिरवी असली तरी आत मध भरलेले आंबे अगदी 'फसवे' बिटके आंबे. विकणारी बाई परत परत सांगत होती. ''बाहेरून हिरवे असले तरी आतून गोड आहेत''. मला हसू आलं. ''अग! माहिती आहे, माझ्या लहानपणी खूप खाल्ले आहेत असले आंबे मी''.

दादा, आठवतं तुला? एवढ्या मोठ्या, उंच झाडावर घोसा घोसांनी हे आंबे यायचे. लांब लचक देठ, त्याच्या टोकाला इवलासा आंबा. वाऱ्याबरोबर घोसच्या घोस इकडे तिकडे हेलकावे घ्यायचे. माना वर कर-करून आपण प्रार्थना करायचो ''पडू दे, एखादा तरी पडू दे''. खाली पाल्या-पाचोळ्यात एखादा पडल्याचा आवाज यायचा. आईने मोठ्या आवाजात मारलेली हाक कधी ऐकू यायची नाही. पण हा अस्पष्ट आवाज कसा ऐकू यायचा? मग त्या पडून फुटलेल्या आंब्यासाठी किती भांडाभांडी आणि किती 'बार्गेनिंग' व्हायचं. एवढासा आंबा चोखण्याच्या 'राऊंड' व्हायच्या. आंबट-गोड मध जास्तीतजास्त मिळावा म्हणून ते चोखणं कसं जोरकस असायचं. अगदी जिवाच्या आकांताने. त्या बाठ्याला काहीही शिल्लक रहाणार नाही याची दक्षता घ्यायचो. केवळ या आंब्यामुळे आपली मित्र-मैत्रिणीतली पत वाढलेली असायची.

उन्हाळ्याचे दिवस, अंगावर कमीतकमी कपडे; त्यामुळे रसाच्या चिळकांड्या उडाल्या तरी ''नो प्रॉब्लेम'' अवघं अंगचं. हनुवटी, कोपरापर्यंत हात, पोट, पाय आंब्याच्या रसाने सुगंधित होवून जायचं. बिटक्या आंब्याला बहरच तसा आलेला असायचा.

आज रिक्षाने घरी पोचेपर्यंत अगदी धीर नव्हता. कधी एकदा आंबे चोखते असं वाटतं होतं रिक्षातच एक आंबा चोखायला काय हरकत आहे? छे! त्यांचही एक शास्त्र आहे. आधी आंबा थंड पाण्यात ठेवायचा. देठाचा भाग काढून देवाला नैवेद्य दाखवल्यासारखा थोडा पिळलेला रस शिंपडायचा. ... मग तोंडाला लावून दम असेल तेवढ्या जोराने चोखायचा.

आ हा हा! तोंडात येणारी आंबट-गोड चव, सुगंधाने भरलेलं नाक, चोखण्याच्या आवाजाने तृप्त झालेले कान, अतीव आनंदाने मिटलेले डोळे, आत्मा कसा चहूकडून संतुष्ट होतो. खरं तर थोड्याच वेळात त्यांत बाठ्याशिवाय कांहीच शिल्लक नसतं. तरीही तो बराच वेळ चोखत रहायचा. आपण हवेहवेसे असतानाच संपण्यात मजा आहे'. हे विधात्याने आधीच आंब्याला पटवून दिलेले असतं. हे सगळं करताना रस पोटातही गेला पाहिजे आणि कपड्यांवरही सांडला पाहिजे. यांत चोरटेपणा असला पाहिजे आणि कोणाचा तरी ओरडा बसला पाहिजे तर खरी गंमत.

ओरडा कसा असायचा? ''अरे आता पुरे, पोटात काही तरी होईल''. तोंडात ओरडा असायचा आणि नजरेत कौतुक. घरातील मोठ्यांनी आपल्याकडे कधी मागितले नाही आणि आपण कधी दिलं नाही. हे कसं?

आता आपणही त्यांच्या एवढे मोठे झालो. म्हणून आंबे कापून खाल्ले पाहिजे असं कुठे आहे? परत एकदा लहान व्हायचं की कधी तरी.

दादा, येतोस जेवायला? मी उरलेल्या. आंब्याचं रायतं करतेय. आठवतं तुला? पानातला फडफडीत गरम भात आणि त्यावर केशरी रंगाचे आंब्याच रायतं. आ ऽऽऽहा ब्रह्मानंदी टाळी लागायची. साजुक तूपात हिंग, राई, मेथीची फोडणी करायची. त्यात सोललेले बिटके आंबे टाकायचे. मग टाकायचं मिरची, हळद, धणे यांच वाटण, मीठ, गुळ, नारळाचा पातळ रस. चांगले रटमटले की त्यात घालायचा नारळाचा जाड रस. हे गरम रायतं आणि भात. दाबून ताव मारायचा.

हे लिहितानाही मधूमेह वाढेल की काय असे वाटते. नुसत्याच आठवणी काढायच्या. जिभेला चव आहे म्हणून भीत-भीत खायचं. आता ''जास्त खाऊ नका''. म्हणून ओरडणारं कोणी नाही. पण मधुमेह आहे ना नुसत्या आठवणींवर समाधान मानायचं. नाही तर फोटो आणि आठवणी तुझ्याबरोबर शेअर करायच्या. असलो जिवंत तर पुढच्या उन्हाळ्यापर्यंत आठवणी चोखायच्या परत... परत.

# दडपे पोहे

पल्लवी वागळे-सामंत



पल्लवी वागळे-सामंत

चित्रा, चैतन्य आणि दहा वर्षाचा नील अमेरिकेहून आले ते थेट देवदर्शनाला कोकणात आले. चैतन्यची आजी ८६ वर्षांची दडपे पोह्यांची तयारी करत होती. ताजा फोडलेला नारळ, कोथिंबीर, भाजलेला पोह्यांचा पापड, कांदा आणि कच्चे पोहे. निल आश्चर्याने बघत राहिला. बर्गर पिझ्झाच्या जगातून आलेला मुलगा हे त्याला नवखेच काहीतरी वाटले. तरी त्याने त्या पणजी आजीला विचारले हे असे कसे रॉ खायचे. आजीने हे आमचे खाणेच म्हण ना. हि सहज पचणारी आणि दीर्घकाळ टिकणारी भूक अशी एक खाद्यसंस्कृती आहे. गावागावात जे पिकलं जातं त्यातूनच हि पाककृती तयारी झाली. हे खाणे म्हणजे आयत्या वेळेला कोणी आले तरीही पटकन होते. आमचे हे सावंतवाडीहून खेळणी आणून विकायचे. खुपश्या व्यापाऱ्यांची त्यांची बांधिलकी होती. हे बरेचदा दडपे पोहे जाताना शिदोरी म्हणून घेऊन जात. एक पुडी स्वत: खात आणि एक पुडी तिकडे व्यापाऱ्यांच्या मुलांना देत असत. एकदा पुष्कळ पावसात आमचे घर पूर्णपणे न्हाऊन गेले. खेळणी तर पाण्यात तरंगत होती. बरेच नुकसान झाले. तेव्हा हे तिकडे सांगायला म्हणून गेले. तर त्यांच्याच घरून दडपे पोहे आले. हा पदार्थ नाती जपतो. नीलला तिच्या बोलण्याचं अजब वाटलं. आपण गजबजलेल्या बेटावर गजबजलेलं आयुष्य जगतो. त्यात वेगळेपण काहीच नसते. नीलने एक घास खाल्ल्यावर त्यातील खोबरं, पोह्याचा पापड दाताला चिकटत होता तर मध्ये मध्ये साखरेचे कुडुम कुडुम करत होती. नीलला ते पोहे आवडले आपला आता वाढदिवस येतोय आपण आपल्या मित्रांना हेच करू.

खरंच हा पदार्थ खूप आवडीने खाल्ला जातो इतकच नाही तो आपुलकी जिव्हाळा जपतो. आजच्या फास्ट फूडच्या जगात आपण आपले पिढीजात पदार्थ विसरत चाललो आहोत. परकीयांचे पदार्थ करत जाताना आपण आपले पदार्थ त्यांना दाखवत जातो का? भारत देश हा खूप खवय्यांचा देश मानला जातो. अनेक प्रांत तसेच त्यांच्याकडे येणारे पीक आणि त्यापासून बनले जाणारे पदार्थ याची देवाण घेवाण होते आणि आपण ती करतो पण कुठेतरी स्वत:ला स्थिरस्थावर व्हायचे आहे म्हणून त्यांचेच पदार्थ करावेत आणि आपली भूक भागवावी अशी आज दुनिया चालत आहे. सुदाम्याचे पोहे आणि कृष्णाची मैत्री हि गोष्ट अनेक पिढ्या पुढे गेली. ती मैत्री तुमच्या आमच्या बाबतीतही व्हावी असे आपण मनाशी धरून चाललो तर खाद्यसंस्कृती आणि नाती नक्कीच टिकतील.

---

# अरे माणसा...

पिकातल्या कणसा... भोळ्याभाबड्या माणसा
साथ नाही उन्हाची दाद नाही पावसाची
बीज नाही अंकुर नाही रुसली का माऊली?
होतोस खिन्न, हताश, उद्विग्न
नाही वारा नाही पाणी
जगण्याला नाही असा बोलविता धनी
सततची हुरहूर तुमच्या मनी
सृष्टी आपली दृष्टी आपली
मग जगण्याची इच्छा का आटली?
नको करू हत्या आणि आत्महत्या
जगण्याचा ओढाच तो वाहून घे सख्या
घे स्वच्छंद भरारी आत्मविश्वासाची
जुंपू देत तूझे श्वास या मातीच्या कुशीत
सकारात्मक श्वास तुझा फुलवेल हा मळा
क्षणा क्षणाच्या स्वानंदाने लावून घे लळा
जनतेचा तू जगज्जेता
भुकेल्याला मुख्य अन्नदाता
फुटतील तुज्या जमिनीला धारा
होईल तुझ्या सौख्याचा निर्झरा
कर तुझे जीवन कृतार्थ सांगते तुला मित्रा...

**पल्लवी वागळे-सामंत**

# तुलनेचे घरटे...

पल्लवी वागळे-सामंत



पल्लवी वागळे-सामंत

हळूच बाबाचा पापा घेत रात्री लवकर ये हा... शाळेचे बूट घालत आजी आजोबांना टाटा करत गिरी बाहेर पडली. मागून मुग्धा डबा घेऊन गेट पर्यंत सोडायला गेली. गाडीत बसून गिरी आईला ''तू पण आजीसारखा गजरा माळलास ना. छान दिसतेस''. मुग्धा गोडशी लाजून पुढे निघाली. तोच तिला स्टेशनवर गिरीच्या वर्गशिक्षिका भेटल्या. गिरीच्या आई तुम्ही परवाच्या पालक सभेला आहात ना? नाही म्हणजे तुम्हीच या थोडे बोलायचे होते, तुमच्याशी. मुग्धा जागेवरच बिथरली. तसे घाबरण्यासारखे नाही उलट स्तुती करण्यासारखे आहे. दोन दिवस कथी जातायत असे झाले. दोन दिवसांनी शाळेत गेल्यावर गिरीने आपल्या आईबद्दल लिहिलेल्या भावना बाईंनी वाचून दाखवल्या--

रात्री कुशीत घेऊन गप्पा माराव्यात
कृष्ण सुदाम्याच्या गोष्टी सांगाव्यात
परिकथेतील परी कशी दिसते
उत्सुकता असते किती मनी
पण तिला कधी वेळच नसतो...

रोज रोज काय पोळी भाजी
कधीतरी थालीपीठ, घावणे
खावे वाटतात आवडीने
प्रत्येकाच्या चवीने जायला
तिला कधी वेळच नसतो...

रोज वाटते बागेत तिने
सोबत यावे सोबत फिरावे
फुलपाखरांच्या मागे धावण्यात
तिने तिचा हात द्यावा
पण तिला वेळच नसतो.

आजीसारखी नटून भजनाला
टाळ मृदंगाच्या स्वरात
आपलाही एक आवाज देऊ
भक्तीच्या हाताने फुले वाहू
पण तिला कधी वेळच नसतो.

दिवसभराच्या धावपळीत
तिला कधी वेळच नसतो
आईशिवाय दिवस
संपायला दुसरा काही मार्गच नसतो...

मुग्धाला काही सुचेना हिने एवढे आपल्याबद्दल कसे लिहिले. यापेक्षा हिला आपल्याकडून एवढे हवे आहे हे आपल्याला कसे नाही कळले. सगळ्यांच्या टाळ्या पडल्या.. मुग्धा किंचीत डोळ्यात पाणी काढून तिला मिठीत घेऊन छान छान म्हणत तिला घरी घेऊन गेली. रात्री तिला आवडीचे थालीपीठ करून गोष्टी सांगून निजवले.

माधव उशिरा घरी आला. तिने त्याला गिरीबद्दल सांगितले. पण माधवला त्यात काही वावगे वाटले नाही... ''मुलगी लहान आहे उद्या मोठी झाली की हीच प्रायव्हसी मागेल. स्वत:ची स्पेस मागेल. मग तेव्हा आपले वय गेले असेल. आता आहे तोच कमवुयात कर्ज घेऊयात. ती यात मोठी होईल इतरांकडे पाहतापाहता. हि बाब एवढी गंभीर नाही''. तो पलीकडे तोंड करून झोपून गेला. मुग्धाने तिला कुरवाळत ''**तुला वेळ द्यायचा आहे गं पण निर्णयस्वातंत्र्य तेवढे नाही**''.

कोणी एकेकाळी तीन आकडी पगारात घर चालत होते अर्थात तेव्हा एवढी ओढाताण, स्पर्धा होती किंवा ती प्रकर्षाने जाणवत नव्हती. स्पर्धेच्या प्रवाहात वाहता माणसे तुलनेच्या घरट्यात जाऊन बसतात आपला शेजारी आपल्या भविष्यासाठी काय करतो तेच आपण करावे. मग कुटुंबाची ओढाताण का होईनात. कोणी दूर जाऊन तर कोणी जवळ असून असतात ते फक्त तुलनेच्या घरट्यात. पुढील येणाऱ्या पिढीला फक्त तुलनेचे संस्कार दाखवावेत का? तो कुठल्यामाध्यमात शिकतो किंवा तो पुढे कोणत्या क्षेत्रात जाणार किंवा त्याला घर केवढे मोठे घ्यायचे आहे या तुलनेच्या घरट्याकडे तो रेंगाळत आहे. पण खरंच त्याची एवढी आवश्यकता आहेका? **पु.ल. देशपांडे म्हणतात** तसे कोंबडी अंडे देते ती इतर कोंबड्याशी तुलना करते का? साप कात टाकतो तो इतर सापांशी तुलना करतो का? गाय दूध देते ती इतर गायीं बरोबर तुलना करते का?

खरंच आहे सगळ्या प्राणिमात्रांना एकच माहित आहे की जे जन्माने आपल्याकडे आणि आपल्याकडून दुसऱ्या कोणाला फायदा होऊ द्यायचा आहे ते या आयुष्यात करायचे आहे. तुलनेच्या घरट्यात शांती, समाधान, आनंद नाही उलट ताण आणि त्रास अधिक आहे. जगण्यातला मर्म हा तुलनेच्या घरट्यात नसतो तर समृद्धीच्या घरट्यात असतो. नाहीतर एक दिवस वर्तमानाचे तकलादू होईल आणि शांतीचे घरटे मात्र हरवलेले असेल.

# उन्हाळयाची सुट्टी-कालची आणि आजची

शुभदा पाटकर डोंबिवली


शुभदा पाटकर

पूर्वी सुद्धा उन्हाळ्याची सुट्टी असायची, ती शेवटचा पेपर संपला की लगेच सुरू व्हायची,आता 'निकाल' लागला की मग सुरू होते. आता इयत्ता १० मध्ये गेलेल्यांना ही उन्हाळ्याची सुट्टी नाही. काय दुर्दैव यांच? तेव्हा वार्षिक परीक्षेला पूर्ण वर्षाचा अभ्यास करावा लागे; पण तेव्हा टक्केवारीचं एवढं अवडंबर नसायचं, पालकांच्या फार अपेक्षा नसायच्या. सुट्टी म्हणजे सुट्टी असायची.

उठल्यापासून जी खेळायला सुरवात व्हायची ते झोपेपर्यंत. घरात खूप गरम व्हायचं. तेव्हा ए.सी, कुलर, एवढंच काय पंखेही नसायचे. घराबाहेर जागा असायची. लंगडी, लगोरी, डब्बा, ऐस-पैस, कब्बडी, टिकरी, सागरगोटे, काचापाणी, सूरपारंब्या असले बिन पैशाचे खेळ खेळायचो. व्यायाम व्हायचा, भूक लागायची, सांघिक खेळ असल्यामुळे तडजोड, मैत्री, संघभावना, नेतृत्व हे गुण आपोआप वाढीस लागत. आता घरात पंखे, ए.सी., कुलर यांचा गारवा सावली आहे. मुलं घराबाहेर पडतील कशाला. पण मोबाईलवर खेळतांना व्यायाम कसा होणार, दुसऱ्या बरोबर खेळतांना हरताना होणार दु:ख, जिकंल्यावर होणारा आनंद कसा अनुभवतील. खिलाडू वृत्ती कशी तयार होणार? तेव्हा खेळतांना पडायचो, जखमी व्हायचो, रडायचो, भांडाभांडी व्हायची, पुन्हां एक व्हायचो. कधी ना जखम चिघळली, ना मनं. खेळाचं साहित्य तरी काय असायचं चिंध्यांचा बॉल, पत्र्याचा डबा, फुटक्या लादीच्या टिकऱ्या, काठी, घरं आखायला चुलीतला कोळसा, करवंटी, टोकाला वाकडी केलेली सळई, खराब झालेले टायर. साहित्य बिनकामाचं असलं तरी त्यातून मिळणारा आनंद अमुल्य होता.

आता खेळाचं महागडं साहित्य, नेट, स्पोर्टस् शूज, ठराविक पोशाख; किती कौतुक, किती लाड? पप्पा गाडीने मैदानावर सोडतो, आई पाण्याची बाटली, खाण्याचे दोन डबे देते. 'पगारी' कोच खेळ शिकवतो. तरी पोरगं रडत घरी येतं. हरलं म्हणून, लागलं म्हणून, सरांनी चिटींग केलं म्हणून. त्यात उत्साह, उत्स्फूर्तता, चढाओढ, जिवाची बाजी लावणं, खिलाडूवृत्ती काहीच नसतं. दोन तास झाले, फी वसूल झाली, चला खेळ आटपला.

तापलेल्या सूर्यामुळे बाहेर खेळणं अशक्य होई तेव्हा बैठेखेळ सुरू होत. अख्खा पत्त्यांचा कॅट क्वचितच कोणाकडे असे. गेल्या वर्षी नवीन आणला होता ना रे! असे म्हणून नवीन पत्त्यांचा जोड येई. बहुतेक जण सुट्टीत काका, मामा, आत्या, मावशी कडे रहायला जात तेव्हा हे पत्ते उपयोगी पडत. आता इतके नातेवाईक नसतात किंवा असलेच तर जिव्हाळा नसतो म्हणून आई-बाबांना ट्रॅव्हल कंपनीचा आसरा घ्यावा लागतो आणि लाखो रुपये खर्च करावे लागतात.

सगळेच गरीब असायचे त्यामुळे व्यापारडाव खेळतांना मजा यायची. बंगला, गाडी, टेलिफोन खरेदी करायचो कधी विकायचो. तेव्हा आर्थिक व्यवहार पैशात होत. व्यापारडावात मात्र खोट्या का होईना नोटा हाताळायला मिळतं. आता मुल मोबाईलशी परिचयाची असल्यामुळे ऑनलाईन शॉपिंग करू शकतात.

सुट्टीच्या सर्वात आवडीचा कार्यक्रम म्हणजे आइसक्रीम पॉट आणून आइसक्रीम बनवणे. तेव्हा फ्रिज नव्हते. माळ्यावरचा आइसक्रीम पॉट काढला जाई. एक मोठी लाकडी बादली, त्यात मधोमध उभा धातूचा डबा, त्यात रवी अशी त्याची रचना असायची. धातूच्या डब्यात दूध, साखर, आंब्याचा रस, लाकडी बादलीत बर्फ आणि मीठाचं मिश्रण. पाळी, पाळीने रवी फिरवावी लागे. खूप परिश्रमाने आइसक्रीम तयार होई. 'भगवानके' घर देर है आंधेर नही' हे चांगलच पटायचं. आता रस्त्या रस्त्यावर आइसक्रीम पार्लर आहेत, पण स्वतः बनवण्यात आणि दुसऱ्यांना खाऊ घालण्यातला आनंद कसा मिळणार?

मुली भातुकलीचा खेळ खेळत, बाहुला-बाहुलीची

लग्न लावणं या दोन्ही खेळांत भूमिका आणि अभिनय यांचा कस लागे. आता वास्तववादी मुलांना हे फालतू वाटतं; म्हणून आता घटस्फ़ोट जास्त होतात का?

उन्हाळा बाधेल म्हणून वाचनालय सुरू होई. चांदोबा, फुलबाग, बिरबलाच्या गोष्टी, रामायण, महाभारत, शामची आई, मिरी, सिंदबादची सफर अशी पुस्तक हाती आली की तहानभूक विसरायला होई. आता सुट्टीत मुलांच्या हातात पुस्तक नव्हे, मोबाईल असतो.

सुट्टीत अनेक छंद जोपासले जात. पोस्टाच्या तिकिटांचा, सिगारेटच्या चांदीचा यांचा संग्रह करायचो. चॉकलेट मधे प्राण्यांची, पक्ष्याची, देशांची चित्र मिळत, त्याचा आल्बम बनवायचो (तो कोणत्याही वर्षी पूर्ण व्हायचा नाही) आता सुट्टीत नव्हे शाळेतच असे प्रोजेक्ट देतात आणि ते आई बाबा पूर्ण करतात.

कधी तरी सुट्टीत सिनेमा दाखवला जाई.जर 'चांगला' असेल तर. त्यात प्रेम, मारामारी, खून असता कामा नये. तो ऐतिहासिक, पौराणिक, रडका असला पाहिजे. शिवाय खात्रीच्या माणसाने तसं प्रमाणपत्र दिलं पाहिजे. भीतीदायक प्रसंगात आम्ही घाबरायचो. दु: खी प्रसंगात रडायचो. आता मुलं टी.व्ही. वर मारामारीत रक्ताचे पाट वाहताना आरामात जेवू शकतात. त्यांना याच्यात आनंद मिळतो की काय?

उन्हाळ्यात वाळवणं घातली जायची. मिरच्या, हळद, सांडगे, पापड, कुरुडया, चिकवड्या, बटाट्याचा किस. हे एकट्या दुकट्याचं काम नाही. **'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ'** शेजारचे मग काय कामाचे. आता ऊन आहे; वाळवणं घालायला ना जागा, ना मनुष्यबळ, ना इच्छा ना गरज. पाहिजे तेव्हा विकत पाकिटं मिळतात. काम भागतं.

उन्हाळी सुट्टीत लग्नाचा मोसम सुरू व्हायचा. आमचं घर मोठं असल्यामुळे, ग्लास, चांगल्या कपबश्या, टेबल-खुर्ची अशी आयुधे असल्यामुळे आणि बोलणी करायला आजी पटेलांसारखे बुजुर्ग असल्यामुळे आमच्याकडे 'दाखवण्याचे' अनेक कार्यक्रम होत. लाजणारी मुलगी, भेदरलेला नवरा, बढाया मारणारी मोठी माणसं. एक प्रकारचा ताण जाणवायचा. लहानांच लक्ष असायचं कांदेपोहे आणि पाहुण्यांनी आणलेल्या मिठाई वर. आता घराघरात नेहमीच कांदेपोहे आणि मिठाई असते. आता 'बघायचे' कार्यक्रम होतात मॉलमध्ये नाहीतर रेल्वे प्लॅटफॉर्म वर.

उन्हाळ्याच्या सुट्टीत मुलं परस्परांकडे रहायला जात, आता कुठे कोणाची नाती राहिली आहेत? तेव्हा अपुऱ्या जागा अपुरे पैसे पण मनं मोठी, जिव्हाळ्यात श्रीमंती होती. आता सर्व नातेवाईक 'फॅमिली पिकनिक' काढतात. दोन दिवसाचे पैसे भरायचे, एकमेकांच्या संपर्कात राहायचं आणि वाटेला लागायचं. मुलांनाही आजी आजोबांबरोबर नानानानी पार्कमध्ये जायला लाज वाटते. मग सुट्टीत आनंद कसा मिळवायचा, उन्हात फिरून आजारी थोडचं पडायचं? मग पूर्ण थंड असलेल्या मॉलमधे जायचं; कपडे, बूट, खेळणी, पुस्तकं यांची खरेदी करायची, सिनेमा पहायचा आणि पिझ्झा-आइसक्रीम खायचं. एकाच दिवसात, एकाच ठिकाणी हजारो रुपये खर्च करुन मजा ओरबाडून घ्यायची.

उन्हाळ्याची सुट्टी जेव्हा संपत यायची तेव्हा वह्या-पुस्तकांची खरेदी व्हायची. त्याबरोबरच कव्हरं आणि लेबलं. घरभर पसारा; खळीचं पातेलं, कव्हरं, कात्री, पट्टी, लेबलं, वह्या आणि पुस्तकं. खळीचा विचित्र वास, कोऱ्या वह्या पुस्तकांचा.

हवा हवासा वाटणारा वास खोलीभर पसरला की खात्री पटायची आपण वरच्या वर्गात गेलो. आता मुलांना शासनच पुस्तकं देतं. कव्हरं पण मापाची असतात. ती सुद्धा पसारा नको म्हणून आईबाबा घालून देतात.

मग आता मुलं उन्हाळ्यात सुट्टीत करतात तरी काय? टी.व्ही सुध्दा नको. हातात मोबाईल, कानाला ईयरफोन, हातात काहीतरी खाणं. काही पालक मुलांच्या मागे वेगवेगळे क्लास लावतात.

आम्हाला सुट्टी संपू नये असं वाटायचं आता मुलं आणि पालक सुट्टी संपली की मोठा श्वास सोडतात. आजच्या पिढीची मला दया येते, खरंच दया येते.

**शुभदा पाटकर**
डोंबिवली

❑ ❑ ❑

# शब्दांचा खेळिया – 'पुलं'


निरूता भाटवडेकर

२०१९ हे पु.ल. देशपांडे यांचे जन्मशताब्दी वर्ष-जन्म ८ नोव्हेंबर १९१९, मृत्यू-१२ जून २०००

पु.लं. च्या ठिकाणी कला व कल्पकता यांचा संगम झाला होता. कोणतीही गोष्ट वेधकपणे सादर करणे, नाट्यपूर्ण रीतीने मांडणे ही कला त्यांना जन्मजातच अवगत होती व कल्पकतेचे वरदानही त्यांना लाभलेले होते. रंगमंचावरील, चित्रपटाच्या किंवा दूरदर्शनच्या पडद्यावरील निर्मितीकौशल्याच्या त्यांच्या सादरीकरणातून या कल्पकतेचे व अभिन्य कौशल्याचे अप्रतिम नमुने आहेत. अशा ह्या बहुरूपी पुलंच्या स्मृतीप्रित्यर्थ लेख.

'पुलं' नावाचं गारुड हे महाराष्ट्रामधील कित्येक पिढ्यांवर बसले आहे. आपण नेहमीच ऐकत आलो आहोत. पण हे प्रत्यक्ष बघणं झालं ते १९१४ सालच्या चतुरंगच्या 'पुलकीत सोहळ्या'त त्या वर्षीचा 'जीवनगौरव' पुरस्कार पुलना रूपारेलच्या प्रांगणात देण्यात आला. त्यावेळी झालेला टाळ्यांचा गजर सलग पाच मिनिटे होत होता. पुल ही तिथे अर्थात होते. दोन दिवस सलग 'पुल दर्शना'ने मी धन्य झाले. बरोबर सुनिताबाईही होत्या.

मला नेहमी वाटत आलं आहे की 'पुलं' हा दोन पिढ्यांना कायमचा जोडणारा पूल आहेत. प्रत्येक पिढीला ह्या पूलावरून होणारा प्रवास हा आनंददायीच असाच असणार आहे. आमच्या पिढीने पुलं ना सर्वप्रकारचे सादरीकरण करताना बघितले आहे. आता ते सर्व विविध माध्यमांद्वारे पुढील पिढीस बघण्यासाठी अथवा ऐकण्यासाठी उपलब्ध आहे. आताच्या पिढीला असं काही जादुर्स व्यक्तीमत्व ह्या पृथ्वीतलावर होऊन गेलंय हे खरच वाटणार नाही.

म्हणूनच कदाचीत 'भाई-व्यक्ती की वल्ली?' हा प्रश्न सर्वांनाच पडत असावा. पण ह्यांच उत्तर खुद्द सुनीताबाईनीच देऊन ठेवलंय. भाई... अर्थात एक व्यक्ती आहे. तिला देव बनवून देव्हाऱ्यात बसवू नका. ह्या व्यक्तीला ही आशा-निराशा, संकट आहेतच की, ह्या पुलंरूपी व्यक्तीला अनेक अंगभूत गुण होते. ह्या अनेकपदरी गुणांनी 'वल्ली' बनवले.

पुलंची निरिक्षणशक्ती अफाट होती. ह्या निरिक्षण शक्तीला जोड होती ती चपखल असणाऱ्या शब्दांची. आपण सामान्य माणसं एखादी घटना बघतो, पण पुलंना नेहमी त्यातील वैशिष्ट्य, वेगळेपण जाणवायचं.''

पु.लं. तेव्हा वरळीच्या आशीर्वाद बिल्डींगमध्ये रहात होते. त्यांच्या घरी एकदा सतार वादक शंकर अभ्यंकर आणि शेवडे नावाचे एक उंच, धिप्पाड गृहस्थ तबला आणण्यासाठी म्हणून गेले. शेवडे हे दरवाज्यातच उभे राहिले. तबला न्यायला आलोय असं त्यांनी सांगताच पुलंनी, ''आमचा तबला अगदी तुमच्यासारखाच आहे.'' असं सांगताच त्या बिचाऱ्याला काही कळल नाही. तो तर आडदांड धिप्पाड आणि तबला तर नेहमी सारखाच, मग पुलं असं का म्हणाले, हे दोघांनाही कळेना. तबल्यावरची गिरदी काढताच दोघांच्याही एक समान गोष्ट लक्षात आली आणि ती म्हणजे तबल्यावर शाई नव्हती आणि शेवडेंच्या डोक्यावर एकही केस!

आपल्यासारख्यांना एखाद्या गोष्टीच साधर्म्य कळून, त्यावर काही सुचणं हे अती अवघड पण पुलं सारख्या प्रतिभावंताला ते क्षणार्धात सुचलं.

पुलंसारख्या थोर व्यक्तीच्या सानिध्यात, तितक्याच महनीय व्यक्ती येत असतं. अशाच काही प्रसंगात त्यांची हजरजबाबी वृत्ती दिसून येई.

एका समारंभात शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे आणि पुलंची गाठ पडली. बाबासाहेब बोलण्याच्या ओघात बोलून गेले. ''तुमच्या घरी काय तुम्ही आणि सुनीताबाई सारखे खो खो हसत असणार, त्यावर गंभीरपणे पुल त्यांना म्हणाले, ''तुमच्या घरीसुद्धा बायको तुमच्यावर तलवारीचे सारखे वार करतेय आणि तुम्ही ते ढाल हाती घेऊन चुकविताहात असंच चित्र असतं का हो?''

शब्दांचे खेळ हे पुलंना लिलया जमत. एखादी साधी गोष्ट ही सांगताना त्यांनी कशी सांगितली आहे बघा. एका लेखात विसावे शतक, 'चाळीशीत' शिरले. तेव्हा मी 'विशीत' आलो होतो, असा आपल्या वयाचा उल्लेख

केलेला आढळतो. चाळीस आणि वीस ह्या अंकांचा एक प्रकारे हा खेळच म्हणावा लागेल. १९४० साली मी वीस वर्षांचा होतो असं सरळ न सांगता अकांची जादुगिरी करीत सांगितलंय.

पुलंचा हजरजबाबीपणाचा हा किस्सा तर अफलातून आहे. प्रसिद्ध अर्थतज्ञ डॉ. नरेंद्र जाधव, यांच्या 'आमचा बाप आणि आम्ही' या आत्मकथनाच्या दुसऱ्या आवृत्तीचे पुलंच्या हस्ते प्रकाशन होते. तिथे केलेल्या आपल्या भाषणात ते म्हणतात, ''साहित्यात सध्या बराच 'अनर्थ' घडत असताना एका अर्थतज्ञाने हे पुस्तक लिहिले आहे हे विशेष. या आत्मकथनातील 'बाप' खरे तर सर्व साहित्यीकांचाच बाप आहे.

'पुल'नी डॉक्टरांवरही मिश्किलपणे लिहिलं आहे.

गवई लोक गाण्याची प्रॅक्टीस करतात, खेळाडू खेळाची प्रॅक्टीस करतात, डॉक्टर लोकही आपण प्रॅक्टीस करतो म्हणतात, पण कसली प्रॅक्टीस, त्याचा पत्ता लागू देत नाही.

रोग्याला जिवंत ठेवण्यासाठी गोळीबार करत राहणारे फक्त डॉक्टरच..!!

रोगातून बरा होण्यासाठी 'इंपेशंट' झालेल्या माणसाला 'पेशंट' का म्हणतात ते ही कळत नाही.

पुलंच्या वर चार्ली चॅप्लीनचा प्रभाव होता. त्यांनी जीवनावर हसत हसत ज्याप्रकारे भाष्य केलं आहे, त्यावरून दिसून येतं. ''जन्मापासून मृत्यूपर्यंत नियती आपली सर्वांची फसवणूक करीत असते. ह्या फसवणूकीतून आपली व इतरांची सुटका करून घेण्यासाठी अधुनमधून 'हसवणूक' करण्यापलिकडे आपण दुसरे काय करणार...?''

प्रत्येक प्रसंगी त्यांची मार्मिक भाष्य करण्याची वृत्ती अचंबित करते. एकदा नाट्य निर्माते मोहन वाघ पुलंना भेटायला गेले. पुलंच्या हाती पेढ्याचा बॉक्स ठेवीत त्यांनी आपल्या नवीन नाटकाचे अगदी थोड्या दिवसांत खूप प्रयोग झाल्याचं आनंदाने सांगितले. वाघांनी दिलेल्या पेढ्यांकडे पहात पुलं म्हणाले, ''अरे वा ! म्हणजे वाघ मागे लागल्यासारखेच तुम्ही नाटकाचे प्रयोग करताहात तर...''

पुलंची किती रूप आठवावीत... कथांचे सादरीकरण करणारे, सबकुछ 'पुल' असणारा गुळाचा गणपती ह्या सिनेमातील, 'पेटी' मधून संवाद साधणारे, प्रवास वर्णन, व्यक्तिचित्रण ह्या व इतर पुस्तकांमधून दिसणारे, सादरीकरण करताना, नुसतं तोंडावरून हात फिरवताना आपल्याला गुदगुदल्या करणारे, एका पुरूषोत्तमामध्ये एवढे सगळं सामावले आहे. त्यांच्या सामाजिक बांधिलकीवर तरी किती तरी लिहिता येईल. डॉ. अनिल अवचटांच्या व्यसनमुक्ती केंद्राला 'मुक्तांगण' हे इतकं समर्पक नाव देणं फक्त त्यांनाचं सुचू शकतं. ह्यांनी आम्हाला हसत हसत जगायला शिकवले, म्हणून आम्ही जगलो...

एक प्रश्न कायम मनात येतो, ''हे सर्व येतं कुठून?'' ही त्यांच्यावर बरसलेली दैवी देणगीच म्हणावी लागेल.. 'पुलं' तुम्हांस कोटी कोटी प्रणाम !!!

**निरुता भाटवडेकर**
'तक्षशीला' पाठारे मार्ग,
शिवाजी पार्क, दादर, मुंबई-४०० ०२८.
Email : nirut68@yahoo.com
Mobile : No 9820622702

❑ ❑ ❑

*With Best Compliments From*

**UNIQUE**

**Unique Photo Offset Services**

**Ashok Nerkar**

132, Adhyaru Industrial Estate,
Sun Mill Compound, Lower Parel,
Mumbai 400 013.
☎ : 2496 4632, 2496 4633, 5660 6881
Fax : 5660 6882


# ''योगी पावन मनाचा/साहे अपराध जनाचा''

**- जगजीवन श्रीकांत प्रभु**

**''गुरुर्ब्रह्म गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वः ।**
**गुरूः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ।।''**

श्रीमत् परमहंसादि यथोक्त ब्रीदांकित कुटस्थ सिंहासनाधिश्वर श्रीमंच्छंकराचार्यान्वय यम नियमासन प्राणायाम प्रत्याहार ध्यान धारणा समाध्यष्टांगयोग निरत श्रीविद्यापूर्णानंद स्वामी करकमलोद्भव श्रीमत् प्रद्युम्नानंद स्वामी हे सध्या श्रीमठ संस्थान दाभोली मठाच्या पीठाधिशपदी विराजमान आहेत.

श्रीमत् प्रद्युम्नानंद स्वामी महाराज पीठाधीशपदी विराजमान झाल्यावर त्यांनी ज्ञाती आणि समाजाच्या हितासाठी अनेक उपक्रम सुरू केले आहेत. आपल्या खडतर उपासनेने त्यांनी अनेक साधक घडविले आहेत. स्वामी महाराजांनी मठात वेदपाठशाला सुरू केली. मठातील अनेक अनुष्ठाने आज या विद्यार्थ्यांकडूनच करून घेतली जातात. विधियुक्त धार्मिक कार्य करण्याबद्दलचे मार्गदर्शन स्वतः स्वामी महाराज विद्यार्थ्यांना करीत असतात. त्यामुळे मठाच्या वेदपाठशाळेचा आगळावेगळा ठसा समाजावर उमटला आहे.


श्रीमत् प्रद्युम्नानंद स्वामी

श्रीमठ संस्थान दाभोली येथील श्रीमत् रामानंद स्वामी ब्रह्मीभूत झाल्यावर या पिठाची गुरुपरंपरा काही काळ खंडित झाली होती. श्रीमत् पूर्णानंद स्वामींच्या संजीवन समाधीच्या प्रसादाने, परंपरेने श्रीमत् प्रद्युम्नानंद स्वामींचे गादीग्रहण शास्त्रोक्त पद्धतीने संपन्न झाले. काही काळ मठात गोशाळा, वेदपाठशाळा खंडित झाली होती. स्वामी महाराजांनी वेदपाठशाळा त्वरीत सुरू केली. मठाच्या वेदपाठशाळेत अध्ययन केलेले अनेक पुरोहित आज समाजात धार्मिक पुजाविधी, वेदपठण, होमहवन, रुद्राभिषेक, श्रीसूक्त उपासना आदि धार्मिक विधी मोठ्या प्रमाणावर करत असतात.

आपल्या ज्ञातीत पारमार्थिक उपासनांचे अनेक पंथ व परंपरा प्रचलित आहेत. यासाठी दाभोली मठातील पिठाधिशांकडून नियमितपणे मार्गदर्शन होत असते. आपल्या ज्ञातीने सांभाळलेला वैदिक उपासनेचा वारसा जतन करण्यासाठी ज्ञातीबांधवांना व्रतस्थ सन्याशांकडून मार्गदर्शन होत असते. श्रीमत् आद्य शंकराचार्यांपासून चालत आलेली ही परंपरा श्रीमत् प्रद्युम्नानंद स्वामींनी उत्तम प्रकारे जोपासली आहे. श्रीमत् प्रद्युम्नानंद स्वामी मठाधिशपदी विराजमान झाल्यानंतर मठाच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते. स्वामींच्या मार्गदर्शनाखाली मठात नैमित्तिक पूजाविधी, होम-हवने, गणेशयाग, चंडीयाग, नक्षत्रयाग, पवमान, महारूद्र अशा विविध वैदिक उपासनेबरोबर जपजाप्य, अखंड हरीनाम सप्ताह आदि धार्मिक विधींचे नित्यनियमाने आयोजन केले जाते. स्वामींचे असंख्य अनुग्रहीत शिष्य संप्रदाय नामस्मरण आदि धार्मिक विधींचे नित्यनियमाने आयोजन करत असतात.

श्रीपाद प्रभुंच्या उपासनेद्वारे, त्यांच्याच अनुग्रहाने श्रीमत् प्रद्युम्नानंद स्वामी जपजाप, ध्यानधारणा, तपस्येतून प्राप्त होणारे फल स्वतःकडे न घेता श्रुजनांना अर्पण करतात. स्वामी आपल्या तपोबलाद्वारे समस्त भक्तांची आधिव्याधीतून, कर्मबंधनातून मुक्त करतात. याची प्रचिती त्यांच्या असंख्य भक्तांनी अनुभवली आहे.

श्रीमत् प्रद्युम्नानंद स्वामींना ज्या ज्या वेळी प्रकृती अस्वस्थता जाणवते त्या त्या वेळी त्यांचे पुण्या-मुंबईतील तसेच बेळगाव, नरसिंहवाडी, नासिक, कुडाळ आदि भागातील त्यांचे कित्येक शिष्यगण त्यांना उत्तम औषधोपचार आदि सेवा उपलब्ध करून देताना दिसतात. त्यांच्या ह्या शिष्य संप्रदायांची स्वामीभक्ती पाहून मनाला खरोखरच धन्यता वाटते.

दाभोली मठातील गुरुपिठाधिशांची गुरुपरंपरा आणि कुडाळदेशकर आद्य गौड ब्राह्मण महामंडळ ही सेवेकरांची संस्था आहे याची जाण प्रत्येक ज्ञातीबांधवांना आपल्या मनात रुजवता आली पाहीजे. यातूनच आपले इच्छित साध्य होणार आहे.

श्रीमत् प्रद्युम्नानंद स्वामी **''योगी पावन मनाचा/साहे अपराध जनाचा ।।''** या मुक्ताईच्या वचनाप्रमाणे आपल्या आचरणाची भक्तांना प्रचिती देतात यातच स्वामींचे मोठेपणा सामावलेले आहे.

**- श्री. जगजीवन श्रीकांत प्रभु** (मुलुंड पूर्व)
दूरध्वनी क्र. ०२२-२५६३८५३२

# SUCCESS STORIES... झुंजार कमलताई परुळेकर

मनीष दाभोलकर



कमलताई परुळेकर

आजतागायत आपण कला, उद्योग-धंदा, धाडस, शौर्य, स्वप्न, जिद्द बाळगणाऱ्या सर्वसामान्यांच्या SUCCESS STORIES वाचल्या ज्यात असामान्य कर्तृत्वाने त्यांनी आपला नावलौकिक विविध क्षेत्रातून काम करत वाढविला. परंतु समाजात दुसऱ्यांच्या न्याय हक्कासाठी लढा देणारी, त्यांची बाजू सरकार व निर्णयकर्त्यां समोर शांततेच्या मार्गाने मांडणारी, मोर्चे व न्यायालयीन लढे देऊन न्याय हक्कासाठी लढणारी महिला व इतरांच्या यशा मध्येच आपला SUCCESS शोधणारी म्हणजेच कमलताई परुळेकर यांची जीवन कहाणी..... खास आपल्यासाठी.

बाळकृष्ण गणेश परुळेकर उर्फ दादा यांनी स्वातंत्र्य मिळवण्यासाठी महात्मा गांधीच्या हाकेला हाक देऊन आपले आयुष्य पणाला लावले अशा दादांच्या घरात कमलताईंचा जन्म १३ मार्च १९५५ ला कोल्हापूरला झाला. कोल्हापूर मध्ये त्यांच्या वडीलांना शामराव म्हणून सुद्धा ओळखत, त्यांचे कोल्हापूरला एक टेलरिंगचे दुकान होते. ७/८ मशिन्स आणि तितकेच कामगार. दादांना सामाजिक कार्याची भयंकर आवड. कमलताईंच्या आई जानकी कोकणातील म्हापण गावच्या सुमती सदाशीव ठाकूर. त्या सुद्धा काज-बटण करणे, हात शिलाई करणे, चरख्यावर सुत काढणे ते विकणे अशी कामे करुन आपल्या कुटुंबाला मदतीचा हातभार लावत. कमीत कमी पैशात आनंदी कसे जगायचे याचा धडा कमलताई आणि त्यांच्या भावंडाना आईनेच दिला आणि समाज सेवेची प्रेरणा वडीलांकडून मिळाली. घरात काका, मामा, मावश्या, त्यांची मुले असा गोतावळा सांभाळत त्यांनी शिक्षण घेतले.

कमलताईना वयाच्या तिसऱ्या वर्षी पोलिओ झाला. गरीबीतही त्यांच्या आईवडीलांनी निकामी पायाला जिवदान देण्यासाठी खुप औषधोपचार केले. शालेय शिक्षण ताराराणी हायस्कूल व भोसले हायस्कूल मधून घेतले. अभ्यासात त्या खूप हुषार असल्याने राष्ट्रीय शिष्यवृत्ती मिळवत त्या एस.एस.सी. मध्ये ७६% गुण मिळवत पास झाल्या. १९७० साली एस.एस.सी. पास झाल्यावर राजाराम कॉलेज, कोल्हापूर मधून B.Sc in chemistry ची डिग्री मिळवली. पुस्तकी ज्ञानापेक्षा परिस्थिती माणसाला खुप काही शिकवते असे म्हणतात. तसेच काहीसे कमलताईंच्या बाबतीत झाले. म. गांधीचा संदेश पाळत त्यांच्या वडीलांनी समाजाच्या शेवटच्या माणसांपर्यंत पोहचण्याचा निर्णय घेतला. दादांनी हरिजन सेवक संघाचे काम खेडेगांवातून व हरीजन वस्त्यातून सुरु केले. अशा वातावरणात वाढलेल्या कमलताईना पण समाज सेवेची आवड निर्माण झाली. थोडक्यात सांगायचे तर इथूनच त्यांच्या समाज कार्याला दिशा मिळाली.

कमलताईंचे आजोळ म्हापण, शाळेला सुट्टी पडली की आंबे खायला इथे यायच्या. १९७८ मधे कोकणात पणदूर गावात एक स्वस्त घर मिळाले म्हणून त्यांच्या वडीलांनी घेतले. गावात हे घर भुताटकीचे घर म्हणून प्रसिद्ध होते. पण त्या सांगतात, पुढे आम्ही त्या भूतानांच घरातून हाकलुन लावले. सिंधुदुर्गात पहिली यशस्वी पोल्ट्री १९७८ साली त्यानी पणदूर मधे सुरु केली. इतर तरुणांना पण त्याचे ज्ञान देण्याचे काम कमलताई व त्यांचे वडील करू लागले.

१९७४ साली विशेष गुण मिळवून पदवीधर झाल्यावर सहाजिकच कमलताईनी नोकरी पत्करली. ४ वर्षे मुंबईत आणि मग कुडाळ येथे हायस्कूल मध्ये गणित व विज्ञान विषयाच्या शिक्षिका म्हणून काम केले. पण घरातील वातावरणाचा पगडा त्यांच्यावर असल्याने नोकरीत त्यांचे मन रमेना. या दरम्यान भारतात आणीबाणी जाहीर झाली. आणीबाणीतील लोकशाहीची मुस्कटदाबी ऐकत वाचत गेल्याने आपण या विरोधात काहीतरी करावे असे वाटू लागले आणि एका नवीन वळणाची सुरुवात कमलताईनी केली.

१९८० साली कुडाळ पंचायत समिती सदस्या म्हणून त्यांना स्विकृत केलं गेलं. इथे काम करताना त्यांना प्रशासकीय कामांची माहिती व ज्ञान मिळत गेले. इथे माहिती नुसती घेऊन त्या गप्प बसल्या नाहीत तर या योजनांचा गरीबांना कसा उपयोग होईल हा विचार त्यानी केला. त्यानुसार लोकांना शिक्षित केले आणि समाजातील गरीबांपर्यंत या योजना पोहचवल्या. आजही त्या सरकारी योजना कोणत्या आणि त्याचा लाभ कोणाला व कसा घेता येईल याबद्दल सल्ला देत आहेत. १९८१ ला सिंधुदुर्ग जिल्ह्याची निर्मिती झाली. या काळात दोन बड्या राजकीय नेत्यांच्या भांडणात जिल्हा केंद्र

ठरेना म्हणून मध्यवर्ती ठिकाण ओरोसला जिल्हा केंद्र बनवावे यासाठी काढलेल्या मोर्चात त्या सामील झाल्या आणि इथूनच मोर्चा काढणे जणू त्यांच्या अंगवळणीच पडले. झगडून एखाद्याला न्याय मिळवून देणे हे त्यांचे ध्येय बनले. ह्या काळात जिल्ह्यातील अनेक समाजवादी चळवळींचा त्या भाग होऊ लागल्या त्यामुळे नानासाहेब गोरे, एस. एम. जोशी, मधु दंडवते, मृणाल गोरे इतर अनेक दिग्गज समाजवादी व्यक्तींच्या संपर्कात त्या आल्या. सामाजिक परिवर्तनाचा एक भाग होऊन जगायचे त्यानी ठरवून टाकले. सिंधुदुर्ग जिल्ह्याचे कार्यालय सावंतवाडीला होते. जिल्ह्या तर्फे मोफत कायदा सल्ला समिती वर कमलताईंची निवड झाली व अनेक वरीष्ठ अधिकाऱ्यान समवेत शक्य तितक्या तडजोडी करुन भांडणे मिटविण्याचे काम त्यानी अनेक वर्षे इमानेइतबारे केले. बालकल्याण मंडळाची अध्यक्षा म्हणून ३ वर्षे काम केले. रिमांड होमला ॲडमिशन, मुले दत्तक घेणे वगैरे इत्यादी कामे त्यांनी निस्वार्थी पणे केली.

१९९२ साली सिंधुदुर्गाची पहिली जिल्हा परिषद निवडणूक झाली, यात कमलताईना जनतादला तर्फे कसाल मतदार संघातून तिकीट देण्यात आले. त्या निवडणुकीत त्या जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आल्या. १९९७ सालापर्यंत वरोधी पक्ष नेत्या म्हणून काम केले. कायद्याचे ज्ञान इथे त्यांना उपयोगी पडले. सत्ताधाऱ्यानी लोकशाहीत कायद्याच्या चौकटीत राहून काम करावे यासाठी कधी त्याना सहकार्य करत तर कधी आसुड ओढत. लोकशाही बळकट करण्याचा तसेच भ्रष्टाचार रोखण्याचा प्रामाणिक प्रयत्न पण त्यानी केला.

''विना सहकार नाही उद्धार'' ही गोष्ट ओळखून सहकारातही कमलताईनी खुप कामे केली. सहकार बोर्डाच्या सदस्या म्हणून त्यांनी काम पाहीले. अपंगांची सहकार संस्था, महिला सहकारी संस्था. महिलांनी सक्षम होऊन स्वत: काम करावे व आपल्या गृहस्थीला हातभार लावावा, त्यासाठी त्याना आर्थिक मदत व्हावी ह्या उद्देशांनी कमलताईनी महिला पतसंथा काढल्या व इतरांना तसे करण्यास मदत केली. कोतवाल, ग्रामपंचायत कर्मचारी, सफाई कामगार, वनीकरण कर्मचारी, रस्ता कामगार आणि अंगणवाडी कर्मचारी यांना संघटीत करुन त्याना न्याय देण्यासाठी मोर्चा, धरणे, सत्याग्रह, जेल भरो आदोलने केली.

अंगणवाडी कर्मचारी म्हणजे खेड्यातील लोकांसाठी आपल्या लहान वयाच्या मुलांची दुसरी आईच असते. अशा



अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सरकार कडून पुरेसा मानही मिळत नाही आणि धन ही. म्हणूनच कमलताईनी ह्या सगळ्यांना एकत्र आणले आणि आजही त्याना योग्य न्याय मिळण्यासाठी मोर्चा काढत आहेत, जेल भरो आंदोलन करत आहेत. अंगणवाडी कर्मचाऱ्यांची एक पतपेढी पण त्यानी काढली आहे. आज एक कोटीवर भागभांडवल, तसेच कोट्यावधींच्या बचत ठेवींसह सतत '**अ**' वर्ग मिळवणारी ही एक पतसंस्था आहे.

आज वयाची साठी ओलांडल्यानंतरही कमलताई थकल्या नाहीत. अंगणवाडी सेविका ''पोटापुरता पगार'' या मागणी पासून आजही दूर आहेत. २० ते ३५ वर्षे वयाच्या या तरुण अंगणवाडी सेविका निराशाकडे झुकल्या आहेत. सेविकांचा चार दशका पासून व राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानातील आशा यांचा गेल्या दशकभर संघर्ष सुरु आहे. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना न्याय देणाऱ्या अंगणवाडी कर्मचारी सभा (महाराष्ट्र) च्या राज्य सरचिटणीस म्हणून कमलताई काम पहात आहेत. ताराराणी नागरी सहकारी पत संस्थेच्या त्या चेअरमन आहेत. कोकण सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे कामगार संघाच्या अध्यक्षा म्हणून रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांसाठी त्या आजही कार्यरत आहेत. अनेकांचे मोडकळीस आलेले संसार जोडण्याचे काम त्या सरकार कडून कोणतीही आर्थिक मदत न घेता कौटुंबीक सल्लागार केंद्रात काम करत आहेत. त्या म्हणतात, आजकाल अन्याय झालेल्या प्रत्येक ठिकाणी आपणास धावून जाता येत नाही. पण त्याना सल्ला देण्याचा प्रयत्न जरुर करते. चांगल्या अधिकाऱ्यांकडून फोनवरुन काम होत असेल तर मी जरुर करुन घेते. श्रमिकांच्या, कष्टकऱ्यांच्या, वंचीतांच्या जीवनात परिवर्तन यावे यासाठी प्रयत्नशील असते आणि शेवटपर्यंत राहीनच.

वर्ग, वर्ण, लिंग, जात, धर्म, पंथ या सर्वा पलीकडे एक प्रेमळ निर्मळ एकसंघ समाज निर्माण करणे ह्या समाजवादीच्या विचाराने प्रेरित झालेल्या कमलताईंचे हे एक स्वप्न आहे, हे स्वप्न साकार करणे हेच त्यांच्या जीवनाचे एकमेव उद्दिष्ट आहे असे त्या सांगतात. ते एक ना एक दिवस साकार होईल असा त्यांना विश्वासही आहे.

अशा ह्या ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्त्या ज्यांनी कोकण रेल्वेचे शिल्पकार माजी केंद्रीय अर्थमंत्री मधु दंडवतें बरोबर काम केले, आयुष्यभर त्यांच्या विचारावर निष्ठा ठेवून सिंधुदुर्गासह महाराष्ट्रात अंगणवाडी कर्मचारी, विविध क्षेत्रातील कामगारांना संघटीत करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आंदोलन, मोर्चा, सत्याग्रह सारख्या अहिंसक मार्गाचा अवलंब केला अशा कमलताईना दत्ता देशमुख पुरोगामी मंचा तर्फे सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये राज्यस्तरीय पातळीवरचा दत्ता देशमुख गौरव पुरस्कार देऊन २०१८ साली सन्मानित करण्यात आले. तसेच १० मार्च २०१९ रोजी सारस्वत चैतन्य पुरस्कार व कै. जयानंद मठकर स्मृती पुरस्कार (कामगार क्षेत्रातील उत्कृष्ट) कामगिरी बद्दल १८ एप्रिल २०१९ रोजी देण्यात आला.

कमलताई परुळेकर यांचे समाजातील तरुणांसाठी सांगणे आहे कि बुद्धिमत्ता तर आपल्याकडे आहेच, त्या आधारे स्वत:ला नोकरी मिळाली नाही म्हणून नाराज न होता स्वयंरोजगाराकडे वळा व इतरानाही नोकरी देण्याची क्षमता स्वत: मध्ये निर्माण करा, तशी जिद्द बाळगा. महिलावर्ग तर पाककलेत निपुण आहेच, त्याचे मार्केटिंग करायला शिकावे लागेल; समाजाने एकत्रित प्रयत्न केले तर दुनिया एक मुठ्ठीमे करायला वेळ नाही लागणार.

राजकारण आणि समाजसेवा याचे मिश्रण जरा आपल्याला पचत नाही ना? पण आपल्या ज्ञातीत अशी माणसं आहेत जी राजकारण आणि समाज सेवा, कोणताही स्वार्थ न ठेवता करतात. राजकरणी म्हंटले म्हणजे एक कपटी, धूर्त, गडगंज संपत्ती असणारे व्यक्तिचित्र नजरे समोर येत. कमलताई म्हणजेच एक निस्वार्थी राजकारणी. आजकाल आपली कारकीर्द आणि पैसा कमवणे हे ध्येय प्रत्येकाचे झाले आहे पण ह्या गोष्टीची हाव न करता स्वतःला समाजकार्यात झोकून देणाऱ्या कमलताई परुळेकरांची SUCCESS STORY लिहीताना अभिमान वाटतो की अशा स्त्रिया आपल्या समाजात आहेत. गौड ब्राह्मण सभे कडून कमलाताई तुमच्या कार्याला सलाम व हार्दिक शुभेच्छा!

❑ ❑ ❑

With Best Compliments From

Shrikant S. Joshi
Jitendra N. Joshi

**Ramchandra Keshav & Co.**

**GOLD, SILVER, DIAMOND AND PEARL JEWELLERY**

**TIME : 10.30 A.M. To 8.00 P.M.**
**Friday Closed**

53, Mohan Bldg., 162, J.S.S. Road, Girgaum, Mumbai 400 004.
Tel.: 2388 7874 / 2388 2060

# जपानी भाषा जगणाऱ्या छाया ताई

तुषार नाईक


श्रीमती छाया नाईक

संघर्ष करून शिक्षण घेतलेल्या मुंबईतील छाया नाईक आज वयाच्या ७२व्या वर्षीही मुलांना जपानी भाषा शिकवत आहेत. अशा या जपानी भाषा सर्वार्थाने जगणाऱ्या छायाताईंची ओळख करून देणारा हा लेख...

जपान... उगवत्या सूर्याचा देश... पश्चिमात्त्य संस्कृतीच्या जागतिक प्रभावातही आपली शाश्वत मूल्ये अबाधित ठेवलेला असा हा विकसित देश. आज मुंबईसह देशभरातील विकास प्रक्रियेत जपानच्या विविध कंपन्यांचा सक्रीय सहभाग दिसून येतो. त्यामुळे भारतासह जागतिक पातळीवरही जपानी भाषेचे महत्त्व नाकारून चालणार नाही. अशाच जपानी भाषेचे धडे देणाऱ्या मुंबईच्या छाया नाईक. छायाताईंचे वैशिष्ट्य हेच की, वयाच्या तब्बल ५२ व्यावर्षी त्यांनी जपानी भाषा शिकायला सुरुवात केली आणि आज वयाची सतरी ओलांडल्यानंतरही त्यांचे हे ज्ञानदानाचे कार्य अव्याहतपणे सुरू आहे. छायाताईंचे बालपण गिरगावात गेले. पदव्युत्तरपर्यंतचे शिक्षण कसेबसे नोकरी करून त्यांनी पूर्ण केले. त्यांचे वडील मुंबई महानगरपालिकेत नोकरीला होते. परंतु. छाया आठवीला असताना ते निवृत्त झाले. त्यामुळे छाया व त्यांच्या भावंडांनी वडिलांना मिळालेल्या फंडावर आणि शिष्यवृत्तीवर शिक्षण पूर्ण केले. महालेखापाल कार्यालयात नोकरी मिळाली. १९७२ मध्ये त्या विवाहबद्ध झाल्या.

लग्नानंतर सासरच्यांनी त्यांना पुढील शिक्षणासाठी सहकार्य केले. त्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या एस.ए. एस. परीक्षेचा पहिला टप्पा पास झाल्या, तर त्यांची मुलगी अडीच महिन्यांची असताना दुसरा टप्पाही त्यांनी उत्तीर्ण केला. पुढे परीक्षा, पदोन्नतीचा प्रवास करत त्या ऑडिट ऑफिसर झाल्या. छायाताईंची मुलगी फ्रेंच भाषा शिकतच होती. मुलीसोबत छायाताई एका कार्यशाळेला उपस्थित होत्या. त्यावेळी वक्त्यांनी सांगितले की, 'जगात सर्वात कठीण असणाऱ्या भाषांमध्ये जपानी आणि अरेबिक यांचा समावेश होतो. मग काय. एक आव्हान म्हणून वयाच्या ५२व्या वर्षी छायाताईंनी जपानी भाषा शिकण्याचा विडाच उचलला. पहिल्याच वर्षी त्यांनी जपानी भाषेतील वकृत्व स्पर्धेत भाग घेतला आणि बक्षीसही पटकावले. दुसऱ्या वर्षीही ही परंपरा त्यांनी कायम ठेवली आणि बक्षिसासोबत 'वेस्ट झोन'साठी त्यांची निवड झाली. ती स्पर्धा जिंकल्यावर त्यांना दिल्लीला पाठविण्यात आले. त्यामुळे त्यांना जपानी भाषेची अधिकाधिक आवड निर्माण झाली.

'एन ५' ते 'एन १' असे जपानी भाषा शिकतानाचे स्तर पाच असतात. 'एन ५' हा पायाभूत स्तर आहे, तर 'एन १' हा उच्च स्तर. छायाताईंनी १९९७ साली जपानी भाषा शिकण्यास सुरुवात केली आणि २००३ मध्ये समाजकल्याण अधिकारी असताना त्या 'एन २' परीक्षा उत्तीर्ण झाल्या. सध्या त्या 'एन १'ची तयारी करत आहेत नवीन भाषा असल्यामुळे साहजिकच जपानी भाषा शिकताना त्यांना अडचणी आल्या. सुरुवातीला छायाताईंनी जपानी भाषेतील अक्षरे व वर्णमाला शिकण्यास सुरुवात केली. आयकर विभागातील ऑडिट मध्ये सिनिअर ऑडिट ऑफिसर म्हणून कार्यरत असताना त्यांना भाषा शिकण्यासाठी फारसा वेळ मिळत नसे. मग कार्यालयात जाता-येता, रेल्वे प्रवासात, रविवारी त्या जपानी भाषेचा अभ्यास करायच्या. त्यातही काही अडले तर पटकन उत्तर द्यायला इंटरनेटचीही सोय नव्हती. तरीही हार न मानता छायाताईंनी जपानी भाषा आत्मसात केली. छायाताईंनी आपल्या आयुष्याचे चार 'डि' अर्थात 'डिसिजन, डिटरमिनेशन, डेडिकेशन, डिसिप्लिन' यावर लक्ष्य केंद्रित केले. तसेच यशप्राप्तीसाठीही विद्यार्थ्यांना आजही त्या या चार 'डी'वर लक्ष्य केंद्रित करण्याचा मोलाचा सल्ला देतात. छायाताईंना युरिको नावाच्या

शिक्षिकेने जपानी भाषा शिकवण्याचे वर्ग घेण्याचा सल्ला दिला आणि घरच्या घरी मग सुरुवातीला तीन विद्यार्थ्यांसह छायाताईंनी जपानी भाषेचे वर्ग सुरु केले. त्या विद्यार्थ्यांनीसुद्धा 'एन २' हा स्तर पूर्ण केला. हळूहळू विद्यार्थी वाढत गेले. सुरुवातीला अल्पदरात त्या शिकवत होत्या. परंतु मग भाडे वाढल्यामुळे आणि पुस्तकांचा खर्च असल्यामुळे त्यांनी शिकवणी शुल्क वाढविले. पण, काही गरीब विद्यार्थ्यांना त्या आजही मोफत शिकवितात. गेल्या १५ वर्षांत छायाताईंच्या हाताखाली दीडशेहून अधिक विद्यार्थ्यांनी जपानीचे धडे गिरविले आहेत. सध्या त्यांच्याकडे ५० विद्यार्थी जपानी भाषेचे शिक्षण घेत आहेत.

२०१० साली छायाताई जपानला आधुनिक व्याकरण शिकण्यासाठी गेल्या होत्या. तेव्हा एकदा त्या एका फुलाला स्पर्श करून बघत होत्या. त्यावेळी एक लहान मुलगा आला आणि त्याला वाटले की त्या फूल तोडत आहेत. तो म्हणाला की, 'सावरा नाई वे कुदासाई' म्हणजे 'फूल तोडू नका.' त्या एकदा स्वच्छतागृहामध्ये छत्री विसरल्या होत्या. त्यांनी जिथे छत्री ठेवली होती, तिथेच त्यांना दुसऱ्या दिवशी मिळाली, अशा काही जपानच्या आठवणी त्या सांगतात. जपानी भाषा शिकण्याच्या अडचणींबद्दल विचारले असता छायाताई सांगतात की, 'सध्या बारावीचे फ्रेंच व जर्मन भाषांचे प्रश्नसंच उपलब्ध होतात. पण जपानी भाषेचे प्रश्नसंच आजही मिळत नाही.'' त्यामुळे 'नवनीत प्रकाशन'शी संपर्क करून जपानी भाषेचा प्रश्नसंच करण्याचा त्यांचा मानस आहे. छायाताईंच्या वर्गात यंदा १८० पैकी १७० गुण मिळवून एका विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक पटकावला आणि हा निकाल पाहून अनेक विद्यार्थी छायाताईंकडे शिकण्यासाठी येतात. युट्यूब व्हिडिओद्वारेही त्या जपानी भाषेचे विद्यार्थ्यांना धडे देतात. अशा या जपानी शिक्षिकेला ''गौड ब्राह्मण सभे'' तर्फे पुढील प्रवासासाठी शुभेच्छा.

स्थापना : १८९७

**गौड ब्राह्मण सभा**

**गिरगाव, मुंबई – ४०० ००४.**

**(नोंदणी क्र. ए ८३२ मुंबई)**

**** संस्थेचे पदाधिकारी ****

**(सन २०१८ – २०१९)**

***अध्यक्ष***

**डॉ. विलास रामकृष्ण देसाई**

***उपाध्यक्ष***

**श्री. देवदत्त आत्माराम खानोलकर**

**श्री. सुधाकर सखाराम पाटकर**

***विश्वस्त***

**प्रा. जगदीश साबाजी वालावलकर**

**श्री. नरसिंह नारायण पंतवालावलकर**

**श्री. अच्युत वामन तेंडुलकर**

***कार्यकारी मंडळ***

**(सन २०१८-१९)**

***कार्याध्यक्ष***

**श्री. उमाकांत गणपत महाजन**

***चिटणीस***

**श्री. सुभाष दत्तात्रय वाघ**

***सर चिटणीस***

**श्री. रत्नाकर प्रभाकर तेंडोलकर**

***खजिनदार***

**श्री. मनीष गुरुदास दाभोलकर**

***कार्यकारी मंडळ सभासद***

**श्री. पंढरीनाथ विठ्ठल सरनाईक, श्री. मधुकर दयानंद सामंत, श्री. जगजीवन श्रीकांत प्रभु, श्री. प्रमोद वसंत देसाई, श्री. सतीश गजानन सामंत, श्री. योगेश मोहन खानोलकर, श्री. अनिकेत रवींद्र वालावलकर, वीणा विश्वनाथ दाभोलकर**




नूतन वर्षाभिनंदन शालीवाहन शके १९४१ ! गौ. ब्रा. त्रैमासिकाचा प्रथम त्रैमासिक अंक इ.स. २०१९ नेहमीप्रमाणे सुंदर होता. साऱ्या संबंधितांचे आभार!

'जगी सर्व सुखी असा कोण आहे?' हा कु. रागिणी मुणगेकर या युवतीचा लेख फार आवडला हार्दिक अभिनंदन संतसाहित्या मधील तदनुषंगीक काही विचार आठवले.

जरी माझी काया आणि वाणी ! गेली म्हणाल अंत:करणी परि मी आहे जगज्जीवनी निरंतर ॥

**–समर्थ रामदास** (आत्माराम)

दुख में सुमिरन सब करै।
सुख में करे न कोय॥
जो सुख में सुमिरन करै।
तो दुख काहे होय॥

**– दोहा संत कबीर**

उपासनेने मनाची अवस्था संतुलीत झाल्याने सहनशक्ती वाढते. त्यामुळे संकटावर मात करण्याची शक्ती प्राप्त होते. त्यामुळे संकटांना सामना देण्याचे मनोबल वाढते.
जो जैसा भजे मला। मी तैसा पावे त्याला॥
प्रभू मुणगेकर उभय भगिनींना पुढील वाटचालींसाठी शुभेच्छा।

स्वातंत्र्यवीर सावरकर एक झंझावात हा श्रीमती निलिमा प्रभू याचा लेख, फार आवडला धन्यवाद ! जन्य जनकभावे शालांत परीक्षा (१९६९) मध्ये असलेला माझी जन्मठेप मधील एक धडा आठवला. तसेच आमच्या ज्ये.ना.सं. बोरिवली (पूर्व) येथे सौ. साधना जोशी यांचे भाई सावरकर यांच्यावर झालेले व्याख्यान आठवले. त्यावर स्फुरलेल्या दोन कविता मी खाली देत आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर अंदमान कारागृही असता/घटना घडळी प्रस्तुत जन हो. लक्ष देऊनी ऐका

तुंदील तनु जेलर वदले स्वातंत्र्यवीरासी ''तव समोरील कैदी अल्पावधीत तेल काढतो घाण्यातुनी लाज न ये का तुजसी देखूनी त्यासी''

वाकबाणे या स्वातंत्र्यवीर ते मुळी ना डगमगले।
त्रिकालाबाधित सत्य तयांती त्वरीत मांडीयले।
''लाजेचे ना कारण मजसी। लाज वाटावी ब्रिटिश सरकारासी॥ पात्रापात्रतेचा विचार न करता समान काम साऱ्यांना देता मनुष्यबळ अन-काळाचा अपव्यय करता रचेन मी जे सुनीत अवघ्या मिनिटातचि पाच समोरचा कैदी रचू न शके उभ्या आयुष्याते! निरूत्तर जेलर खजील होऊनी गेले निघुनी। बाणेदार उत्तर सावरकरी घुमतसे अजून हो कर्णी॥ मार्च (१९९५)

जव्हारच्या दिवाणांची ज्येष्ठ कन्या माई चिपळूणकर। चतुर्दश वर्षी चतुर्भूज होवूनी बनली माई सावरकर॥ पदव्युत्तर विधीचे अध्ययन कराया पती निघाले विलायतेला। ओढशील पैका खोऱ्याने दावी स्वप्न पिता अपुल्या दुहितेला॥ ध्येयासक्त पतीची ती होती सहधर्मचारिणी। प्रभाकर पुत्रासह क्रांतिकारकांची बनली ती माऊली॥ वेषात कैद्याच्या पतीला परतताना पाहुनी। प्रेयमार्गा त्यजूनी श्रेया ती सहजी घेई वाहुनी॥ आरोपाखाली देशद्रोहाच्या जन्मठेप अर्धशत वर्षे सजा फर्मावली न्यायालयाने। आरोप ऐकूनी वीरांगनेने तया न होता विचलीत धैर्य एकवटले जोमाने॥ अंदमानी निघाले स्वातंत्र्यवीर निरोप घेऊनी कुटूंबियांचा। दास्यमुक्त कराया भारतमातेला केला त्याग वैयक्तिक जीवनाचा॥ प्रभाकराचे निधन आदि वार्ता ऐकूनी दु:खद पुत्र जीव तयांचा कळवळला। अमर विरहगीत प्रकटले तयातूनी (सागरा प्राण तळमळला अस्पश्योद्धारण कराया साथ दिली पतीला यास्तव दिधले अहव लेणे दैवाने सतीला (मार्च २०१९)

कै. वसंतराव देसाई-स्वरभूषण यांचे संगीतक्षेत्रातील योगदान सागणारा सौ. गीता परुळेकर यांचा लेख वाचून मला साटम महाराजांचे चरित्र आठवले. (चू.भू.द्या. घ्या.) कै. वसंत देसाई यांच्या निधनाच्या आदल्या दिनी साटम महाराज त्यांच्या घरी येऊन मालवणीत त्यांनी त्यांना आपल्या बरोबर गाणगापूरला येतोस का असे विचारले होते. परंतु कार्यक्रम नियोजित असल्याने वसंतराव देसाई त्यांच्याबरोबर गेले नाहीत. नेमके त्याचा दिवशी त्यांचे उद्वाहनात दु:खद निधन झाले. विधिलिखीत अटळ असते. त्यांच्या सांत्वनपत्रिकेतील वाचलेल्या खालील ओळी आठवून अजुनही जीव हळहळतो.
ज्याचा पाळणा संगीत। त्याचा पाळण्यात अंत॥
करी शारदा आकांत। माझा वसंत वसंत॥
कवी केदार परूळेकर याची शहीद कविता आवडली.
धन्यवाद !
ता. क. मनीष दाभोलकर यांचे 'राहूल' लेखाबद्दल अभिनंदन! पुढील वाटचालीसाठी वाचकांतर्फे शुभेच्छा!

**सौ. स्मिता दत्तात्रय पाटील**बोरिवली (पूर्व)

गौड ब्राह्मणचा मार्च २०१९ अखेरचा अंक मिळाला धन्यवाद. अंक नेहमीप्रमाणेच सुंदर आहे. प्रश्न नाही. विशेषत: सौ.गीता परुळेकर यानी त्यांच्या नेहमीच्याच शैलींत स्वरभूषण पद्मश्री कै. वसंत देसाई यांचेवर माहिती पूर्ण लिहिलेला लेख फारच आवडला ज्ञातीमध्ये होऊन गेलेल्या व ज्ञातीच्या इतिहासात सुवर्णअक्षरांनी आपले नांव कायमचे कोरून

ठेवलेल्या अशा महान विभूतींची अत्यभूत पण थोडक्यात महिति देत असल्याबद्दल सौ. गीता ताई खरोखरच अभिनंदनास पात्र आहेत ही माहिति देताना त्यानी किती वाचले असेल वा माहिति कोणत्या मार्गाने गोळा केली असेल व त्यासाठी किती कष्ट घेतले असतील याचा विचार करता ताईच्या समोर खरोखरच नतमस्तक होण्याशिवाय पर्याय नाही. ताईनी असेच पुढे लिहित रहावे व ज्ञातीतील होऊन गेलेली अशी अनमोल रत्ने आजच्या समाजासमोर आदर्श म्हणून उभी करावीत हीच इच्छा शिवाय ताई लिहीत असलेल्या या अनमोल ठेव्याला भविष्यांत एकाहून एक ज्ञातीपुराषांचा गौरव ग्रंथ निर्माण व्हावा जो प्रत्येक ज्ञाती बांधवासमोर गीता म्हणून उभा राहिल ही इच्छा.

तसेच श्री. मनीष दाभोलकर यांच्या SUCCESS STORIES या सदरांत श्री. राहूलचा समावेश श्री. मनीष दाभोलकर यांचे सदर नेहमींच वाचण्यासारखे असते आणि आता त्यानी श्री. राहुलचा समावेश केला. राहुलचे शिक्षण कसे झाले. त्यासाठी कोणी किती खस्ता खाल्या याची मला थोडीफार कल्पना असल्याने मला हे विशेष वाचनीय वाटले व ते खरोखरच तसें आहे याबद्दल प्रत्यवाय नाही. श्री. दोभोलकर यानी हे सदर असेच चालू ठेवावे ही इच्छा.

KPL - 2019 चा सोहळा कसा संपन्न झाला याची अगदी आखो देखा हकीकत वीणा दाभोलकर यांच्या आढाव्यांत उतरली असून २०२० साली डोंबिवलीकराना ती नक्कीच स्फूर्तिदायक आहे व त्यांच्यात आतांच उत्साह संचरला असेल.

विद्यावृद्धि समाजाचा शतकोत्तर रौप्य महोत्सवी सांगता समारंभाचा वृत्तांत वाचूनही आनंद वाटला, खरे म्हणजे या समारंभास उपस्थित रहाण्याची माझी फार इच्छा होती पण ते शक्य झाले नाही. असो.

श्री. महादेव (प्रबोध) सामंत यांच्या दु:खद निधनाची बातमी वाचतांच मनाला चटका बसला ही गोष्ट अगोदर समजली नव्हती. पण त्यांचे कार्य काहीसे माहित होते आणि नि:स्पृही कार्यकर्ते असे अकस्मात निघून गेल्याने मनाला मात्र चटका लागतो.

वीणा दाभोलकर यांच्या लेखणीतून उतरलेले सुधताईचे शब्दचित्र मनाला चटका लावणारे ठरले. कै. सुधाताईला मी चांगलीच ओळखत असल्याने तिच्या स्वभावाचे हुबेहूब वर्णन वीणा दाभोलकर यांच्या लेखणीतून उतरले आहे.

एकंदरींत अंक फारच सुंदर झाला आहे यात शंकाच नाही. दिवसेंदिवस असेच सुंदर अंक आमच्या हाती पडावेत याच शुभेच्छा?

कळावे.

आ. नम्र

**शि. वा. तेंडोलकर**



स्थापना : १८९७ दूरध्वनी : २३८५ ००१५

# गौड ब्राह्मण सभा

## सभेची सेवा दालने

ज्ञातीतील दानशूर व्यक्तींनी संस्थेला दिलेल्या भरघोस देणग्यांमधून, त्यांनी व्यक्त केलेल्या इच्छेनुसार गौड ब्राह्मण सभेने विविध कायमनिधी फंड गठीत केले असून या कायमनिधी फंडांच्या व्याजातून ज्ञातीतील निराधार, निराश्रित, गरीब, गरजू स्त्री/पुरुष, यांना आर्थिक मदत, विद्यार्थी/विद्यार्थिनींना शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती तसेच ज्ञातीतील कर्करोग, हृदयविकार, किडणीविकार, मतिमंद आदि व्याधीग्रस्त रुग्णांना औषधोपचार/शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत दिली जाते.

संस्थेच्या विविध कायमनिधी फंडांचा तपशील खालीलप्रमाणे आहे-

- **स्व. श्रीमती लक्ष्मीबाई बाळकृष्ण पाटील स्म. कु.दे.गौ.ब्रा. विद्यार्थिनी विद्यावृद्धी कोष:** ज्ञातीतील होतकरू, गरजू गरीब मुलींच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती.
- **स्व. श्रीमती लक्ष्मीबाई बाळकृष्ण पाटील स्म.कु.दे.गौ.ब्रा.निराश्रित महिला साहाय्यकारी कोष:** ज्ञातीतील निराधार, गरीब, निराश्रित महिलांना आर्थिक साहाय्य.
- **स्व. श्री. लक्ष्मण अनंत पाटील पाटकर स्म.कु.दे.गौ.ब्रा.निराश्रित महिला/पुरुष साहाय्यकारी कोष:** ज्ञातीतील निराधार, गरीब, निराश्रित महिला/पुरुषांना आर्थिक साहाय्य.
- **स्व. श्रीमती अन्नपूर्णा लक्ष्मण पाटील पाटकर स्म.कु.दे.गौ.ब्रा.विद्यार्थी/विद्यार्थिनी विद्यावृद्धी कोष:** ज्ञातीतील होतकरू, गरजू, गरीब विद्यार्थी/विद्यार्थिनींना शैक्षणिक शिष्यवृत्ती.
- **स्व. श्रीमती गौरी व स्व. श्री. मंगेश पाटील स्म.कु. दे. गौ.ब्रा. विद्यार्थी विद्यावृद्धी कोष:** शहराव्यतिरिक्त फक्त ग्रामीण भागातील ज्ञातीतील होतकरू, गरजू , गरीब विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शिष्यवृत्ती.
- **स्व. श्रीमती लीला व स्व. श्री. दामोदर सामंत स्म. कु. दे. गौ.ब्रा. विद्यार्थी विद्यावृद्धी कोष:** शहराव्यतिरिक्त फक्त ग्रामीण भागातील ज्ञातीतील होतकरू, गरजू, गरीब विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शिष्यवृत्ती.
- **स्व. श्रीमती लक्ष्मीबाई बाळकृष्ण पाटील स्म.कु.दे.गौ.ब्रा.मतिमंद साहाय्य कोष:** ज्ञातीतील मतिमंदांना विशेषत: मतिमंद मुलीं व स्त्रियांना औषधोपचारांसाठी आर्थिक साहाय्य.
- **स्व. श्रीमती लक्ष्मीबाई बाळकृष्ण पाटील स्म. कु.दे.गौ.ब्रा.रुग्णसेवा कोष:** ज्ञातीतील रुग्णांना विशेषत: स्त्री रुग्णांना औषधोपचारांसाठी आर्थिक साहाय्य.
- **स्व. श्री. एकनाथ केशव ठाकूर स्म.कर्करोग वैद्यकीय उपचार फंड:** ज्ञातीतील निराश्रित, निराधार, गरीब कर्करोगग्रस्त रुग्णांना वैद्यकीय उपचारांसाठी आर्थिक साहाय्य.
- **वैद्यकीय फंड :** ज्ञातीतील निराधार, निराश्रित, गरजू, गरीब व्यक्तींना वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक साहाय्य.
- **वृद्धाश्रम फंड :** ज्ञातीतील निराधार, निराश्रित, गरीब, गरजू आजारी वयोवृद्धांना (७० वर्षांवरील) वर्षातून एकदा आर्थिक साहाय्य. मात्र यासाठी अशा व्यक्तींनी संस्थेकडे लेखी अर्ज (वय/उत्पन्न/आजार/आजारावर होणारा खर्च आदि माहितीसह) करावेत. अर्जदारांनी आपला दूरध्वनी/मोबाईल क्र. लिहिणे आवश्यक आहे.
- **कन्यादान फंड :** ज्ञातीतील गरीब, गरजू मुलींच्या विवाहाप्रीत्यर्थ आर्थिक साहाय्य. लग्नपत्रिका अर्जासोबत जोडवी.

ज्ञातीतील निराधार, निराश्रित, गरीब, गरजू व्यक्तींनी आर्थिक मदतीसाठी रितसर लेखी अर्ज करावयाचे आहेत. संस्थेचे छापील अर्ज संस्थेच्या गिरगाव येथील कार्यालयात उपलब्ध आहेत. मुंबईसह अन्य बाहेरगावच्या तसेच ग्रामीण भागातील ज्ञातीबांधवांनी अर्जाची मागणी केल्यास टपालाद्वारे अर्ज पाठविला जाईल. मात्र त्यासाठी आपल्या लेखी अर्जात कुठल्या फंडातून मदत हवी आहे याचा जरूर उल्लेख करावा. अर्धवट तपशील असलेल्या कोणत्याही अर्जावर संस्थेकडून विचार केला जाणार नाही.

स्थापना : १८९७ दूरध्वनी : २३८५००१५

॥ उत्तिष्ठ यशो लभस्व ॥

# गौड ब्राह्मण सभा

## सभेची अन्य सेवा दालने

- **शैक्षणिक पारितोषिक फंड :** आपल्या ज्ञातीतील दानशूर व्यक्तींच्या स्मृतिप्रीत्यर्थ संस्थेच्या विविध पारितोषिक फंडांच्या व्याजातून दरवर्षी माध्यमिक शालान्त (एस.एस.सी.) प्रमाणपत्र परीक्षा, उच्च माध्यमिक शालान्त (एच.एस.सी.) प्रमाणपत्र परीक्षा तसेच अन्य परीक्षांमध्ये विशेष गुणवत्ता संपादन केलेल्या ज्ञातीतील हुशार व होतकरू मुलां/मुलींना संस्थेतर्फे पारितोषिके व प्रशास्तीपत्रे देऊन विशेष कार्यक्रमात गौरविण्यात येते. तसेच ''गौड ब्राह्मण'' ह्या त्रैमासिकांतून गुणवत्ता प्राप्त मुलांची माहिती फोटोंसह प्रसिद्ध केली जाते.
- **गौड ब्राह्मण त्रैमासिक प्रकाशन फंड :** ''गौड ब्राह्मण'' त्रैमासिक हे आपल्या ज्ञातीचे मुखपत्र आहे. या त्रैमासिकाला ८० वर्षे पूर्ण झाली आहेत हे नमूद करायला आम्हाला विशेष आनंद होतो आहे. सदर त्रैमासिकाच्या माध्यमातून ज्ञातीमध्ये होणाऱ्या बदलांचा, तरुण पिढीच्या नव्या विचार प्रणालीचा तसेच इतर घडामोडींचा परामर्ष घेतला जातो शिवाय ज्ञातीबांधवांना संघटित करून समाज प्रबोधनाचे कार्य केले जाते. गौड ब्राह्मण सभेतर्फे प्रकाशित केले जाणारे हे त्रैमासिक संस्थेचे परंपरेने चालत आलेले वैभव आहे.
संस्थेचे हे त्रैमासिक संस्थेच्या आजीव सभासदांना टपालाद्वारे विनामूल्य घरपोच पाठविले जाते. त्यासाठी संस्थेचे आजीव सभासदत्व स्वीकारण्यासाठी ज्ञातीबांधवांना आम्ही विशेष आवाहन करीत आहोत.
- **सामुदायिक मौजीबंधनसोहळा फंड :** संस्थेतर्फे नाममात्र नोंदणी शुल्क आकारून सामुदायिक मौजीबंधन सोहळा आयोजित केला जातो. संपूर्ण तपशीलासाठी कृपया सायं. ३.०० ते ६.०० या वेळेत कार्यालयात संपर्क साधावा.
- **स्व. श्रीमती लक्ष्मीबाई दिनकर खानोलकर/स्व. श्री. दिनकर खानोलकर सभागृह कोष :** स्व. श्रीमती लक्ष्मीबाई दिनकर खानोलकर/स्व. श्री. दिनकर खानोलकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ संथेने नव्याने कायम निधी फंड गठीत केला असून भविष्यात भव्य सभागृह उभारण्यात येणार आहे. यासाठी जागा, जमीनजुमला, निवासी घर किंवा रु.१,००,०००/- किंवा त्याहून अधिक देणगी देणाऱ्या ज्ञातीतील दानशूरांची नावे कायम स्वरूपात त्रैमासिकात छापण्यात येतील. तसेच रु.५,००,००० व त्याहून अधिक रक्कम देणाऱ्या देणगीदारांची नावे व फोटो सभागृहात लावण्यात येतील. तसेच सदर देणगीदारांच्या नावांना त्रैमासिकात प्रसिद्धी देण्यात येईल. ज्ञातीतील दानशूरांनी सढळ हस्ते देणग्या देऊन ह्या प्रकल्पाला हातभार लावावा ही विनंती.
- **वधू-वर पालक मेळावा :** ज्ञातीतील वधू-वरांसाठी संस्थेतर्फे 'वधू-वर पालक मेळावा' आयोजित करून मान्यवरांच्या उपस्थितीत मार्गदर्शन केले जाते. ज्ञातीतील वधू -वरांची माहिती सभेच्या ''गौड ब्राह्मण'' त्रैमासिकात प्रकाशित केली जाते. वधू-वर नोंदणीसाठी वार्षिक शुल्क रु.२५०/- आकारले जाते. वधू-वर नोंदणी अर्ज संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. आपल्या विनंतीनुसार नोंदणी अर्ज टपालाद्वारेदेखील पाठविले जातात. संस्थेच्या आजीव सभासदत्वाची वर्गणी रु.१०००/- भरल्यास आजीवन संस्थेचे त्रैमासिक आपल्या पत्त्यावर विनामूल्य घरपोच पाठविले जाते. त्यासाठी आपण संस्थेचे आजीव सभासद होणे गरजेचे आहे. आजीव सभासदत्वाचे अर्ज कार्यालयात उपलब्ध आहेत. वधू-वरांनी आपली नावे संपूर्ण तपशीलांसह संस्थेच्या कार्यालयात नोंदवावीत.
- **गौडब्राह्मण सभा वार्षिक स्नेह-संमेलन व पारितोषिक वितरण सोहळा :** संस्थेच्या वार्षिक स्नेह-संमेलनाचे औचित्य साधून सामाजिक, शैक्षणिक, आध्यात्मिक, औद्योगिक, क्रीडा आदि क्षेत्रांत कार्य करणाऱ्या ज्ञातीतील कर्तबगार, निपुण अशा मान्यवर व्यक्तींचा संस्थेतर्फे सत्कार, सन्मान केला जातो.
- **रुग्णसेवा** ज्ञातीतील तसेच अन्य समाजातील रुग्ण व्यक्तींना वैद्यकीय उपचारासाठी परत करण्याच्या बोलीवर संस्थेतर्फे विनामूल्य वैद्यकीय उपकरणे पुरविली जातात. गरजूंनी यांचा अवश्य लाभ घ्यावा.

**वरील सर्व उद्दिष्टांना हातभार लावण्यासाठी ज्ञातीतील दानशूरांनी सढळ हस्ते आर्थिक साहाय्य करावे. कृपया चेक/डीडी ''गौड ब्राह्मण सभा'' या नावे पाठवावा. संस्थेचे सारस्वत को-ऑप. बँक A/c No. 02200100027556 IFSC Code SRCB 0000002, गिरगाव. अधिक माहितीसाठी श्री. उमाकांत गणपत महाजन-कार्याध्यक्ष-(९६८९७८१७५०) श्री. मनीष गुरुदास दाभोलकर खजिनदार (९८२१२५८०४७) यांच्याशी संपर्क साधावा.**

आपल्या ज्ञातीतील दानशूर व्यक्तींच्या स्मृतिप्रीत्यर्थ संस्थेच्या विविध पारितोषिक फंडांच्या व्याजातून दरवर्षी माध्यमिक शालान्त (एस.एस.सी.) प्रमाणपत्र परीक्षा, उच्च माध्यमिक शालान्त (एच.एस.सी.) प्रमाणपत्र परीक्षा तसेच अन्य परीक्षांमध्ये विशेष गुणवत्ता संपादन केलेल्या ज्ञातीतील हुशार व होतकरू मुलां/मुलींना संस्थेतर्फे पारितोषिके व प्रशास्तीपत्रे देऊन गौरविण्यात येते.

ज्ञातीच्या ''गौड ब्राह्मण'' ह्या मुखपत्रातून शालान्त व उच्च माध्यमिक तसेच अन्य परीक्षेत गुणवत्ता प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नावांना ''गौड ब्राह्मण'' विशेष प्रसिद्धी दिली जाते. तरी सर्व यशवंत विद्यार्थ्यांनी सोबत जोडलेला अर्ज हा गुणपत्रिकेच्या सत्यप्रतीसह आपल्या फोटोसह संस्थेकडे भरून पाठवावा ही विनंती.

# गौड ब्राह्मण सभा

## शैक्षणिक पारितोषिक वितरण-तपशील

१) स्व. विनायक लक्ष्मण देसाई पारितोषिक
(मराठी विषयात सर्वप्रथम क्रमांक)

२) स्व. द्रौपदी विनायक देसाई पारितोषिक
(संस्कृत विषयात सर्वप्रथम)

३) स्व. आत्माराम रामचंद्र देसाई पारितोषिक
(गोरेगांव विभागातून प्रथम)

४) प्रा. स्व. विष्णू अनंत देसाई पारितोषिक
(१२वीत विज्ञान शाखेत प्रथम)

५) स्व. पार्वतीबाई शंकर देसाई पारितोषिक
अ) १०वीत सिंधुदुर्ग जिल्ह्यातून प्रथम
ब) १२वीत सिंधुदुर्ग जिल्ह्यातून प्रथम

६) स्व. राजाराम रघुनाथ सामंत पारितोषिक
अ) १२वीत गणित विषयात प्रथम
ब) १२वीत भौतिकशास्त्र विषयात प्रथम
क) १२वीत रसायन शास्त्र विषयात प्रथम
ड) १२वीत जीवशास्त्र विषयात प्रथम

७) स्व. सुशिलाबाई शंकर प्रभू केळुसकर पारितोषिक
(१०वीत गणित विषयात प्रथम)

८) स्व. मिलिंद वामन सामंत पारितोषिक
(१०वीत मराठी विषयात प्रथम)

९) स्व. आत्माराम सावळाराम खानोलकर पारितोषिक

१०) स्व. गजानन गोविंद गवाणकर पारितोषिक
(१२वीत ठाणे जिल्ह्यातून प्रथम)

११) स्व. रघुनाथ राजाराम सामंत
स्व. सुनंदा रघुनाथ सामंत पारितोषिक
(बी.ई. मेकॅनिकल इंजिनीअरींग मध्ये प्रथम.)

१२) स्व. पीतांबर दिगंबर देसाई पारितोषिक
(१० वीत गणित व सायन्स विषयात प्रथम.)

१३) स्व. अवंतिका भास्कर खानोलकर पारितोषिक
(१०वीत मुंबई विभागातून प्रथम.)

१४) स्व. गुलाब रजनीनाथ देसाई पारितोषिक
(१० वीत सिंधुदुर्ग जिल्ह्यातून गणित विषयात प्रथम)

१५) स्व. गजानन शंकर प्रभू केळुसकर पारितोषिक
अ)MBBS व ब) MS या मध्ये प्रथम क्रमांक

१६) स्व. भिकाजी शांताराम आजगांवकर पारितोषिक
(१०वीत गणित विषयात प्रथम)

❑ ❑ ❑

चिटणीस, दिनांक : ________________

गौड ब्राह्मण सभा

३०, कुडाळदेशकर ब्राह्मण निवास,

जगन्नाथ शंकरशेट मार्ग, गिरगांव, मुंबई - ४०० ००४.

मी कुडाळदेशकर गौड ब्राह्मण ज्ञातीचा विद्यार्थी असून आपल्या संस्थेतर्फे प्रकाशित होणाऱ्या ''गौड ब्राह्मण'' त्रैमासिकासाठी व पारितोषिकासाठी माझी माहिती पाठवित आहे.

कळावे.

सही:

संपूर्ण नाव: ______________________________

विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव : कुमार/कुमारी ______________________________

कुलदैवत : ______________________ गोत्र : ______________________

राहण्याचा पूर्ण पत्ता : ______________________________

______________________________ पिन ______________

ईमेल: ______________ दूरध्वनी क्र.: ______________ भ्रमणध्वनी क्र.: ______________

कोणती परीक्षा उत्तीर्ण: ______________________________

शिक्षण संस्थेचे नाव: ______________________________

परीक्षा केंद्र: ______________________________

मिळालेले गुण: ___ टक्के: ___ (गुण ___ पैकी___ )

**विशेष सूचना : सोबत गुणपत्रिकेची सत्यप्रतव फोटो पाठवावा**

शालेय/महाविद्यालयीन जीवनात स्पर्धात्मक परीक्षा/अन्य विशेष प्रावीण्याबद्दल माहिती:

______________________________

______________________________

______________________________

______________________________

पुढील अभ्यासक्रम कोणता व कोणत्या संस्थेत दाखल : ______________________________

______________________________

| विद्यार्थ्याच्या पालकांची माहिती: | वडील | आई |
|---|---|---|
| पूर्ण नाव : | ______________ | ______________ |
| व्यवसाय व हुद्दा : | ______________ | ______________ |
| कार्यालयाचे नाव : | ______________ | ______________ |
| दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्र. : | ______________ | ______________ |
| इतर माहिती : | ______________ | ______________ |

**ओळख पत्र**

सदर विद्यार्थी व त्याचे कुटुंबीय यांना मी ओळखतो. विद्यार्थी कुडाळदेशकर गौड ब्राह्मण ज्ञातीचा आहे.

ज्ञाती गृहस्थाचे नाव/पत्ता: ______________________________

______________________________ दूरध्वनी क्र. : ______________

भ्रमणध्वनी क्र.:

दिनांक : सही ......................

## शिष्यवृत्त्यांसाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी माहिती व सूचना

१) संस्थेकडे शिष्यवृत्तीची मागणी करण्यासाठी विद्यार्थ्याने समाजाच्या छापील अर्जाच्या नमुन्यावरच अर्ज केला पाहिजे (विद्यावृद्धि समाजाच्या वेबसाईटवरही शिष्यवृत्तीचे अर्ज उपलब्ध आहेत.)

**वेब साईट :** www.kdgb-vidhyavriddhisamaj.com

२) एकावेळी शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थ्यांनेही पुढील शैक्षणिक वर्षाकरिता गरज असल्यास योग्य मुदतीत नव्याने अर्ज करणे आवश्यक आहे.

३) शिष्यवृत्ती मंजुरीसाठी विद्यार्थी शैक्षणिक दृष्ट्या लायक (पात्र) आहे असे मानण्यासाठी त्याने गतसालच्या वार्षिक परीक्षेत पुढील प्रमाणे किमान गुणवत्ता प्राप्त केलेली असणे आवश्यक राहील.

इयत्ता ५ वी ते १० वी - सर्व विषयांत उत्तीर्ण

इयत्ता ११ वी व १२ वी - ४५% गुण व सर्व विषयांत उत्तीर्ण

इतर अभ्यासक्रम - सर्व विषयांत उत्तीर्ण

**सद्या ज्ञातीचे विद्यार्थी नवनवीन अभ्यासक्रमांत प्रवेश घेत आहेत. अशा विद्यार्थ्यांनीही संस्थेकडे शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावेत.**

(विद्यार्थ्यांची विशिष्ट आर्थिक परिस्थिती व इतर अडचणी लक्षात घेऊन किमान गुणवत्तेसंबंधी वरील नियमांस अपवाद करून शिष्यवृत्त्या मंजूर करण्याचा अधिकार व्यवस्थापक मंडळास राहील तसेच एकूण उपलब्ध रक्कम अपुरी आहे असे वाटल्यास लायक परंतु तुलनेने कमी गरजू अशा विद्यार्थ्यांचे अर्ज नामंजूर करण्याचा अधिकार व्यवस्थापक मंडळास राहील.)

४) प्रत्येक अर्जावर स्वतंत्रपणे विचार करून निर्णय घेण्यात येईल. अर्ज स्वीकारण्यासाठी निश्चित केलेल्या अंतिम दिनांकानंतर संस्थेकडे आलेले अर्ज तसेच अव्यवस्थित व अपूर्ण अर्ज नामंजूर होण्यास पात्र राहतील.

५) शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर अर्जातील माहिती खोटी अथवा चुकीची असल्याचे आढळून आल्यास, विद्यार्थ्याची वर्तणूक अथवा अभ्यासातील प्रगती समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास अगर अन्य कोणतेही योग्य कारण दिसून आल्यास विद्यार्थ्यांची उर्वरीत शिष्यवृत्ती रद्द करण्याचा अधिकार व्यवस्थापक मंडळास आहे.

६) आवश्यक त्या दाखल्यासह पूर्ण भरलेला अर्ज संस्थेकडे पोहचता होण्यासाठी निश्चित केलेले अंतिम दिनांक पुढील प्रमाणे आहेत.

इयत्ता पाचवी ते दहावी - दिनांक ३० सप्टेंबर २०१९

इतर सर्व नियमित अभ्यासक्रम-दिनांक ३० सप्टेंबर २०१९

(परदेशीचे शिक्षणक्रम व अल्पकालीन शिक्षणक्रम यासाठी प्रवेश निश्चित होताच त्वरीत अर्ज करावेत.)

७) शेवटच्या वार्षिक परीक्षेत मिळविलेल्या गुणांचा विषयवार अधिकृत दाखला अर्जासोबत जोडणे अत्यावश्यक आहे.

८) कुडाळदेशकर गौड ब्राह्मण ज्ञातीच्या दोन मान्यवर व्यक्तींच्या अर्जाच्या नमुन्यातील शिफारसवजा सह्या विद्यार्थ्याने मिळविणे आवश्यक आहे. त्याचे अभावी अर्ज अपुरा मानण्यात येईल व नामंजूर होण्यास पात्र राहील.

९) शिष्यवृत्ती वितरणाच्या सोईच्या दृष्टिने विद्यार्थ्याचे नावे बँकेत खाते उघडावे व बँकेचे नांव, शाखा, खाते क्रमांक, आय एफ एस सी ही माहिती अर्जात नमूद करावी.

१०) विद्यार्थी गरजू आहे हे समजण्यासाठी पालकांनी उत्पन्नाच्या दाखल्यासह अन्य पुरेशी माहिती देणे आवश्यक आहे.

चिटणीस

# कुडाळदेशस्थ गौड ब्राह्मण विद्यावृद्धि समाज

विद्यावृद्धि समाजातर्फे सालाबाद प्रमाणे ह्या वर्षीही ज्ञातीतील विद्यार्थ्यांचा कौतुक समारंभ आयोजीत केला आहे. त्यासाठी खालील प्रमाणे गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपली माहिती समाजाकडे पाठवावी ही विनंती.

| परीक्षा | महानगरपालिका क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे एकत्रित किमान गुण | अन्य क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे एकत्रित किमान गुण |
|---|---|---|
| १) शालांत परीक्षा (एस.एस.सी) | (५२८/६००) ८८% | (४९८/६००)८३% |
| २) उच्च माध्यमिक (एच.एच.सी.) (शास्त्र) | ८०% | ७५% |
| ३) उच्च माध्यमिक (एच.एच.सी.) (कला व वाणिज्य) | ७५% | ७० % |

**पारितोषिकासाठी एस.एस.सी. चे ६०० पैकीगुण विचारात घेण्यात येतील मात्र क्रिडा विषयाचे गुण विचारात घेतले जाणार नाहीत ह्याची सर्व पालकांनी नोंद घ्यावी.**

**ह्या व्यतिरिक्तपुढील परीक्षांत ज्ञाती विद्यार्थ्यांत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्यांना पारितोषिके देण्यात येतील**

**१) शालांत परीक्षा (एस.एस.सी.) :** प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक; मुंबई, पुणे बोर्ड वगळता प्रथम, द्वितीय क्रमांक, कोकण विभाग, ठाणे/पालघर/रत्नागिरी सिंधुदुर्ग जिल्हा, वसई/कुडाळ तालुका, मालवण केंद्र, परूळे गांव, डोंबिवली, सावंतवाडी. अंधेरी, मुंबई विभाग; मराठी (उच्च), हिंदी, संस्कृत (संपूर्ण), इंग्रजी, गणित, विज्ञान, समाजशास्त्र, टेक्निकल; सि.बि.एस.ई., आय.सी.एस.ई.

**२) उच्चमाध्यमिक (एच.एच.सी.):** शास्त्र, कला व वाणिज्य, प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक; कोकण विभाग, सिंधुदुर्ग व ठाणे जिल्हा, कंम्प्युटर सायन्स, गणित, फिजिक्स, रसायनशास्त्र, विज्ञान, मराठी इंग्रजी, अर्थशास्त्र.

३) बी.ए., बीकॉम., बी.एससी. (कृषी), बी. एससी (आय.टी.), बी.ई. एम.बी.बी.एस. बी.ए.एम.एस.,बी.एड. ४) बी.ए. मराठी विषयात प्रथम क्रमांक ५) शिष्यवृत्ती : पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृक्षी (ई.५वी) पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (ई.८वी) ६) राष्ट्रीय प्रज्ञा शोध (समाज पारि.), ७) डी.एड. ८) इंजिनिअरींग डिप्लोमा, ९) सी.ए. १०) आय.आय. टी. इंजिनिअरींग डिग्री, ११) बी.एससी. (नर्सिंग) १३) पदव्युत्तर शिक्षण १४) एम. डी./एम.एस., १५) एलएल.बी., एलएल.एम. १६) डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा.

**सूचना :** निर्देशित केलेल्या वेळेत विद्यावृद्धि समाजाकडे उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे ह्या पारितोषिकांचे मानकरी निश्चित केले जात असल्याने विद्यार्थ्यांनी समाजाच्या कार्यालयात उपलब्ध असलेले विहित नमुन्यातील अर्ज पूर्ण भरून गुणपत्रिकेच्या प्रतीसह दिनांक ३१ ऑगस्ट २०१९ पूर्वी विद्यावृद्धि समाजाच्या कार्यालयात पोहोंचतील अशा रितीने पाठविणे आवश्यक आहे. नमुना अर्ज: वेब-साईट www.kdgb-vidhyavriddhisamaj.com वर उपलब्ध आहे.

**पत्ता:** ३०, कुडाळदेशकर ब्राह्मण निवास, मॅजेस्टीक शॉपिंग सेंटर समोर, १४५/ब, जगन्नाथ शंकर शेट मार्ग, गिरगांव, मुंबई-४०० ००४. दूरध्वनी : ०२२-२३८२१६७५
email: kdgb.viddhyavridhi@gmail.com
कामाची वेळ : सकाळी १०.०० ते १२.०० व संध्याकाळी ४.०० ते ७.००

**कौतुक सोहळा व पारितोषिक वितरण समारंभ**

कुडाळदेशस्थ गौड ब्राह्मण विद्यावृद्धि समाजाच्या विद्यमाने प्रति वर्षाप्रमाणे विविध परीक्षांमध्ये विशेष गुणवत्ता संपादन केलेल्या ज्ञातीतील विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा व पारितोषिक वितरण समारंभ **बुधवार दिनांक २ ऑक्टोबर २०१९ रोजी दु पारी४.३० वाजता,** आयोजीत करण्यात आला आहे. समस्त ज्ञातीबंधु-भगिनींनी ह्या सोहळ्यास उपस्थित राहुन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे ही विनंती.

ज्ञाती वृत्तांत

# रुद्रवीणा-मिरा सामंत

हे पुस्तक हातात आलं. सवयीने आधाशासारखे लगेचच वाचायला घेतले.

पुस्तकाच्या आकारावरून त्याची किंमत काय असेल? असा अंदाज बांधतांनाच त्या संदर्भात पुस्तक उघडले तर लिहिले होते की पुस्तकाचे मुल्य पान क्रमांक ८४ वर पहावे. आता हे काय नवीन! म्हणून पान क्रमांक ८४ उघडले. आणि... त्या संदर्भात पुस्तकात वाचणे योग्य आहे. फक्त एवढी प्रतिक्रिया मनात उमटली की हे पुस्तक बाजारत उपलब्ध असलेल्या इतर पुस्तका सारखे नाही. अर्पण पत्रिका, R ऋणनिर्देश, मनोगत हे पुस्तकातील सर्व संकेत जरी पाळले असले तर त्यात मांडलेले सार-विचार वेगळेच आणि विचार करायला लावणारे. संगीत व संगीतवाद्ये या विषयावर सर्वसाधारणपणे त्या विषयात अनेक वर्षे साधना केलेले किंवा त्यावर व्यवस्थित शास्त्रोक्त शिक्षण घेतलेले तज्ञ पुस्तक लिहितात. या पुस्तकाचे सर्वात मला जाणवलेले वैशिष्ठ्य म्हणजे या पुस्तकाच्या लेखिका या एक गृहिणी आहेत आणि त्यांनी नम्रपणे लिहिले आहे की त्यांनी या संदर्भात कोणतेही शास्त्रोक्त शिक्षण घेतलेले नाही. तरी पण श्रद्धेने एका विशिष्ठ प्रेरणेने त्यांनी हे पुस्तक लिहिले आहे. कुठेही नक्कल केली नाही असे जाणवते. ते वाचण्यातच खरी गंमत आहे.

लागलेल्या सवयीने पुस्तकातील शब्दांची योजना, विषयाची मांडणी अगदी अनुक्रमणिके पासून पुढे पुढे सर्व याचे मुल्यमापन मनात होत होते आणि आपोआपच दाद दिली जात होती. कुठेही अवांतर लिखाण वाटले नाही. Paraphrasing सुद्धा योग्य, जे मला नेहमीच कठीण वाटते. लिहिण्याच्या भरात कुठेही वाहवत गेले असे नाही. इतर रुद्रवीणा कलाकारांसोबत रुद्रवीणा तयार करणाऱ्या अल्ताफ भाई बद्दल सुद्धा लिहिले आहे हे मला खरच कौतुकास्पद वाटते.

मीराताईंची लिखाणातील अतिशय लीनता वाचून असे सांगावेसे वाटते की पणतीचा आकार महत्त्वाचा का असतो? पणतीत असते ते पावित्र्य आणि शांत तेवणारी वात. त्या वातीतच अंध:कार दूर करण्याची शक्ती असते.

हे पुस्तक जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे असे मला मनापासून वाटते. या पुस्तकाच्या रचनेतच त्याचे रुद्रवीणा संदर्भात कुतूहल जागृत करण्याचे व त्या साठी काही करण्याची सदिच्छा निर्माण करण्याचे सामर्थ्य दडलेले आहे. त्यामुळे त्यात दडलेले मुल्य त्याचे कार्य नक्कीच पूर्ण करतील व श्रद्धेने सफळ संपूर्ण झालेले हे पुस्तक प्रसन्नता पण प्रसवेल.

शेवटी असे म्हणावेसे वाटते की तुमच्या हातात लेखणी दसऱ्याच्या दिवशी शमी वृक्षावर ठेवायला का दिली होती? एक वाचक म्हणून चांगल्या पुस्तकांवर प्रेम करणारा म्हणून प्रार्थना की असेच अजून लिखाण होऊ द्यावे.

**सौ. नेहा कापसे,**
९९६७३५५५४६

### मीरा सामंत यांच्या रूद्रवीणा पुस्तकासाठी वाङ्मयीन पुरस्कार



मराठा मंदिर या अग्रगण्य संस्थेच्या साहित्य शाखेच्या वतीने आयोजित केलेल्या नवोदितांच्या प्रथम प्रकाशनाच्या वाङ्मयीन पुरस्कार २०१८ ह्या स्पर्धेत गोव्यातील सौ. मीरा सामंत यांच्या 'रूद्रवीणा' ह्या पुस्तकास संशोधनात्मक साहित्य प्रकारामध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे. मराठा मंदिर साहित्य शाखेने त्यांचा सन्मानपत्र व मानचिन्ह देऊन सत्कार केला. हे बक्षीस जेष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते देण्यात आले. ह्या प्रसंगी संत साहित्याचे गाढे अभ्यासक, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे माजी अध्यक्ष घुमान येथील मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.सदानंद मोरे यांना श्रीमद् जगद्गुरू शंकराचार्य करवीर पिठ यांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. सदर सोहळा दि. १४ मार्च २०१९ दुपारी ४ ते ७ या वेळात मराठा मंदिर जीवाजीराव महाराज शिंदे सभागृह, मराठा मंदिर, मुंबई सेंट्रल, येथे संपन्न झाला. 'रुद्रवीणा' हे मीरा सामंत यांचे पहिलेच पुस्तक आहे.

# स्टेट बँक कर्मचारी सेनेच्या अध्यक्षपदी सुभाष महाजन यांची निवड




स्टेट बँक कर्मचारी सेनेच्या अध्यक्षपदी सुभाष महाजन यांची निवड करण्यात आली आहे. स्टेट बँक कर्मचारी सेनेचे आठवे त्रैवार्षिक अधिवेशन शिवसेना भवन दादर, येथे नुकतेच पार पडले. या अधिवेशनात महाजन यांची तीन वर्षासाठी ही निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे महाजन यांचे सर्वच स्थरातून अभिनंदन होत आहे. डोंबिवलीचे रहिवासी असलेले ज्येष्ठ समाजसेवक सुभाष महाजन हे विविध संस्था आणि संघटनेवर तसेच शासकीय कमिटीवर कार्यरत आहेत. शिवसेनेच्या संघटनेत तब्बल ३५ वर्षापासून ते एकनिष्ठ आहेत. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हे शिवसेना प्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितलेला वसा ते जपत आहेत. स्टेट बँक कर्मचारी सेनेच्या अध्यक्षपदाची धुरा महाजन यांच्यावर सोपविण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वीच त्यांना राज्य शासनाच्या पर्यटन सांस्कृतिक कला महोत्सव समिती यांच्यावतीने राष्ट्रीय उत्कृष्ट समाजसेवक गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलंय. तसेच भारत सरकारच्या भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेची आजीव मेंबरशिप त्यांना प्रदान करण्यात आलीय. तसेच मराठी वृत्तपत्रलेखक संघ यांच्या वतीने देण्यात येणार यंदाचा 'पत्रभूषण २०१८' या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आलंय. महाजन हे अनेक वर्षा पासून पत्रकारिता क्षेत्रातही कार्यरत असून, विविध वृत्तपत्रात लिखाण करीत आहेत. त्यामुळे त्यांना पत्रभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. सुभाष महाजन हे सामाजिक, सांस्कृतिक आणि पत्रकारिता अशा विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. स्टेट बँक कर्मचारी सेनेच्या अध्यक्षपदाची नवी जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आल्याने सर्वच क्षेत्रातून महाजन यांचे अभिनंदन होत आहे.


## हार्दिक शुभेच्छा !

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

## व्ही. डी. प्रभुकेळूसकर

**सदस्य अभिकर्ताओंके लिये अध्यक्ष क्लब**
**कोड नं. : १०८९१८**

**V. D. Prabhukeluskar**
Member of the Chairman's Club for Agents
Code No. 108918

**LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA**

**Off.:** Br. 891, Swapna Siddhi, Akurli Road, Near Railway Station, Kandivali (East), Mumbai-400 101. Tel. : 28870023

**निवास :** भवानी नगर, प्लॉट नं.१, बिल्डींग नं.२, ब्लॉक नं. ४, लोटस को-हौ. सो., मरोळ, मुंबई ४०० ०५९. **टेली : २९२५ ९५५५ मो. : ९८६९०३०९६५**

# उत्कर्ष महिला मंडळ, विरार तर्फे जागतिक महिला दिन साजरा



कुडाळ देशकर आद्य गौड ब्राह्मण उत्कर्ष महिला मंडळ विरार यांनी दि. १०/०३/२०१९ रोजी जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहाने साजरा केला. सर्व शहिद जवानांना श्रद्धांजली वाहून व त्याला साजेसे गीत सादर करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. मंडळाच्या चिटणीस सौ. शैलजा सामंत व खजिनदार सौ. स्नेहा महाजन यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सदर कार्यक्रमास सुमारे ७० महिला हजर होत्या.

वसई विरार महानगर पालिकेच्या नगरसेविका व महिला बालविकास समितीच्या सभापती मा. सौ. माया सुबोध चौधरी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या व सौ. मधुरा प्रभू (निवेदिका- एफ्. एम्. रेनबो- आकाशवाणी) या प्रमुख वक्त्या होत्या. सौ. माया चौधरी यांनी विविध विषयांवर महिलांशी संवाद साधला. व्यक्तीच्या जडण-घडणीमध्ये आईची भूमिका ही किती महत्वाची असते त्यासाठी आपण काय केले पाहिजे, कोणती पथ्ये पाळली पाहिजेत याचे सुंदर विवेचन त्यांनी आपल्या भाषणातून केले. तसेच दिवसेंदिवस वाढत असलेल्या वृद्धांच्या समस्या, मोबाईलने आपल्या कुटुंबावर केलेले अतिक्रमण त्यातून निर्माण होत असलेला विसंवाद संपत असलेली नात्यातील जवळीक याविषयावर त्यांनी महिलांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. सरकारकडून महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनां विषयीही त्यांनी माहिती दिली व सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

सौ. मधुरा प्रभु यांनी भारताच्या जडण-घडणीतील महिलांचा सहभाग व त्याचे योगदान याविषयी माहिती दिली. पराक्रमी राजा महाराणाप्रताप व त्याची कन्या चंपावती यांची कथा सांगताना त्यांनी साक्षात इतिहास उभा केला व आपल्या रसाळ वाणीने सर्वांना मंत्रमुग्ध केले. सौ. दिक्षा महाजन, सौ. प्रणिती सामंत व सौ. संपदा सामंत यांच्या सुरेल गायनाने कार्यक्रमाची सोभा वाढवली व सौ.गवाणकर यांच्या नृत्यमिश्रीत विठ्ठल गजराने सर्व वातावरणात आनंदाचे डोह तयार केले. महिला मंडळाच्या सर्वेसर्वाश्रीमती स्नेहलता मनोहर सामंत यांच्या हस्ते उपस्थित सर्व महिलांना भेटवस्तु देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महिला मंडळाच्या कार्यकर्त्यांनी भरपूर परिश्रम घेतले. सौ. अंजली सामंत यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**सौ. अंजली सामंत**

❑ ❑ ❑

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने शिवाजीराव परुळेकर यांचा सन्मान

मधुकर पाटील



कोल्हापूरातील सामाजिक कार्यकर्ते शिवाजीराव परुळेकर यांनी धरणग्रस्त, भूमीहिन, शहिद विधवा, आत्महत्याग्रस्त शेतकरी, माजी सैनिक, अंगणवाडी कर्मचारी, गुंठेवारीधारक, झोपडपट्टीवासीय अशा वंचित, दलित क्षेत्रात केलेल्या गेल्या ४० वर्षाच्या कामाची नोंद घेवून महाराष्ट्र शासनाने भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण हा बहुमोल पुरस्कार देऊन गौरव केला. नुकत्याच नाशिक येथे पार पडलेल्या शानदार समारंभात महाराष्ट्राचे सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले, राज्यमंत्री नाम. दिलीप रावजी कांबळे यांचे हस्ते व केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री नाम. रामदास आठवले, आमदार देवयानी फरांदे, आम. सीमा हिरे, आम. भाई गिरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत रोख रुपये पंधरा हजार, गौरव चिन्ह, शाल, श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.

श्री. शिवाजीराव परुळेकर यांनी, गुंठेवारी, बेघर, झोपडपट्टी धारक, भूमिहीन, माजी सैनिक, शहीद विधवा, आत्महत्या ग्रस्त शेतकरी, अंगणवाडी कर्मचारी या वंचीतांच्या प्रश्नावर गेल्या ४० वर्षात शेकडो आंदोलने करून त्यांना न्याय मिळवून दिला. त्याच बरोबर शैक्षणिक, सहकार क्षेत्रातही संस्थात्मक भरीव कार्य केले. त्यामुळे या घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावे दिलेल्या समाज भूषण पुरस्काराने शासनाने सन्मान केल्याची भावना समाजातील सर्व स्तरातून व्यक्त करून त्यांचे कौतुक केले जात आहे. या कार्यक्रमास शासनाचे, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे, समाज कल्याण आयुक्त मिलींद शंभरकर हजर होते.

---

## हार्दिक अभिनंदन !



डॉ. घन:शाम त्र्यंबक ठाकूर, रा. गारगोटी, ता. भुदरगड, जिल्हा कोल्हापूर हे गेली १८ वर्षे वकील म्हणून कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व तालूक्यातील न्यायालयाचे काम अतिशय प्रामाणिकपणे करत आहेत.

भारत सरकारने त्यांच्या कामाची दखल घेऊन केंद्रिय कार्यालयासाठी कायदेविषयक सल्लागार व नोटरी म्हणून नुकतीच नियुक्ती केली आहे. भारत सरकारकडून अॅड. ठाकूर यांची केंद्रीय कार्यालयासाठी कायदेविषयक सल्लागार म्हणून संपूर्ण जिल्ह्यासाठी निवड केली आहे. त्यांना सामाजिक कामाची अतिशय आवड आहे. ते गारगोटी बार असोशिएशनच्या उपाध्यक्षपदाचा कार्यभार सांभाळला आहे.

निवड झाल्याबद्दल त्यांचा कोल्हापूर येथील अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ व कोल्हापूर जिल्हा वकील अघाडीमार्फत सत्कार करण्यात आला आहे. ते आपल्या समाजातील सर्वांच्या सुखदुखात सहभागी असतात. तसेच समाजातील लोकांचे न्यायालयीन काम करण्यासाठी आपला अमुल्य वेळ अहोरात्र देतात.

# आमचा इमान

कधी येतला आमचा इमान?
गणपती पासून वाट बगतय
सामान भरान भरान ट्रंक रिकामी करतय
नातृवा सांगतत आजये बस गुमान ॥ कधी...

हयसर बसतलय, चिपीक उतारतलय
परुळ्याच्या बाजारात बांगडे घेतलय
बांगड्याच्या टिखल्यावर सोलकडीचोच मान ॥
कधी...

साट्याचा पाताळ काढून ठेवलय
त्याच्यावर सुरेखसो पोलको शिवलय
चमचमणारा घेतलय पायताण ॥ कधी...

रेल्वेजी गर्दी माका झेपणा नाय आता
चढता-उतारता जीव माजो घाबारता
एसटीनी तर ओकान जीव जाता हैराण ॥ कधी...

देवाक ठाऊक कसली उद्घाटना केल्यानी
एकार एक भाषणा ठोकल्यानी
आमी वाट बगतव डोळ्यात आणून प्राण॥ कधी...

देवा आदिनारायणा इमान लवकर येवदे
माज्या कोकणचो मेवो जगात पोचादे
बागबागायतदारांचा होवदे कल्याण ॥ कधी...

पोराटोरांका कामधंदो मिळांदे
घराघरात सुखशांती रवांदे
पण गावाची मात्र हरवू नको शान ॥ कधी...

**सौ. अंजली श्याम सामंत**
९७६६५४७२३८

# हार्दिक अभिनंदन !



कै. कन्हैयालाल रघुनाथ सामंत यांची नात व दिगंबर प्रभुतेंडोलकर व दर्शना प्रभुतेंडोलकर यांची मुलगी कु.भाग्यश्री प्रभुतेंडोलकर हिला इयत्ता नववीमध्ये 'हिंदुस्तान टाइम्स स्कॉलर्शीप प्राप्त होऊन तिला एक ट्रॉफी व सर्टीफीकेट रु. ५०,०००/- चा चेक प्राप्त झाला. तसेच तिला इ. ५ वी ८ वीत 'महाराष्ट्र स्टेट बोर्ड स्कॉलर्शीप सुद्धा प्राप्त झाली. तसेच तिला इयत्ता दुसरी ते इयत्ता नववी पर्यंत सलग 'बेस्ट स्टुडंट पुरस्कार' प्राप्त झाला. ती दरवर्षी शाळेत प्रथम क्रमांक सुद्धा मिळवते. ह्यावर्षी 'नेलस्टास' परीक्षेत तिने राष्ट्रात द्वितीय क्रमांक मिळवला. इंस्टाग्रामवर ती (Wings-for-thoughts) ह्या अकाऊंट वर तिच्या कविता व Quotes पोस्ट करते. तिला लेखनाची व चित्रकलेची आवड आहे. एलिमेंट्री व इंटरमिज्येट' ह्या चित्रकलेच्या परीक्षेत ती 'A' ग्रेडनी उत्तीर्ण झाली.



कु. भाग्यश्रीस पुढील वाटचाली करीता
"**गौड ब्राह्मण**" तर्फे शुभेच्छा!

❑ ❑ ❑

## हार्दिक अभिनंदन

श्री. संतोष बाळकृष्ण वालावलकर Msc. B.Ed. सहाय्यक शिक्षक, श्रीराम मोरेश्वर गोगटे माध्यमिक विद्यामंदिर जामसंडे, तालुका देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग ह्यांना सन २०१७-१८ चा शैक्षणिक व सामाजिक क्षेतातील उल्लेखनीय कार्याबद्धल महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. शिक्षक दिनाचे औचित्य साधून संपन्न झालेल्या भव्य सोहळ्यात शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री माननीय विनोद तावडे ह्यांच्या शुभहस्ते हा सत्कार प्रदान करण्यात आला. त्यांना मिळालेल्या ह्या पुरस्काराबाबत श्री. संतोष बाळकृष्ण वालावलकर ह्यांचे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचाली करीता खुप-खुप शुभेच्छा श्री. संतोष बाळकृष्ण वालावलकर ह्यांचे प्रकाशित साहित्य-

१) एक दिवस पावसाचा- २२ लेख प्रकाशित पुस्तक.
२) 'प्रतिबिंब' २५ वे राजस्तरीय विज्ञान प्रदर्शन जानेवारी २०००.
३) 'भारतीय शिक्षण- स्कॉलरशिप मार्गदर्शन-जून २००४
४) 'साप्ताहिक सिंधुसंवाद'- मालवण- ''ऋषितुल्य आप्पा'' सामाजीक लेख- ९ मार्च २००५
५) 'महा. एज्यु. जर्नल'- सालसेप कार्यक्रम नोंदवही- डिसेंबर २००६
६) 'महा. एज्यु जर्नल' असा असावा AIDS प्रबोधन कार्यक्रम - जुलै २००६
७) 'शिक्षण संक्रमण'- माझ्या शाळेतील क्रीडांगण मला बोलावते आहे. ऑगस्ट २०१५
८) 'वसुधरा' विज्ञान केंद्र २१ वर्षपूर्ती- 'विज्ञानयंत्र संस्कृती - स्मरणिका २०१६
९) 'तुम्ही आम्ही पालकर' - सिंधुदुर्ग वसुंदरा विज्ञान केंद्र- डिसेंबर २१५
१०) 'शिक्षण संक्रमण'- 'सांग कधी कळणार तुला' पर्यावरण साहित्य मार्च २०१६
११) 'साप्ताहिक अणूरेणू' दिपावली विशेषांकासाठी कविता-कॉपी, अद्वितीय उपहार- क्रीडा विषयक व 'आनंदाने जगूया वर्तमानात' लेख
१२) भाजप वर्धापन दिन विशेषांक २०१६- (देवगड तालुका शिक्षक परिषदेची शैक्षणिक वाटचाल.
१३) 'तुम्ही आम्ही पालक'- 'ऋणानुबंधाच्या गाठी' डीसेंबर १६
१४) 'संकटकाळात आधार नात्यांचाच' जानेवारी २०१८,
१५) 'घडलय (बि) घडलय' एप्रिल २०१८
तसेच दैनिक वर्तमान पत्रात त्यांचे अनेक लेख व कविता प्रसिद्ध झाल्या आहेत.

श्री. संतोष बाळकृष्ण वालावलकर, ह्यांना

१) राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार २००६- मधु मंगेश कर्णिक ह्यांच्या हस्ते.
२) आदर्श माता-पिता पुरस्कार-पुणे २०१०
३) जिल्हास्तरीय कविता वाचन-उत्तेजनार्थ-२०१३-१४
४) नेमळे पंचक्रोषी महाविद्यालये सावंतवाडी तर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार २०१४-१५
५) जिल्हास्तरीय गणित शिक्षक संघटना २०१५-१६
६) जिल्हास्तरीय- तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन ४ वेळा सहभाग असे त्याना पुरस्कार मीळालेले आहेत.


हार्दिक शुभेच्छा !

# स्वर–योग



विविध संकल्पनांवर आधारित मराठी/हिंदी गाण्यांची मैफल
''मला भावलेले कलावंत'' एकपात्री कार्यक्रम
लग्नसमारंभासाठी आणि
मंगलकार्यासाठी शहनाई जुगलबंदी

**प्रस्तुतकर्ता : निवेदक, मुलाखतकार– प्रदीप देसाई**



***प्रदीप देसाई***

**टेलि. : ०२२–२३८७ ३०६७, मो. : ९८६७०६५७३८**

१४, कुडाळदेशकर गौड ब्राह्मण निवास, गिरगांव, मुंबई - ४०० ००४.

### विक्रांत आजगावकर यांचे हार्दिक अभिनंदन!



अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेकडून कलावंतांना दिलाजाणारा पुरस्कार सोहळा शुक्रवार दिनांक १४ जून २०१९ रोजी माटुंगा येथील यशवंत नाट्यसंकुलात पार पडला सदर कार्यक्रमात सर्वोत्कृष्ट गायक अभिनेता (व्यावसायिक नाटक) संगीत संत तुकाराम ह्या नाटकातील संत तुकारामाची भूमिका करणाऱ्या विक्रांत आजगावकर यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला 'गौड ब्राह्मण'' सभे तर्फे श्री. विक्रांत आजगावकर ह्यांचे हार्दि अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी खुप-खुप शुभेच्छा!

### रिता पाटकर यांचे हार्दिक अभिनंदन!

Rita Patkar into swimming for the past 20 years. Have participated and won medals at state, national and international levels.

Took part in world master games in 2005 held at Edmonton, Canada. Won 2 gold and 1 silver recently at indo-turkey swim meet held at Edirne, Istanbul from 1-3rd feb 2019. Also a gold medal in 1km swim at national open water swimming championships conducted by swimming federation of India on 9th feb 2019.

Have volunteered and officiated in various swim meets at national and international level. I am a certified ASCA Level-3 coach / aqua aerobics. Been coaching for the past 11 years and trained children and adults of all age groups.

Apart from swimming... I am a long distance runner, have participated in couple of half marathons and twice a podium finisher in bengaluru 10k in my age category.




With Best
Compliments From

**Sanjay Walawalkar**

**M. : 9820076814**

**sanjay.walawalkar@Jupiter_services.com**



**JUPITER SERVICES**


**Associate Working Partner of**

**INDUS TOWERS LIMITED**

(A Venture of Airtel, Vodafone & Idea)

# श्रद्धांजली

गौड ब्राह्मण ज्ञातीतील खालील महनीय व्यक्तींचे दु:खद निधन झाले आहे. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल गौड ब्राह्मण सभेला अतीव दु:ख होत आहे. गौड ब्राह्मण सभा त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात सहभागी आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्‌गती देवो हीच प्रार्थना !



## कै. डॉ. अनिल महादेव परुळेकर

डॉ. अनिल महादेव परुळेकर (८०), राहणार वरळी, मुंबई यांचे नुकतेच अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. डॉ. अनिल परुळेकर मुळचे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सांवतवाडीचे, त्यांचे मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण सावंतवाडीला झाले, पुढे दोन वर्षे बेळगांवच्या आर. पी. डी. कॉलेज मधुन त्यांनी त्यावेळच्या इंटरची परिक्षा दिली व त्यानंतर मुंबईतील जी एस मेडिकल कॉलेज मधुन एम.बी.बी.एस. ची पदवी मिळविली. मेडिकलच्या पुढील उच्च शिक्षणासाठी ते १९६२ ते १९६८ या काळात अमेरिकेत राहीले. उच्च शिक्षण पूर्ण करुन परत भारतात आल्यानंतर पुन्हा मुंबईत येऊन त्यांनी आपल्या व्यवसायातील एक निष्णात डॉक्टर (गायनॉक्लॉजिस्ट) म्हणून लौकिक मिळवला. विद्यार्थीदशेत असताना कांही वर्षे ते मुंबईत गिरगांवातील कुडाळदेशकर ज्ञातीच्या रा.ब. अनंत शिवाजी देसाई टोपीवाले चॅरीटीच्या वसतीगृहात त्यांचे वास्तव्य होते. अतिशय दानशूर पण पूर्णपणे प्रसिद्धिपासून दूर राहणाऱ्या डॉ. साहेबानी आपल्या ज्ञातीच्या दोन प्रमुख मध्यवर्ती संस्थाना पुर्वीही मोठमोठ्या देणग्या दिल्या पण त्याची कुठेही वाच्यता केली नाही. सन २०१३ साली कुडाळदेशस्थ गौडब्राह्मण निराश्रित सहाय्यकारी फंडाच्या शतकमहोत्सवाच्या वर्षी आमचे कार्यकर्ते त्यांना देणगीसाठी भेटायला गेले होते तेव्हा डॉ. साहेबानी सावंतवाडीला वेदपाठ शाळेचा मोठा प्रकल्प हाती घेतला होता म्हणुन पुढे कधीतरी बघुया म्हणाले होते. त्याची आठवण ठेवून मागील वर्षात (२०१८) त्यांनी आपणहुन संस्थेला आजपर्यंतची सर्वात मोठी देणगी दिली. आमच्या संस्थेचे एक पदाधिकारी श्री बाळकृष्ण श्रीनिवास पाटील हे त्यांचे जवळचे स्नेही होते त्यांचे मार्फतच त्यांनी संस्थाना देणग्या पाठविल्या व याची कुठे प्रसिद्धी करु नका असा आग्रह धरला होता. आपल्या ज्ञातीसंस्थांचे वार्षिक अहवाल व गौड ब्राह्मण त्रैमासिकांचे अंक ते आवर्जून पाहात असत. ज्ञातीसंस्थाना मिळणाऱ्या देणग्यांचा विनियोग योग्य प्रकारे व योग्य कारणासाठी व्हावा याकडे त्यांचे लक्ष असे.



## अरुण सामंत नेवाळकर

श्री. अरुण वसंत सामंत नेवाळकर हे दिनांक १९-४-२०१९ हनुमान जयंती रोजी स्वर्गवासी झाले. त्या वेळी त्याचे वय वर्षे ८० होते. ते निवृतीनंतर गेली १९ वर्षे कोल्हापूरात रहात होते. बऱ्याच जणाना त्यांनी भक्ती मार्गाचा आवड उत्पन्न केली. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.



## डॉ किशोर महाजन

संपूर्ण गौड ब्राह्मण ज्ञातीमध्ये तसेच संपूर्ण ठाणे जिल्ह्यामध्ये सर्वांना सुपरिचित असलेले डॉ. किशोर बळवंत महाजन ह्यांचे रविवार, दिनांक ९ जून २०१९ रोजी अकस्मीक दु:खद निधन झाले. किशोर महाजन ह्यांचा जन्म ठाण्यातील असून त्यांचे मुळगाव कोकणातील मुणगे हे होय. १९३३ साली त्यांचे वडील बळवंत गोपाळ महाजन हे होमिओपॅथ व बायोकेमिस्ट असा बोर्ड लावून प्रॅक्टीस करणारे ठाण्यातील पहिले एम.डी. होमिओपॅथ डॉक्टर होते वडीलांच्या पावलावर पाऊल टाकून ते देखील ठाण्यात होमिओपॅथीचे डॉक्टर म्हणून सर्वोना सुपरिचीत झाले. डॉक्टरांना वैद्यकीय व्यवसाया बरोबरच समाज कार्याचीही आवड होती. अनेक संस्थाच्या कार्यांत त्यांचा सहभाग होता. तसेच गौड ब्राह्मण सभा, ठाणे चे ते अध्यक्ष होते. डॉ. किशोर महाजन यांच्या पश्चात पत्नी स्मीता, मुलगा योगेश, मुलगी-संगीता नाईक व नातवंडे असा परिवार आहे.

## स्व. श्रीमती. मंगला उर्फ(कृष्णा)विश्वनाथ सामंत.



स्व. श्रीमती. मंगला उर्फ (कृष्णा) विश्वनाथ सामंत. यांचे ३ मे २०१९ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने त्यांच्या रहात्या घरी शिरसाड विरार येथे दुखःद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन पुत्र प्रशांत व मिलिंद व एक कन्या सौ.अंजली सामंत ज्यांनी नुकताच गौड ब्राम्हण त्रैमासिकात कृष्णा हा त्यांच्यावर लिहिलेला लेख प्रकाशीत झाला होता.त्या उत्तम गृहिणी होत्या.त्यांनी अनेकांना वेळप्रसंगी मदत केली.ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो अशी भावपूर्ण आदरांजली!

# ज्योतीताई रघुनाथ पाटकर



ज्योतीताई पाटकर

कुडाळदेशकर ज्ञातीला जनसामान्यांसाठी लढणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांची मोठी परंपरा आहे नरेंद्र दाभोलकर असतील, मेधाताई पाटकर असतील किंव्हा कांचनताई परुळेकर असतील याच परंपरेतील एक मोठं नाव नुकतच काळाच्या पडद्याआड गेले. ज्योतीताई रघुनाथ पाटकर, आम्हा डोंबिवलीकरांच्या या हक्काच्या आधारस्तंभाचे सोमवार, दि.१५ एप्रिल २०१९ रोजी अचानक देहावसान झाले, त्यांच्या निधनाने डोंबिवलीच्या सामाजिक जीवनात जी पोकळी निर्माण झाली आहे, ती नजीकच्या काळात भरून निघणे अशक्य आहे. खर सांगायचं तर मला ज्योती ताईंचे कार्यकर्तृत्व खऱ्या अर्थाने लक्षात आले त्यांच्या श्रद्धांजली सभेत.

ज्योती रघुनाथ पाटकर या कै. केशव बाळकृष्ण खानोलकर आणि कै. सिंधुताई खानोलकर यांची ज्येष्ठ कन्या. बालपण गेले गोरेगावात आणि शाळा अ. भि. गोरेगावकर. लहानपणापासूनच त्यांच्यावर सामाजिक बांधिलकीचा संस्कार झाला घरातून आणि गोरेगावात रुजलेल्या समाजवादी विचारातून. आईचा सेवा धर्म म्हणजे कोणाही आजारी व्यक्तीची घरी आणून शुश्रूषा करणे, घरातील भांडी कुंडी, गाद्या गिरद्या देऊन गरजुंच्या संसारास हातभार लावणे. वडिलांची सुद्धा आईच्या सेवाधर्मास संमती होती. केशवरावांनी सुद्धा बांद्रा स्कुल ऑफ आर्टस् असेल, कुडाळदेशकर ज्ञातिसंस्था असतील, अनेक संस्थांसाठी योगदान दिले. या सेवाभावी आई वडिलांची हि परंपरा ज्योतीताईंनी खूप पुढे नेली.

नेतृत्व आणि धडाडी हे गुण लहानपणापासूनच त्यांच्यात होते. शाळेत अकरावीत असताना पिण्याच्या पाण्यासाठी मुला-मुलींची वेगळी रांग असावी म्हणून त्यांनी मैत्रिणींना एकत्र आणून शाळा व्यवस्थापनाकडे मागणी केली. आपली मागणी पूर्ण होत नाही म्हणून उपस्थित सर्व मुलींना घरी जाण्यास सांगितले, हि बातमी जेव्हा विद्यार्थीप्रिय प्राचार्य कै. द. गो. प्रभू यांना समजली त्यांनी ताईंना बोलावून समज दिली पण पुढे शाळेने सहा नळांपैकी २ नळ मुलींना आणि ४ नळ मुलांना अशी विभागणी केली.

सन १९७१ ला सिनियर हिंदी शिक्षक सनद हि पदवी प्राप्त झाल्यावर, ७२ साली रघुनाथ गुरुनाथ पाटकर यांच्याशी विवाहबद्ध होऊन त्या डोंबिवलीत वास्तव्यास आल्या. लग्नानंतर सुद्धा त्यांनी आपले शिक्षण चालू ठेवले १९७५ साली मराठी विषयात एम.ए. ची पदवी त्यांनी प्राप्त केली. १९८५ साली एम.ए. सोशियोलॉजी आणि पत्रकारितेतील पदविका त्यांनी प्राप्त केली. अन्यायग्रस्त शोषित महिला, बालक, ज्येष्ठ नागरिक तसेच आदिवासी यांची लढाई खंबीरपणे लढण्यासाठी त्यांनी कायद्याचे तसेच समुपदेशनाचे विविध अभ्यासक्रम वेळोवेळी पूर्ण केले. विविध प्रतिष्ठित वर्तमानपत्रातून महिला आणि बालकांच्या हक्कांविषयी त्यांनी विपुल लिखाण केले.

ताईंनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात स्वामी विवेकानंद शाळा येथे शिक्षक म्हणून केली, त्यानंतर नेत्रदीप बालमंदिर हि स्वतःची शाळा त्यांनी चालू केली, तरुणांसाठी व्यक्तिमत्व विकासाच्या अनेक कार्यशाळा घेतल्या. मुकंद आर्यन तसेच रिलायन्स इन्फोटेक सारख्या जनसंपर्क अधिकारी म्हणून सुद्धा त्यांनी जवाबदारी इमानेइतबारे पार पाडली पण स्वार्था पेक्षा परमार्थात त्यांचे मन अधिक रमे. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील कित्येक पुरस्कारांनी/सत्कारांनी ताईंना सन्मानित करण्यात आले.

लग्न करून ७२ साली डोंबिवलीत आल्या तेव्हा डोंबिवली हे अतिशय लहान शहर वजा गावच होत. आपल्या आजूबाजूच्या अडचणीतील महिलांची परिस्थिती, त्यांच्या कुटुंबाची, मुलांची होणारी आबाळ बघून त्या बैचेन व्हायाच्या, या बैचेनीत न राहता त्यांनी आपल्या परीने आपले काम, संसार सांभाळून समाजकार्यास सुरुवात केली. हाती घेतलेला प्रश्न पूर्णतः सोडवूनच पुढचे काम हाती घ्यायचे हा त्यांचा शिरस्ता. कोणत्याही अन्यायग्रस्ताने मोठ्या आशेने ताईंना हाक मारावी आणि ताई त्याच्या मदतीला धावून गेल्या नाहीत असे गेल्या चाळीस बेचाळीस वर्षात घडले नाही.

समाजकारणा बरोबरच त्या राजकारणात सुद्धा त्या कार्यरत होत्या. डोंबिवलीत भारतीय जनता पार्टीला

रुजविण्यात त्यांचे मोठे योगदान होते. महाराष्ट्र प्रदेश भाजपा महिला मोर्चात त्यांनी अध्यक्ष, खजिनदार अशी विविध पदे प्रामाणिकपणे भूषविली. एकूणच स्वाभिमानी स्वभावामुळे त्या राजकारणात रमल्या नाहीत तरी परिसरातील अनुभवी आणि अभेद्य व्यक्तिमत्व म्हणून नंतरच्या काळात आमदारकीसाठी त्यांचे नाव चर्चेत असे. या राजकीय कारकिर्दीत झालेल्या ओळखीचा वापर त्यांनी स्वतः साठी न करता समाजकारणासाठी केला. कित्येक शासकीय समित्यांच्या त्या आयुष्याच्या अखेरीपर्यंत भाग होत्या.

कुडाळदेशकर गौड ब्राह्मण सहयोग, डोंबिवली या संस्थेशी त्या दीर्घकाळ संबधीत होत्या, सहयोगच्या अध्यक्षा म्हणून २०१२ साली त्या निवृत्त झाल्या. त्यांचे ज्ञातीवर आणि ज्ञातीबांधवांचे ज्योतीताईंवर निरतिशय प्रेम होते. २००० सालानंतर ज्योतीताईंनी परिवर्तन महिला संस्थेच्या कामास वाहून घेतले. ताईंनी यादी बनवून पूर्ण होणार नाहीत एवढी असंख्य कामे या संस्थेच्या माध्यमातून केली. यात प्रामुख्याने १२२८ महिला बचत गटांची स्थापना, मोखाडा सारख्या दुर्गम भागातील ८० गावांचा दत्तक घेऊन विकास, एच.आय.व्ही बाधित रुग्णाचे पुनर्वसन, टिटवाळा येथील मुक्ता बालिकाश्रम, ज्येष्ठ नागरिकांसाठी दिलासा डे केयर, दिलासा विरंगुळा केंद्र असे विविध उपक्रम चालू करून यशस्वीरीत्या चालविले. एवढी कामे करून सुद्धा देणग्यांसाठी त्यांना कधीही हात पसरावे लागले नाहीत. विविध कंपन्यांचे सी.एस.आर. फंड तसेच अगदी परदेशातून त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांच्या संस्थांना देणग्या मिळाल्या.

विशेषतः टिटवाळा येथील मुक्ता बालिकाश्रम या उपक्रमाचा इथे विशेष उल्लेख केला पाहिजे. वय वर्ष पाच ते अठरा वयोगटातील मुलींचे संगोपन ज्योतीताई आईच्या मायेने करत होत्या. आतापर्यंत तेथील १३ मुलींची योग्य ती स्थळ पाहून लग्न लावण्यात आली. या मुलींच्या बारीक सारीक गरजांकडे, अभ्यासाकडे त्यांचे लक्ष असे. या मुलींना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी त्या कार्यरत असत. ग्राम विकासासाठी कार्यकर्ते निवडून प्रशिक्षित करणे आवश्यक असते हे ओळखून मोखाडा तालुक्यातील शेकड्यानी खेड्यातील सुशिक्षित तरुणांना कायद्याचे आणि शासकीय योजनांचे प्रशिक्षण परिवर्तनच्या माध्यमातून देण्यात आले. डोंबिवली पोलीस स्टेशनला विशेषतः महिला आणि बालकांच्या बाबतीत कुठची आगळीक घडली तर पोलीस हे ताईंची मदत घेत, पीडितांच्या मदतीसाठी ताई रात्री अपरात्री पोलीस स्टेशनला धाव घेत.

ज्योतीताईंच्या या समाजकार्यास त्यांचे पती बापू पाटकर तसेच त्यांच्या कुटुंबीयांचा सक्रिय पाठिंबा होता. कै. आबा पाटकर हे ताईंचे सासरे आलेले फोन व निरोप नोंद ठेवणे आणि ताईंना सायंकाळी निरोप देणे हे काम मोठ्या कौतुकाने करीत. ताईंचे बंधू श्री रवींद्र खानोलकर तसेच ताईंच्या अनेक सख्यांनी ताईंच्या तब्येतीची काळजी घेतली.

ज्योतीताई अगदी शेवटपर्यंत अगदी शेवटच्या श्वासापर्यंत म्हटलं तर अतिशियोक्ती होणार नाही कार्यरत होत्या. ज्योतीताईंचे कार्यकर्तृत्व हे माझ्या सारख्या कित्येक कार्यकर्त्यांना दीर्घकाळ प्रेरित करीत राहील.

---

## माधव नारायण देसाई यांचे दीर्घ आजारपणाने निधन


डोंबिवली येथील आपले ज्ञातीबांधव माधव नारायण देसाई यांचे दीर्घ आजारपणाने निधन झाले.



माधव यांचे मूळ गाव मांजर्डे वाडी, परुळे हे होते.मेकॅनिकल ड्राफ्ट्समनचा कोर्स करून त्यांनी अँकर सोल्युशन येथे सेवा केली,नोकरीच्या निमित्ताने त्यांनी लंडन,दुबई अशा विविध ठिकाणी वास्तव्य केले.

ते स्वतः एक उत्कृष्ठ गायक होते,डोंबिवलीतील सुप्रसिद्ध समर्थ भजन मंडळात त्यांनी कित्येक वर्षे योगदान दिले.त्यांच्या पश्चात पत्नी आणि मुलगा असा परिवार आहे.

## स्व. अशोक दत्तात्रेय सामंत



स्व. अशोक दत्तात्रेय सामंत याना ३० एप्रिल २०१९ या दिवशी सकाळी देवाज्ञा झाली.

अशोकरावांचा जन्म कोल्हापूर, महाराष्ट्र, येथे १६ जून १९३१ रोजी झाला. त्यांचे पिताश्री स्व. दत्तात्रेय रामचंद्र सामंत हे प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ होते आणि मुंबई विश्वविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते. मये (गोवा) या निसर्गरम्य ठिकाणी स्थाईक असलेल्या सधन, जमीनदार कुळात दत्तात्रेयांचा जन्म झाला. या शिक्षणप्रेमी कुटुंबातील अनेक सुपुत्र उच्च शिक्षणासाठी, त्याकाळी पोर्तुगीज अमलाखाली असलेल्या गोव्यातून, महाराष्ट्रात स्थलांतरित झाले,त्यांपैकी दत्तात्रेय रामचंद्र हे एक होत.दत्तात्रेय आणि प्रसिद्ध न्यायाधीश तेंडूलकर यांची सुकन्या विमलताई यांचे अशोकराव हे एकुलते एक सुपुत्र. माध्यमिक शाळा आणि महाविद्यालयात, हुशार आणि आदर्श शिष्य म्हणून प्रसिद्ध असलेल्या हरहुन्नरी अशोकरावांनी कधीही प्रथम श्रेणी सोडली नाही.

अशोक सामंत १९५४ साली आय. ए. एस. (Indian Administrative Service) या बुद्धिमत्तेची कसोटी पाहणाऱ्या अतिशय स्पर्धात्मक परीक्षेत भारतात पहिले आले. त्यांनी महाराष्ट्र कॅडेर पसंत करून ३३ वर्षे महाराष्ट्र सरकार आणि दिल्ली सरकारची निरपेक्ष सेवा केली आणि एक प्रज्ञावंत, कर्तबगार आणि निस्पृह अधिकारी म्हणून अनेक महत्त्वाची पदे सांभाळली. दिल्ली आणि महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांत (मुंबई, पुणे, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली) महत्त्वाच्या पदांवर त्यांची वेळोवेळी नेमणूक करून महाराष्ट्र सरकारने त्यांचे गुण आणि ऋण मान्य केले.

१९८७ साली संशोधन, वाचन आणि लेखन या आपल्या आवडत्या छंदांत मन रमविण्यासाठी त्यांनी सरकारी सेवेतून स्वेच्छा निवृत्ती घेतली.

आपल्या कुडाळदेशस्थ गौड ब्राह्मण समाजाचा त्यांना अतीव अभिमान होता. त्यांच्या जाण्याने आपल्या समाजातील एक आदर्श आणि प्रज्ञावंत व्यक्तिमत्व आज दृष्टीआड झाले आहे.

## कै. प्रेमलता गजानन प्रभु
## एक अलौकिक व्यक्तीमत्त्व

दि. २ मे, २०१९ रोजी प्रेमलता प्रभु यांचे वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. कुडाळदेशकर गौडब्राह्मण समाजातील अनेक आदर्श एकत्र कुटुंबात ज्यांची गणना होते त्यांत त्यांचे फार मोठे स्थान आहे.


मुळ दिक्षीत कुळांत जन्मलेल्या कु. लिलावती दिक्षीत यांचा गजानन प्रभु केळूसकर या उच्चशिक्षीत तरुणाशी १९५५ साली प्रेम विवाह झाला. त्याही पदवीधर होत्या. साईबाबाचे परमभक्त काकासाहेब दिक्षीत कुटुंबात त्यांचा जन्म झाला होता त्याचा त्याना सार्थ अभिमान होता व त्या बाबांच्या उपासनेत होत्या.

कै. गजानन प्रभुकेळूसकर कुटुंबात आल्यावर कुटुंबाच्या लौकिक जबाबदाऱ्या सांभाळतानाही त्यानी कुडाळ देशकर ज्ञातीच्या इतिहासाचा सखोल अभ्यास केला. कै. गुं. फ. आजगांवकर कै. विनया आजगांवकर, रा. ब. बांबर्डेकर कुटुंबीय यांच्या सतत संपर्क अनेक ग्रथ कागद पत्रे यांचा अभ्यास करून त्यांत सापडणारे आपल्या कुटुंबाचे संदर्भ, परंपरा, देवस्थान, कुटुंबातील लोकोत्तर माणसे यांचा सखोल अभ्यास केला व लिहून काढला. त्यावर सतत चिंतन, मनन, अनेकांशी संवाद साधून १९५५ ते १९९८ या कालावधीत एक हस्तलिखीत तयार केले ते आपल्या सख्या चुलत जावा व दिर याना दाखवून त्यांच्याही आठवणी लिहून घेतल्या. आणि त्याही संग्रहित केल्या, आहेत. हा चित्रमय इतिहास येवढा सुबक, संदर्भ युक्त आणि हृदयस्पर्शी आहे की तो वाचतानां त्यांच्या अलौकिक सामर्थ्याने वाचक भारावून जातो.

प्रेमलता हे नांव सार्थ करण्याच्या अनेक स्मृती या कुटुंबाबरोबर अनेक माणसांच्याही असू शकतात. त्या मुलांच्या अत्यंत आवडत्या होत्या. आपल्या मुलां बरोबरच त्यांची चूलत भावडे, (हा आकडा २०/२२ असावा) मीत्र परिवार यांचे लाड, कौतुक पुरविण्यांत त्यानी सारे आयुष्य घालवील.

गौड ब्राह्मण संस्थेच्या त्या फार मोठ्या देणगीदार तर आहेतच पण त्या एक चंगल्या संस्कारित लेखीकाही होत्या. प्रसंगी मार्गदर्शक ही होत्या. त्यांच्या अलौकिक व्यक्तीमत्त्वास गौड ब्राह्मणची ही श्रद्धांजली.

## स्व. आबासाहेब वालावलकर



आबा वालावलकर

आबासाहेब वालावलकर यांचा जन्म निसर्गरम्य कोकणात परुळ्याच्या नेवाळी वाडीत झाला. त्यांनी बालवयी वडिलोपार्जीत बाग बागायती शेती मध्ये काम केले. पुढील शिक्षण ओरीएंट हायस्कूल व महाविद्यालयीन शिक्षण कीर्ती कॉलेज मुंबई मध्ये झाले. त्यानंतर त्यांनी मोडक रबर फॅक्टरी, सरकारी प्रिंटींग प्रेस, जनरल पोस्ट ऑफिस मध्ये नोकरी केली, परंतु त्यांची कुशल बुद्धीमत्ता व क्रियाशीलता त्यांना वेगळ्याच वाटेवर घेऊन गेली, ते सरकारी नोकरी सोडून एल.आय.सी. मध्ये फिल्ड ऑफिसर म्हणून कामाला लागले. सरकारी स्थिर पगाराची नोकरी सोडलेल्या आबासाहेबांनी नंतरच्या काळात सर्वांना खऱ्या अर्थाने कामाला लावले. २५ वर्षाच्या LIC च्या कारकीर्दीनंतर निवृत्त झाल्यावर स्वत:चा विमा व्यवसाय व आर्थिक गुंतवणूक क्षेत्रातील इतर जोड व्यवसाय सुरु केले. त्यांची कामाची काटेकोर पद्धत नियमितता, शिस्त, सेवा या सर्वाच्या जोरावर त्यांनी नवनवीन शिखरे पादाक्रांत केली. छोट्यामोठ्या एजंटासाठी आबासाहेबांचा आदर्श एल.आय.सी. करून देऊ लागली. विमा सल्लागार म्हणून काम करत असताना त्यांना एम.डी.आर.टी. च्या महासभेसाठी १९९९ या काळामध्ये सपत्नीक अमेरिकेमध्ये जाण्यासाठी निमंत्रित करण्यात आले होते. आबासाहेबांनी ज्ञातीसंस्थाना वेळोवेळी मदत केली त्यांची जाहिरात तर गेली अनेक वर्षे ज्ञातीच्या गौड ब्राह्मण सभेच्या त्रैमासिका मध्ये आपण वाचलेली आहे. या त्यांच्या कार्यात त्यांना मोलाची साथ त्यांची सुविद्य पत्नी सौ. मालती भिकाजी वालावलकर यांनी दिली त्यांनी ६३ वर्षे सुखाचा संसार केला.

दि २८ मार्च २०१९ रोजी वयाच्या ८९ व्या वर्षी त्यांची अल्पशा आजाराने प्राणज्योत मालवली, १मे रोजी ते वयाची ९० वर्षे पूर्ण करणार होते त्या अगोदरच काळाने त्यांना सोबत नेले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, मुलगी, जावई, नातवंडे, नात-सुना असा परिवार आहे. श्री. किरण वालावलकर त्यांचा मुलगा वडिलांप्रमाणेच विमाक्षेत्रात कार्यरत असून वडिलांनी दिलेले ज्ञान, अनुभव घेऊन विमा व्यवसायाचा वारसा आधुनिक पद्धतीने चालवीत आहे.

## विनायक सदानंद उर्फ शेखर बागलकर




डोंबिवलीतील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक विनायक सदानंद उर्फ शेखर बागलकर यांचे वयाच्या ५४ व्या वर्षी दु:खद निधन झाले.

मध्यमवर्गीय कुडाळदेशकर कुटुंबात जन्म झालेल्या बागलकर साहेबांनी स्वतःच्या कारकिर्दीची सुरुवात म्हाडा पासून केली. स्वतःचा उद्योग चालू करण्याच्या इच्छेने म्हाडाची सरकारी नोकरी सोडून ते बांधकाम क्षेत्रात आले व त्यांनी विविध प्रकल्पांची उभारणी करून नावलौकिक कमावला.

त्यांनी कित्येक तरुणांना मार्गदर्शन करून बांधकाम क्षेत्रात आणले आणि सुस्थापित होण्यास मदत केली. सहा महिन्यांपूर्वीच सहयोगने उद्योगरत्न पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला होता. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुली असा परिवार आहे.

---

## रामचंद्र व ासुदेव उर्फ तात्या सामंत-तेरावळेकर



डोंबिवलीतील एक ज्येष्ठ ज्ञाती बांधव रामचंद्र वासुदेव उर्फ तात्या सामंत-तेरावळेकर यांचे शनिवार,२० एप्रिल २०१९ रोजी अचानक निधन झाले.

तेरावळे वाडी, परुळे येथे तात्यांचा जन्म झाला, पाट येथे राहून आपले शालेय शिक्षण पूर्ण करून तात्या डोंबिवलीत आले. भांडुप येथील ऋ. घ. थ कंपनीत त्यांनी दीर्घ काळ सेवा केली. स्वतःच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या पूर्ण करून तात्यांनी सामाजिक कार्यात ही सहभाग घेतला.

नांदीवली ग्रामपंचायतीत ते दोन वेळा पंच म्हणून निवडून आले, त्याच बरोबरीने रा. वि. नेरुरकर हायस्कुल आणि ज्युनियर कॉलेज च्या उभारणीत तसेच प्रशासनात त्यांनी मोठे योगदान दिले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे.

# निवृत्त शिक्षिकेचे मरणोत्तर देहदान

'मरावे परी किर्ती रुपे उरावें । पूर्वीच्याकाळी शाळांमध्ये त्यावेळचे शिक्षक विद्यार्थ्यांकडून प्रार्थनेच्या माध्यमातून या श्लोकाचे पठन करून घेत. त्याचे आचरण कसे करावे, याची शिकवण देत. नेमकी हीच शिकवण त्या काळात विद्यार्थ्यांना देणाऱ्या परुळे येथील निवृत्त शिशिका सौ. शैलजा शिवराम प्रभू (८५) यांनी मरणोत्तर देहदान करून आपले जीवन खऱ्या अर्थाने अमर करीत समाजासमोर नवा आदर्श घालून दिला.



मरणोपश्चात आपल्या देहाचा समाजासाठी काहीतरी उपयोग व्हावा, यासाठी प्रचंड इच्छाशक्ती बाळगून असलेल्या शैलजाबाईंना त्यांच्या या संकल्पात कुठल्याही तांत्रिक अडचणी येऊ नयेत, यासाठी त्या मृत्यूशय्येवर असतानाच त्यांना अखेरच्या क्षणी पडवे येथील लाईफ टाईम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मंगळवारी पहाटे तीन वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. नंतर मरणोत्तर देहदानाची सर्व प्रक्रिया रितसर पार पडून लाईप टाईम हॉस्पिटलने शैलजा यांचे पार्थिव आपल्या ताब्यात घेतले. 'लाईफ टाईम' हॉस्पिटलमुळे संकल्प तडीस गेला.

सौ. शैलजा प्रभू या चिपी विमानतळ आंदोलनाचे नेतृत्व करणारे निवृत्त शिक्षक श्री. बाजी प्रभू यांच्या पत्नी होत. शैलजा यांच्या संपूर्ण कुटुंबियांनीच काही वर्षापूर्वी देहदानाचा रितसर संकल्प सोडला होता. नुसता संकल्प केला, तरी तो तडीस नेणे ही प्रक्रिया फार कठीण असते. यापूर्वी देहदान करायचे असल्यास मृत्यू पश्चात पार्थिव तीन तासाच्या आत कोल्हापूर मेडिकल कॉलेजमध्ये पोहोचवावे लागायचे. सिंधुदुर्गात तशी सुविधा नसल्यामुळे ही धावपळ करावी लागायची. यामध्ये बऱ्याच तांत्रिक अडचणी देखील असायच्या आणि त्यामुळे देहदानाचे संकल्प अपुरेच राहायचे. खासदार नारायण राणे यांच्या पडवे येथील लाईप टाईम हॉस्पिटलमध्ये कार्यरत असलेल्या डॉक्टर आर. एस. कुलकर्णी यांच्या सूचनेनुसार नारायण राणे यांनी या इस्पितळात देहदानाची प्रक्रिया सिंधुदुर्गवासीयांना सुरळीतपणे पार पाडता यावी, यासाठी व्यवस्था केली आणि प्रभूकुटुंबियानी शैलजा यांच्या देहदान संकल्पास मूर्त रूप दिले.

**अखेरच्या क्षणी करावी लागली धावपळ**

खरं तर शैलजाताईंचा हा देहदान संकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी प्रभू कुटुंबियांना अखेरच्या क्षणी खूप धावपळ करावी लागली. ज्यावेळी शैलजाताईंचा अखेरचा श्वास सुरु होता, त्यावेळी हा संकल्प कसा तडीस न्यावा याबाबत कुटुंबियांमध्ये चर्चा सुरू झाली. यासाठी लगतच्या परुळे आरोग्य केंद्रामध्ये याबाबत विचारणा केली असता त्यांनी ही प्रक्रिया आपण पूर्ण करू शकत नाही असे सांगण्यात आले. नंतर खासगी डॉक्टरनी देखील हात वर केले. शेवटी परुळेतील रहिवासी वासू माधव व ऍड. अमोल सामंत यांच्या पुढाकाराने शैलजा यांना तातडीने पडवे येथील लाईफ टाईम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. सोमवारी ६ रोजी सायंकाळी त्यांना दाखल करण्यात आले आणि ७ रोजी पहाटे ३ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. त्यानंतर लाईफ टाईम हॉस्पिटलच्या वैद्यकीय तज्ज्ञांनी सर्व तांत्रिक सोपस्कर पूर्ण करीत शैलजाताईंचे पार्थिव ताब्यात घेतले. मरणोत्तर देहदान करणाऱ्या शैलजाताई ह्या परुळे येथील पहिल्या महिला ठरल्या.

शैलजा प्रभू यांच्या पश्चात पती बाजी प्रभू, दोन मुलगे, तीन मुली, सुन, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

❑ ❑ ❑

## वरांची यादी

| क्र. | फोन-वास्तव्य | नाव | जन्मतारीख उंची | शिक्षण | गोत्र-दैवत | रा./न./चरण | व्य./मा.उत्पन्न | अपेक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 9420114390<br>02362/230014<br>कुडाळ | प्रसन्ना कमलाकर पाटील | 05/03/1984<br>5' 6'' | Dep. Auto Engg.<br>B.A.M.S.CUM<br>Yoga & Naturopathi | सांख्यान/<br>चामुंडेश्वरी | मीन/<br>उ.भाद्रपदा/<br>४ थेर | सेल्स कन्सल्टंट<br>कोल्हापूर 15,000 ते<br>०,००० | किमान 10 वी. |
| २ | ९८६७८८५५६२<br>९८६९४१०४९८<br>माहिम | कल्पेश सुहास ठाकूर | ०५/०२/१९९१<br>६' | MBA Finance | वत्स/<br>सातेरीदेवी | तुळ/चित्रा/<br>१ लेव | Panoramic Gr.<br>Prabhadevi, 26,000 | पदवीधर<br>य २५-२६ |
| ३ | ९६१९५९६६०६<br>९७६९००७५३४<br>ठाणे | जयेश श्रीराम माळगांवकर | २७/०७/१९९१<br>५'८'' | B.S.C. P.G.D.M.<br>P.G.D in packing<br>& printinhg<br>Technology | काँडिण्य/<br>भावईदेवी | मकर/<br>श्रवण/४थेन | Quality Analyst<br>Vashi<br>4,00,000 P. A. | ग्रॅंज्युएट<br>ोकरी हवी |
| ४ | ९०११०८२६३०<br>९८६९०४१९६५<br>ठाणे | संजीव नंदकुमार अवसरे१ | १/१२/१९८३<br>५'६'' | B.E. (Comp.)<br>MSC. Statistic<br>from IIT Powai<br>Silver Medalist | वशिष्ठ/<br>भगवती देवी | कुंभ/<br>शततारका/<br>१लेर | क्रेडीट सुइस बँक<br>पवईव<br>४ ते २५ लाख<br>वार्षिक | अनुरुप<br>य २९ ते ३४ |

## वधुंची यादी

| क्र. | फोन-वास्तव्य | नाव | जन्मतारीख उंची | शिक्षण | गोत्र-दैवत | रा./न./चरण | व्य./मा.उत्पन्न | अपेक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८४५२८१७११४<br>वसई५ | नमिता केशव ठाकूर | १५/०५/१९८२<br>'३'' | B. Com, CS, LLB | वत्स/सोमेश्वर | मकर/धनिष्ठा/<br>१ ले | नोकरीच्या शोधात | उच्चशिक्षित, अनुरुप. |
| २ | ९३२३४०९२११<br>दादर | रश्मी नितीन वेगसरकर | १६/०९/१९८३<br>५'४'' | B. Com | जमदग्नी/मंगेश<br>महालक्ष्मी | धनु/पूर्वाषाढा | कोटक महिंद्र बँक<br>मालाड, ४५,००० | ग्रॅंज्युएट |
| ३ | ९७६९६९८३८६<br>जोगेश्वरी | पूर्वा तुषार झारापकर | १९/११/१९९२<br>५' | CA<br>(CA CFA LEVEL I) | वत्स/रवळनाथ | कन्या/<br>उत्तरा फाल्गुनी | ICICI Pru. Worli<br>8,00,000 P. A. | CA, MS, MD<br>वय २५ ते ३० |
| ४ | ९४२२४३४८४२<br>९३२२७७८८२९<br>सिंधुदूर्ग | चैताली सतिश पाटकर | ०१/०७/१९९४<br>५' २' | B D S | भारद्वाज/<br>माऊली | मीन | असोसिएट डेटींस<br>नेरूळ, ३०,००० | MBBS, MD<br>वय २५ ते २७ |
| ५ | ९०७५००६३९२<br>९४२२६७२३४५<br>तिरवडे | प्रतिक्षा प्रदीप पाटकर | ०१/१२/१९९०<br>५'१' | B.E. Instrumentation<br>MBA Finance | भारद्वाज/<br>माऊली | मेष/कृतिका/<br>१ ले | Winspire Solution<br>Pvt Ltd, Pune.<br>5,00,000 PA | उच्चशिक्षित<br>वयात अंतर एक ते दोन<br>वर्ष |
| | | | | | | | | |

| क्र. | फोन-वास्तव्य | नाव | जन्मतारीख उंची | शिक्षण | गोत्र-दैवत | रा./न./चरण | व्य./मा.उत्पन्न | अपेक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ९२२६३५५४३४<br>९६६५०९५०६२<br>विरार | सायली सुधीर गवाणकर | ०३/०८/१९९२<br>५'४'' | Bachlor in Architect<br>Appear for Master<br>2 part | भारद्वाज/<br>पुरूषोत्तम | कन्या/हस्त<br>३ रे | Asst. prof. Viva<br>College, Virar<br>45,000 | उच्चशिक्षित<br>वय २७ ते ३० |
| ७ | ९०८२४०६१८५<br>०२२-२५००६५२२ | ख्याती अशोक<br>खानोलकर | १४/०४/१९९३<br>५'३'' | M. Com, I Class BFM | भारद्वाज/<br>सिद्धेश्वर | मकर/<br>उ. षाढा/ | Mearsks, Airoli<br>३०,००० | अनुरुप<br>वयात अंतर तीन ते<br>पाच |
| ८ | घाटकोपर<br>९८२०१४५७६८ | गौरी विकास देसाई१ | ५/०९/१९९१ | B Com MBA | वत्स/ | ३ रेव<br>वृश्चिक | L & T, Kalina | र्ष<br>अनुरूप |



**डॉ. अनिल अवचट यांना एकनाथ ठाकूर स्मृती पुरस्कार प्रदान**

स्वतत्र बुद्धी जपायला शिकले पाहिजे. पुस्तक पाठांतरातून मिळणाऱ्या बुद्धीला मर्यादा आहेत. स्वत:ची बुद्धी वापरून नवीन तंत्रज्ञानाचा शोध घ्या. चांगला संवेदनशील माणूस म्हणून जगा, असे आवाहन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व लेखक डॉ. अनिल अवचट यांनी शनिवारी येथे एकनाथ ठाकूर स्मृती पूरस्कार २०१९ च्या वितरणप्रसंगी केले.

कुडाळदेशकर गौड ब्राह्मण सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, गिरगाव व बॅ. नाथ पै शिक्षण संस्था, कुडाळ यांच्या संयुक्त विद्यमाने सारस्वत बँकेचे माजी अध्यक्ष तथा माजी खासदार एकनाथ ठाकूर यांच्या नावाने दिला जाणारा एकनाथ ठाकूर स्मृती पुरस्कार डॉ. अवचट यांना देऊन सन्मानित करण्यात आले. येथील बँ नाथ पै शिक्षण संस्थेच्या सभागृहात शनिवारी झालेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी डॉ. अवचट बोलत होते. एसबीआयच्या माजी अधिकारी तथा एकनाथ ठाकुर यांच्या पत्नी श्रीमती अनुराधा ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला.

आमदार वैभव नाईक, भाजपचे प्रेदश सचिव शरद चव्हाण, बॅ. नाथ पै शिक्षण संस्थेचे चेअरमन उमेश गाळवणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अमृता गाळवणकर, संचालक डॉ. अमेय देसाई, सारस्वत बँकेचे संचालक सुनील सौदागर, प्रदीप देसाई, मार्गारिट लोबो, डॉ मिलिंद कुलकर्णी, सुनील वालावलकर, बॅ. नाथ पै सेंट्रल स्कूलच्या प्राचार्य स्वरा गावडे, बॅ. नाथ पै. कला-वाणिज्य विज्ञान महिला महाविद्यालयाचे प्राचार्य अरुण मर्गज आदी यावेळी उपस्थि होते.

डॉ. अवचट म्हणाले, निसर्गाने आपल्याला भरपूर काही दिले आहे पण माणूस म्हणून जगताना स्वतंत्र बुद्धी आहे. तिचा वापर स्वतंत्र विचार करण्यासाठी तसेच नवीन युक्ती शोधून काढण्यासाठी केला पाहिजे. पुस्तकी ज्ञानातून मिळालेल्या गुणांना मर्यादा असतात. मात्र, बुद्धीला चालना देऊन स्वतंत्र विचार व नवीन शोध घेण्याचा प्रयत्न आपण कधी करतो का? याचा विचार केला पाहिजे.

केवळ गुण मिळाले म्हणून धन्यता मानता नये. बुद्धी चौकस असते. सतत प्रश्न पडत गेले, तर त्याचे उत्तर शोधण्याचे काम बुद्धी करते, असे सांगून न्यूटनने लावलेला गुरुत्वाकर्षनाचा शोध व अन्य उदाहरणे त्यांनी दिली. शिक्षणामुळे अहंकार येण्याची शक्यता फार असते. मी हुशार आहे. ही न्यूनगंड भावना तयार होता नये.

श्रीमती ठाकुर म्हणल्या. शिक्षणाला फार महत्व आहेच मात्र, केवळ शिक्षणाने मोठे न होता माणूस म्हणून मोठे व्हा. पुस्तकी शिक्षणाच्या मागे न लागता स्वत:च्या बौद्धिक क्षमतेचा शोध घ्या. भरपूर शिकून यशस्वी माणूस व्हा. भविष्यात आपल्या उत्पन्नातील काही पैसा सामाजिक कार्यासाठी द्या. सामाजिक भान सोडू नका.

**NKGSB Bank**
NKGSB Co-op. Bank Ltd.

# FD
INTEREST RATES (% p.a.)*
w.e.f. 01.04.2019

| Period | General Public/ Society Trusts/ Corporates | Senior Citizens |
|---|---|---|
| | SDR/ MIP / FDR / RD / QIRP | SDR/ MIP / FDR / RD / QIRP |
| 7 days to 44 days | 4.75% | 5.25% |
| 45 days to 90 days | 5.25% | 5.75% |
| 91 days to 180 days | 6.50% | 6.75% |
| 181 days to 364 days | 7.25% | 7.50% |
| Above 2 Years upto 7 Years | 6.75% | 7.00% |
| Above 7 Years upto 10 Years | 6.50% | 6.75% |

DEPOSITS FROM 7 DAYS TO 184 DAYS ARE SHORT TERM DEPOSITS (SDR)

ANNAPURNA TAX BENEFIT SCHEME – Tax Benefit upto Rs. 1.50 lakhs per Investor u/s 80 C

| For all category (Individual / HUF/ Senior Citizen) | ATBS (FDR) | ATBSQ (QIRP) |
|---|---|---|
| Scheme (5 Years - No Premature Payment) | 7.00% | 7.00% |

*QIRP - EARN HIGHER CUMULATIVE YIELD

**1 YEAR - 2 YEARS** — *QIRP FDR MIP RD — GENERAL PUBLIC **8.00%** — SENIOR CITIZEN **8.25%**

SPECIAL DEPOSIT SCHEME

**200 DAYS** — FDR — GENERAL PUBLIC **7.50%** — SENIOR CITIZEN **7.75%**

SPECIAL DEPOSIT SCHEME

**999 DAYS** — FDR — GENERAL PUBLIC **7.25%** — SENIOR CITIZEN **7.50%**

**PERIODICAL PRINTED MATTER**

**"GAUD BRAHMAN"**
30, Kudaldeshkar Brahman Nivas
147 B, J. S. S. Road, Girgoan, Mumbai-4.

Registered with the Registrar of
Newspaper for India Under No. 37555/61




गौड ब्राह्मण सभा यांच्या मालकीचे हे त्रैमासिक संपादक, मुद्रक व प्रकाशक उमाकांत गणपत महाजन यांनी प्रतिक ऑफसेट-१८०-सी, गायवाडी, गिरगांव, मुंबई-४०० ००४ येथे छापून ३०, कुडाळदेशकर ब्राह्मण निवास, १४७ ब, जगन्नाथ शंकर शेट मार्ग, मुंबई - ४०० ००४ येथे प्रसिद्ध केले.